CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

लातूर | रविवार, २६ जुलै २०२६ । वर्ष ४ थे अंक १३७ । पाने १२+८ । किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
▌dainiktarunbharat.com
▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



प्रतिष्ठेचे प्रदर्शन शहाणपणाचे नाही. त्यातून 'मनुष्याची विशेषता' म्हणून वर्णन केलेले ते व्यावहारिक ज्ञान तर झळकत नाहीच. केवळ स्वतःच्याच उपभोगाचा विचार म्हणजे निव्वळ स्वार्थ आहे.

**स्व. एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# धर्मेंद्र प्रधान यांचा अखेर राजीनामा

### देश, ओडिशातील जनता तसेच विद्यार्थ्यांच्या व्यापक हितासाठी काम करण्याचा निर्धार

**नवी दिल्ली, २५ जुलै**

केंद्र सरकार आणि कॉक्रोच पार्टीचे प्रतिनिधी यांच्यातील तिसऱ्या फेरीच्या चर्चेआधी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यामुळे या मुद्यावर सरकार आणि आंदोलक विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली कोंडी अखेर फुटली आहे. प्रधान यांच्या राजीनाम्याचे मी स्वागत करतो. हा लोकशाहीचा विजय असल्याचे सोनम वांगचुक यांनी म्हटले आहे.

धर्मेंद्र प्रधान यांनी आपला राजीनामा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठवला. समाजमाध्यमावर आपल्या राजीनाम्याची घोषणा केल्यानंतर प्रधान यांनी राजीनामा देण्यामागची कारणमीमांसाही मांडली आहे. मागील चार दशकांपेक्षा जास्त काळापासून मी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील सुधारणांसाठी समर्पित आहे, असे स्पष्ट करीत प्रधान म्हणाले की, मजबूत, समावेशी आणि दूरदर्शी शिक्षण व्यवस्थाही कोणत्याही राष्ट्राच्या विकासाची आधारशीला असते, यावर माझा दृढ विश्वास आहे.

३ मे रोजी नीट परीक्षेत झालेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारी समोर आल्यानंतर सरकारने सीबीआयकडे त्याची चौकशी सोपवली तसेच पूर्ण परीक्षा रद्द करीत नव्याने परीक्षा घेण्याची घोषणा केली. पुढील वर्षी होणाऱ्या नीट परीक्षा पूर्णपणे संगणकाच्या आधारावर (सीबीटी मोड) घेतल्या जाणार आहे. २० लाख पेक्षा जास्त विद्यार्थी देतात, ती परीक्षा निःष्पक्ष आणि सुरळीत पार पाडण्याचा प्रयत्न होता. त्यामुळेच केंद्र सरकारने २१ जून रोजी केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा प्रशासन तसेच विद्यार्थी आणि पालकांच्या मदतीने ही परीक्षा यशस्वीपणे पार पाडली. १६ जुलैला या परीक्षेचा निकालही जाहीर झाला. या परीक्षेत गरीब आणि वंचित वर्गातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. मात्र, जबाबदारीच्या पदावर बसलेल्या काही लोकांनी विद्यार्थ्यांची दिशाभूल केली, याचे मला अतिशय दुःख आहे. आतापर्यंतच्या कार्यकाळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मार्गदर्शन, मंत्रिमंडळातील आपले सहकारी तसेच शिक्षण मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे त्यांच्या आतापर्यंतच्या सहकार्याचे प्रधान यांनी राजीनामा पत्रातून आभार मानले. यापुढेही मी भारतामाता, ओडिशातील जनता, आणि देशातील विद्यार्थ्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही धर्मेंद्र प्रधान यांनी दिली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राजीनामा सोपवून बाहेर पडताना धर्मेंद्र प्रधान

#### आम्हाला तरुणाईचा अभिमान : राहुल गांधी

लोकशाही, संविधान आणि आपले भविष्य वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरून ठामपणे उभ्या राहिलेल्या प्रत्येक तरुण आणि विद्यार्थ्यांचे मी अभिनंदन करतो. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्बांधणीच्या दिशेने उचललेले मोठे पाऊल आहे. पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांचा आणि भारताच्या भविष्याचा आदर राखून माफी मागावी आणि विद्यार्थ्यांवरील हिंसाचारास जबाबदार असलेल्या पोलिसांवर कारवाई करावी, अशी आमची मागणी असल्याचे कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे. ■

#### दहा दिवसांतील घटनांमुळे व्यथित

मागील दहा दिवसांत ज्या काही दुर्दैवी घटना घडल्या, त्यामुळे मी अतिशय व्यथित झालो. हा माझ्या व्यक्तिगत प्रतिष्ठेचा विषय नाही, तर देशातील विद्यार्थ्यांच्या भविष्याचा मुद्दा आहे. आंदोलनातील विद्यार्थ्यांचे भवितव्य कायदेशीर गुंतागुंत आणि राजकीय संघर्ष यात अडकू नये, तसेच त्यांचे लक्ष अभ्यासावरून विचलित होऊ नये, म्हणून व्यापक हितासाठी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे, असे प्रधान यांनी सांगितले.

◂ (तभा वृत्तसेवा)



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते आषाढी एकादशीनिमित्त शनिवारी पहाटे विठ्ठलाची पूजा करण्यात आली. यावेळी त्यांनी सर्वत्र पाऊस पडू दे, शेतकऱ्यांना दिलासा मिळू दे असे साकडे विठ्ठलाला घातले. त्यांच्यासोबत शासकीय पूजेचा मान मिळालेले दाम्पत्य बाबासाहेब माने आणि प्रभावती माने

# पंढरपूर कॉरिडॉर : कोणावरही अन्याय न करता योग्य पुनर्वसन

- ▸▸ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्ट प्रतिपादन
- ▸▸ आषाढी एकादशीनिमित्त श्रीविठ्ठल-रुक्मिणीची महापूजा
- ▸▸ बाबासाहेब माने, प्रभावती माने यांनाही मिळाला पूजेचा मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ जुलै-**

श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचे काम पंढरपूर कॉरिडॉरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. कोणावरही अन्याय न करता सर्वांचे योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी बाबासाहेब माधव माने, सौ. प्रभावती बाबासाहेब माने यांच्यासमवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने झालेल्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर, सौ. अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, सुरेश खाडे, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम आदी उपस्थित होते.

मागील काळात सुरू केलेले मंदिर विकासाचे काम बहुतांश पूर्ण झाले असल्याचे

(पान ३ वर...)

## महत्त्वाचे

### प्रल्हाद जोशींकडे अतिरिक्त कार्यभार

**नवी दिल्ली :** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर पंतप्रधानांच्या सूचनेनुसार राष्ट्रपतींनी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांना त्यांच्या विद्यमान खात्यांसह शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्याचा निर्देश दिला आहे. जोशी आता त्यांच्या सध्याच्या मंत्रिपदांच्या जबाबदाऱ्यांसह शिक्षण मंत्रालयाची जबाबदारी स्वीकारणार आहेत. जोशी हे अन्न आणि सार्वजनिक वितरण, ऊर्जा आणि ग्राहक व्यवहार मंत्री आहेत.

### भारतीय खलाशांच्या जहाजावर हल्ला

**मस्कत :** होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ इराणच्या सागरी हद्दीत मोझांबिकचा ध्वज असलेल्या दिशा या एलपीजी टँकरवर क्षेपणास्त्राचा मारा करण्यात आला. यात संपूर्ण टँकर नष्ट झाला, तर यावर तैनात असलेले २८ भारतीय खलाशी ओमानच्या नौदलाने वेळीच मदत केल्याने वाचले. परराष्ट्र मंत्रालयाने हल्ल्याचा निषेध नोंदवत आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. दुसरीकडे इराणने या हल्ल्यासाठी अमेरिकेला जबाबदार धरले आहे. ओमानमधील भारतीय दूतावासाने 'एक्स'वरील पोस्टमध्ये हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला.

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# अचूक लक्ष्य साधणार भार्गवास्त्र

### १० किमी परिघातील ड्रोनचा सहज शोध

**नागपूर, २५ जुलै**

भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' राबविले, तेव्हा ती लढाई तंत्रज्ञानावर आधारित होती. भारतीय लष्कर एवढे प्रगत तंत्रज्ञान सहजतेने हाताळू शकते, याची प्रचीती संपूर्ण जगाला आली. आता त्यातच एक पाऊल पुढे टाकत येणाऱ्या काळात भारतीय लष्करात भार्गवास्त्र सहभागी होणार आहे. १० किलोमीटर परिघातील ड्रोन शोधणारी रडार यंत्रणा भार्गवास्त्रात बसविण्यात आली आहे. यामुळे शत्रूचे ड्रोन सहजतेने नष्ट करण्याची ताकद यात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जागतिक पातळीवर तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. आता युद्ध ड्रोनद्वारे होतात. ड्रोनचे हल्ले भयावह ठरू शकतात. अशा ड्रोनच्या झुंडींना रोखण्याची ताकद आपल्याजवळ असावी, अशीच मनीषा भारतीय लष्कराची होती. त्यानुसार नागपुरातील 'सोलर डिफेन्स ॲण्ड एरोस्पेस लिमिटेड'ने लष्करासमोर त्यांच्या स्वदेशी काऊंटर ड्रोन प्रणाली भार्गवास्त्रची यशस्वी थेट चाचणी केली. ही प्रणाली हवाई हल्ले आणि ड्रोन स्वार्म म्हणजे थव्यांनी येणाऱ्यांना अडवू शकते. विशेष म्हणजे, ही प्रणाली लष्कराच्या कमांड आणि



कम्युनिकेशन नेटवर्कशी जोडली जाऊ शकते. भार्गवास्त्राची प्रणाली धोकादायक ड्रोन आणि स्वयंचलित ड्रोनच्या थव्यांना रोखण्यासाठी तयार करण्यात आली आहे. पण चाचणी नेमकी कुठे आणि केव्हा झाली याची अद्याप कुणाकडूनही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

#### मारक क्षमता उत्तमच

भार्गवास्त्राची निर्मिती नागपुरातील सोलर इंडस्ट्रीजने केली आहे. शत्रूच्या ड्रोनच्या थव्यांना नष्ट करता येईल. याची प्रभावी हल्ला करण्याची क्षमता सुमारे सहा किलोमीटर आहे. यातील प्रणाली पूर्णतः स्वदेशी आहे. भार्गवास्त्र वाहनावर सहजपणे बसवता येते. कुठेही तैनात करता येईल. अचूक लक्ष्य साधण्याची कुवत असल्याने मारक क्षमता उत्तमच आहे. समुद्रसपाटीपासून पाच हजार मीटर उंचीच्या पर्वतीय प्रदेशातही तैनात केली जाऊ शकते.

◂ (तभा वृत्तसेवा)

# सौदी आरामकोवर हुथींचे हल्ले

### जगातील सर्वांत मोठ्या तेल कंपनीवर ड्रोनचा मारा

**रियाध, २५ जुलै**

येमेनच्या हुथी बंडखोरांनी सौदी अरबच्या जिझान आणि यानबू या शहरांवर ड्रोनचा मारा केला. काही ड्रोन जगातील सर्वांत मोठी तेल कंपनी असलेल्या आरामकोच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर धडकले. या हल्ल्यांनंतर अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित झाला.

सौदी अरबमधील ओद्योगिक शहर आणि बंदर असलेल्या जिझान आणि यानबूमधील अनेक भागांना लक्ष्य करीत हुथी बंडखोरांनी ड्रोनचा मारा केला. यातील काही ड्रोन आरामको कंपनीच्या परिसरात आदळले. यात पायाभूत सुविधांचे नुकसान झाल्याची माहिती सौदीच्या नागरी संरक्षण विभागाने निवेदनातून दिली. यानबू हे पश्चिम सौदी अरबमधील मदिना प्रांतात लाल समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेले एक औद्योगिक शहर आहे. हे निसर्गरम्य बेट एक प्रमुख पर्यटनस्थळ असून, स्कूबा डायव्हिंग, प्रवाळ बेटे आणि सागरी उपक्रमांसाठी लोकप्रिय आहे. या शहरावर झालेल्या हल्ल्यामुळे परदेशी पर्यटकांची सुरक्षा धोक्यात आली. सौदी अरबच्या परराष्ट्र मंत्रालयाने हुथीच्या हल्ल्याचा तीव्र निषेध केला असून, जोरदार प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला. सौदीच्या नेतृत्वाखालील आघाडीचे प्रवक्ते मेजर जनरल तुर्की अल-मल्की यांनी म्हटले की, आम्ही हुथीच्या हल्ल्याचा लवकरच सूड घेणार आहे. निष्पाप नागरिक आणि औद्योगिक प्रतिष्ठानांना लक्ष्य करणाऱ्यांना सोडले जाणार नाही. दुसरीकडे हुथी बंडखोरांनी लाल समुद्रात सौदी अरेबियाविरुद्ध नाकेबंदी जाहीर केली आहे. सौदीच्या जहाजांना या मार्गात प्रवेश करण्यास बंदी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

◂ (वृत्तसंस्था)



# जंतरमंतरवर दगडफेक

**नवी दिल्ली, २५ जुलै**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या घोषणेनंतर शनिवारी काही वेळातच जंतरमंतर येथे आंदोलकांच्या एका गटाने सुरक्षा कर्मचाऱ्यांवर दगडफेक केली. यात दोन पोलिस अधिकाऱ्यांसह एक विशेष पोलिस आयुक्त जखमी झाले. अचानक उद्‌भवलेल्या या घटनेमुळे सुरक्षा दलांनी संतप्त जमावावर अश्रुधुराच्या नळकांड्या सोडल्या तसेच परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सौम्य लाठीचार्ज केला.

विशेष पोलिस आयुक्त अनिल शुक्ला हे इतर वरिष्ठ आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांसह गर्दीचे नियमन करण्यासाठी आणि सुरक्षा व्यवस्थेचा कोणताही भंग होऊ नये, यासाठी प्रयत्न करण्यात आघाडीवर होते. अधिकारी सुव्यवस्था राखण्यासाठी आंदोलकांच्या जवळ जात असताना काही निदर्शकांनी घोषणाबाजी केली तर, दुसऱ्या गटाने कोणत्याही चिथावणीशिवाय दगडफेक करण्यास सुरुवात केली.

◂ (वृत्तसंस्था)



# चिमुकल्या वारकऱ्यांच्या जयघोषाने परिसर भक्तीमय

## आषाढी एकादशीनिमित्त शहर, जिल्ह्यातील शाळांमध्ये दिंडी सोहळ्याचा उत्साह

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २५ जुलै-

आषाढी एकादशीचे औचित्य साधून शहर व जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात वारकरी पेहराव केलेले चिमुकले विद्यार्थी आकर्षणाचे मुख्य केंद्र होते. विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर आणि संत मीराबाई यांची वेशभूषा करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कपाळावर गोपीचंद, अष्टगंध, बुक्का आणि गळ्यात तुळशीची माळ धारण केलेले विद्यार्थी वारकरी संप्रदायाची परंपरा जपत होते, तर विद्यार्थिनी नऊवारी साडी नेसून, डोक्यावर तुळशीचे भांडे घेऊन दिंडीत उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. 'ज्ञानोबा-तुकाराम' आणि 'पंढरीनाथ महाराज की जय' अशा अखंड आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणात न्हावून निघाला होता.

### सुलाखे स्कूल, बार्शी



सुलाखे इंग्लिश मेडियम स्कूल बार्शी या शाळेचा आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित केलेला दिंडी सोहळा संपन्न झाला. दिंडी सोहळ्याची सुरुवात शाळेच्या प्रांगणामध्ये विठूरायांच्या पूजनाने झाली.

यावेळी श्री विठ्ठलाची पूजा संस्थेचे सचिव अनंत कवठाळे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक तुषार महाजन, सुलाखे हायस्कूलचे मुख्याध्यापक इंगळे उपस्थित होते. प्रारंभी विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणामध्ये रिंगण सोहळ्याचे सादरीकरण नेत्रदीपक पद्धतीने केले. दिंडीचा मार्ग सुलाखे हायस्कूल रोड-भगवंत मंदिराच्या पाठीमागून भगवंत मंदिर-महाद्वार चौक- शिवसृष्टीपासून ते पुन्हा सुलाखे हायस्कूल रोडने शाळेमध्ये अशा होता.

विद्यार्थ्यांनी केलेल्या वेगवेगळ्या वेशभूषा या दिंडीचे मुख्य आकर्षण होते. भीमनगर चौक, भगवंत मंदिरासमोर, तसेच शिवसृष्टी चौकात विद्यार्थ्यांनी विविध अभंगावर नेत्रदीपक नृत्य सादर केले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी लाठी-काठीचे साहसी सादरीकरण करत असताना पाहणाऱ्या लोकांच्या अंगावर रोमांच उभे केले. शेवटी शिवसृष्टी येथील छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन दिंडीचा समारोप शाळेमध्ये करण्यात आला. दिंडी सोहळा पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक महाजन, होनराव, शिंदे, टोणे, चव्हाण, जोशी यांनी परिश्रम घेतले.

### हिंगुलांबिका प्राथमिक शाळा



हिंगुलांबिका प्राथमिक शाळेमध्ये आषाढी एकादशीनिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांची बाल वारकरी दिंडी भांडे गल्ली येथील भावसार समाज विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे काढण्यात आली. १९० विद्यार्थ्यांनी दिंडीमध्ये सहभाग नोंदवला. ज्ञानबा तुकाराम, विठ्ठल विठ्ठल विठ्ठला या नामाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. दिंडीचे पूजन बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय बापू ढगे, सचिव विजय पुकाळे व संचालक किरण क्षीरसागर, अखतघच राष्ट्रीय वधू वर समिती अध्यक्ष सुधीर शेळके, डॉ. मनोज कटारे यांच्या हस्ते विठू रखुमाई यांच्या पालखीचे पूजन करून दिंडीची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे उपस्थित होते.

### जिल्हा परिषद कन्नड शाळा, बोरोटी

अक्कलकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा, बोरोटी खुर्द येथे आयोजित करण्यात आलेल्या आषाढी एकादशीच्या निमित्ताने बाल वारकरी दिंडी व ग्रंथ दिंडी सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धाराम बिराजदार तसेच सदस्य गोपाल लोहार, राजू हलोळ्ळी, चंद्रकांत बिराजदार, ठक्कप्पा सनगुंदी, मुस्तफा आतार, शरणू चनगे, सचिन कोळी, लक्ष्मण नावी यांच्या हस्ते ग्रंथ दिंडी व पालखीचे पूजन करून पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर दिंडीला उत्साहात प्रारंभ झाला. शाळेतील विद्यार्थ्यांनीच ढोल, टाळ व मृदुंगाच्या गजरात दिंडीचे नेतृत्व केले. गावातील प्रमुख मार्गावरून निघालेल्या दिंडीत 'झाडे लावा, झाडे जगवा', 'स्वच्छ गाव, सुंदर गाव', 'शिक्षण हा आमचा हक्क', 'पाणी अडवा, पाणी जिरवा' अशा विविध सामाजिक संदेश देणाऱ्या घोषणांमुळे ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली.

ग्रामदैवत काशिलिंगेश्वर मंदिरासमोर पार पडलेला गोल रिंगण सोहळा हा कार्यक्रमाचा प्रमुख आकर्षण ठरला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख शरणप्पा फुलारी, अनंत बांगर, मुख्याध्यापिका राजश्री तांबे तसेच अंजली वाघमारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### हरिभाई देवकरण प्रशाला




हरिभाई देवकरण प्रशालेत आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. शाळा समिती अध्यक्ष सुरेश मंकणी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल रुक्मिणी प्रतिमा पूजनाने झाली.यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. स्नेहल पवार, पत्रकार धनंजय शिंदे , मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे, उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे, पालक संघाच्या उपाध्यक्षा वैशाली देशमुख, सर्व पर्यवेक्षक उपस्थित होते. पाहुण्यांच्या परिचय जेष्ठ पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी केला. मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांनी पाहुण्यांचा सत्कार बुके देऊन केला. शिक्षिका सावनी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अभंगवाणी, भारुड व नृत्य सादर केले. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनचा रिंगण सोळण्याने कार्यक्रमाची सांगता झाली. या आषाढी एकादशी सोहळ्याला कार्याध्यक्षा भावना यलगुलवार, दिनेश घंटे व सावनी कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन मल्लिकार्जुन घवाळे, आभार कार्याध्यक्षा भावना यलगुलवार यांनी मानले.

### ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल



कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठानच्या ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, बोरामणी च्यावतीने आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिंडी सोहळ्याने तांडुळवाडी परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. ज्ञानोबा-तुकाराम यांच्या जयघोषात, हरिनामाच्या गजरात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात विद्यार्थ्यांनी साकारलेला भव्य रिंगण सोहळा उपस्थितांसाठी विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. या सोहळ्यास तांदुळवाडीचे माजी सरपंच सिद्धाराम हेळे, उपसरपंच लिंगराज पाटील उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व सचिव संगीता शहा यांनी आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या प्राचार्या अस्मा नदाफ यांनी मार्गदर्शन केले. तसेच पूर्वप्राथमिक विभागाच्या प्रभारी प्राचार्या अमृता कोरीशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

### व्हि.जी.शिवदारे प्री-प्रायमरी स्कूल



व्हि. जी.शिवदारे प्री-प्रायमरी स्कूल व युनिक इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाचा पालखी सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी शाळेतून दिंडी काढण्यात आली. शाळेच्या परिसरात विठ्ठल पूजेनंतर अभंग घेण्यात आले. पालखीचे पूजन शाळेच्या शैक्षणिक सल्लागार अंजली तिवारी तसेच शाळेच्या व्यवस्थापन समिती सदस्या डॉ. शुभदा उपासे व पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष प्रा. महादेव कांबळे यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी केले. कार्यक्रम मुख्याध्यापिका पूजा बाजपेयी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आला. सूत्रसंचालन स्वाती विभुते व प्रस्तावना मानसी झळिककर यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख स्वाती विभुते तसेच पर्यवेक्षिका मानसी झळिककर व समन्वयिका गोरा उडचन यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

### पी. एस. इंग्लिश मिडीयम स्कूल




पी. एस. इंग्लिश मिडीयम प्री-प्रायमरी, प्रायमरी व हायस्कूल विभागाच्या वतीने आषाढी एकादशीचे औचित्य साधून संयुक्तपणे पालखी पूजन व दिंडी सोहळ्याचे दिमाखदार स्वरुपात आयोजन करण्यात आले होते. या भक्तीमय सोहळ्याच्या आरंभी प्रसन्न अश्या वातावरणात शाळेच्या जवळपासच्या परिसरातून दिंडी काढण्यात आली. मुख्याध्यापिका कांबळे, पर्यवेक्षक शिरढोणे, प्रायमरीच्या पर्यवेक्षिका रामावत व प्री-प्रायमरीच्या समन्वयक अक्कलकोटे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या पालखीचे पूजन करण्यात आले. हायस्कूलची विद्यार्थिनी राधिका माने हिने आषाढी एकादशीचे महत्त्व या विषयावर भाषण केले. सूत्रसंचालन नवल पाटील यांनी केले.

### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग प्रशालेत आषाढी एकादशी निमित्त प्रशालेतील मैदानात रिंगण सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य वीरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके उपस्थित होते. सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी दिंडी व रिंगण सोहळ्याविषयी माहिती सांगितले. वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा जयघोष करत संपूर्ण शालेय परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण केले होते. यावेळी प्रशालेतील काही विद्यार्थिनी व विद्यार्थी यांनी श्री विठ्ठलावर आधारित भक्तीमय गाण्यांवर नृत्य सादर केले तर प्रमुख पाहुण्यांसह शिक्षक, शिक्षिका तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनींनी फुगडी खेळून रिंगण सोहळ्यामध्ये सहभाग नोंदविला. रिंगण सोहळा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमंत भोसले, सिध्दाराम भैरामडगी, निलकंठ कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ,गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, बसवराज दुधगी,विरेश थळंगे, मल्लिनाथ गौडगाव, शिवराज अष्ठगी, अजय माणकोजी, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी ,स्नेहा हळगोदे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, प्रयोगशाळा सहायक विनोद दुधगी, कट्टेप्पा कोळी, सुनिता कुर्ले आदिंनी परिश्रम घेतले.

### शाह कन्या प्रशाला, बार्शी



शाह कन्या प्रशालेतील विदयार्थिनीनी शहराच्या प्रमुख भागामधून वारकरी दिंडी काढली. वारकरी वेषात, टाळ चिपळ्यांच्या आवाजात भक्तीरसात विद्यार्थी रंगून गेल्या होत्या. भारुड पथक, वारकरी वेषातील विद्यार्थिनींनी तालबद्ध सादरीकरण केले. दिंडी पाहण्यासाठी प्रमुख मार्गावर शहरातील नागरिकांनी गर्दी केली होती दिंडी यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका शुभदा जोशी, संदेश घाडगे, तुकाराम सुपे, विवेक गोरे, चिन्मय वालवडकर, शशिकांत गलांडे, रवी पोरे, सोमनाथ पाटील, वैष्णवी हातोळकर, ज्योती आगरवाल, उज्ज्वला स्वामी, उषा वीर, वैष्णवी कोकाटे, अर्चना बुटे, बालाजी भोळे, विश्वास डोईफोडे, शुभम लोकरे यांनी परिश्रम घेतले.

### अर्णव संकुलाच्या दिंडीत ११०० विद्यार्थ्यांचा सहभाग



सासुरे फाटा परिसरातील अर्णव शैक्षणिक संकुलाच्या वतीने एक भव्य आणि शिस्तबद्ध सांप्रदायिक दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीत तब्बल ११०० हून अधिक विद्यार्थी आणि ६० हून अधिक शिक्षक-कर्मचारी पारंपरिक पोशाखात आणि उत्साहात सहभागी झाले होते.

दिंडीची सुरुवात स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्र (वैराग) येथून झाली. यावेळी मुख्य पालखीचे पूजन आणि आरती अत्यंत भक्तीमय वातावरणात पार पडली. याप्रसंगी वैरागचे पोलीस निरीक्षक अमुल कादबने, मुख्याध्यापिका अर्चना डिसले, वैद्यकीय अधिकारी डॉ. परहीन सय्यद, डॉ. मृणाल शिंदे, के. एस. कलाल आणि दिपाली देशमुख उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी पालखीचे दर्शन घेऊन या बालदिंडीला आणि विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. या दिंडीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे केवळ धार्मिक परंपराच नव्हे, तर सामाजिक संदेशही याद्वारे देण्यात आला. विद्यार्थ्यांनी हातामध्ये पर्यावरण रक्षण, स्वच्छता आणि शिक्षणाचे महत्त्व सांगणारे प्रबोधनात्मक फलक (फलक संदेश) धरले होते, ज्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी संस्थेचे सचिव रवींद्र कापसे मनोगत व्यक्त केले. संतनाथ मंदिरात दर्शनानंतर सर्व विद्यार्थी, कर्मचारी आणि उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## महत्वाचे...



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त १५६ जणांचे रक्तदान

सोलापूर, दि. २५ जुलै-

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त मार्डी येथे रुक्मिणीदेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरात १५६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांनी, कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे समाजसेवेचा संदेश देण्यात यश आले. रक्तदानासारख्या महान कार्यात सहभागी होऊन अनेकांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली.

### जिजामाता प्रशालेत रांगोळी स्पर्धेचे आयोजन

सोलापूर, दि. २५ जुलै-



जिजामाता प्रशाला कोंडी येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा आषाढी वारीनिमित्त भरविण्यात आल्या होत्या. स्पर्धेचे नियोजन आकांक्षा जाधव व विजयकुमार लांडगे यांनी मुख्याध्यापक उदय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते. या स्पर्धा आयोजन करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ व शिल्पा ठोकळ यांच्या प्रेरणेमुळे ही स्पर्धा भरवण्यात आली होती.



### हरि ओम संस्थेच्यावतीने लक्ष्मीकांत दंडी यांचा गौरव

सोलापूर, दि. २५ जुलै-

यंदाच्या वर्षी श्री शेगांव गजानन महाराज पालखीचे व वारकऱ्यांचे उत्कृष्ट सेवा केल्याबद्दल तसेच संस्थेचे प्रत्येक कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल हरी ओम विणकर बाग बहुद्देशीय संस्थेचे खजिनदार लक्ष्मीकांत दंडी यंदाच्या वर्षी उत्कृष्ट सेवा कार्य म्हणून त्यांना सन्मान चिन्ह, शाल, बुके संस्थेचे विश्वस्त संजीव नादरगी यांच्या हस्ते देऊन गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बालाजी जंगम, हिरालाल धुळम, अशोक यज्जा, प्रकाश पुल्ली, बालाजी माचरला, गणेश सिद्धम, रुक्मनसा दौलताबाद, जगदीश बोमद्याल, शेखर इराबत्ती, गणेश गुज्जा, संजीव नादरगी उपस्थित होते.



### पालखी बंधुभेट प्रसंगी ५१ हजार पाणी बाटल्यांचे वाटप

पिलीव, दि. २५ जुलै-

वारकऱ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे यासाठी सचिन पडळकर यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी दि. २२ जुलै रोजी पालखी बंधुभेट माऊली संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज,संत सोपानदेव महाराज, संत मुक्ताई यांच्या बंधुभेट प्रसंगी तोंडले बोंडले ते पिराची कुरोली टप्पा, भंडीशेगाव याठिकाणी वारकरी यांना ५१००० पाणीबॉटल मोफत वाटप करण्यात आले. यावेळी सचिन पडळकर उपस्थित होते. जलसेवा यशस्वी करण्यासाठी सुमित मोरे, पत्रकार गणेश देशमुख, गणेश पुजारी, विश्वास धायगुडे, डॉक्टर दत्ता दोलताडे, शेखर कपने, रोहित कपणे, नितीन देवकते,देवा माने,उमर शेख, विजय कोरे,संग्राम परचंडे, सतीश कस्तुरे, राहुल कस्तुरे, अजित भालेराव, खंडू माने, स्वप्नील राऊत, आप्पासाहेब सुळ,संघर्ष पुकळे, गणेश घुले, चंद्रशेखर तरंगे, साहिल मुलाणी, यश चोरमले,सागर लोखंडे, तुषार सुतार, गणेश मदने, शंभु लोहार, साहेब मुलाणी, सुरज चोरमले, बिरुदेव चोरमले यांचे सहकार्य लाभले.

### ३०० कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत हिरज येथे वृक्षारोपण

सोलापूर, दि. २५ जुलै-

शासनाच्या ३०० कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत दि. २२ जुलै २०२६ रोजी जिल्हा रेशीम कार्यालय, हिरज, ता. उत्तर सोलापूर येथे विविध वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपण कार्यक्रमास सिंहगड विद्यापीठ, सोलापूरचे प्राचार्य एस. एस. पवार, सामाजिक वनीकरण विभागाच्या वनअधिकारी शुभांगी जावळे, कृषी विज्ञान केंद्राचे प्राचार्य डॉ. तांबडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव अतुल राजपूत, अधिकारी व कर्मचारी, डॉ. चंद्रकांत ऐवळे, वैद्यकीय अधिकारी उत्तर सोलापूर डॉ. प्रीतम मुंदडा, योगेश्वर विद्यालय, हिरज येथील मुख्याध्यापक चवरे, शिक्षक व कर्मचारीवर्ग तसेच विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील प्रगतशील रेशीम उद्योजक शेतकरी सौदागर पांडव, रेशीम विकास अधिकारी व्ही. एस. पवार, जिल्हा रेशीम कार्यालय, सोलापूर तसेच बाळासाहेब सूर्यवंशी, क्षेत्रीय अधिकारी, रेशीम कार्यालय, सोलापूर, महादेव गवंड उपस्थित होते. सदर कार्यक्रमात प्राचार्य एस. एस. पवार तसेच कृषी विज्ञान केंद्राचे प्राचार्य डॉ. तांबडे यांनी वृक्षलागवडीचे महत्त्व व पर्यावरण संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले.

# बिहार-मध्यप्रदेशात डाव्यांचा धुडगूस

## विद्यार्थी संघटनांच्या आंदोलनाला हिंसक वळण

## पोलिसांवर दगडफेक, वाहने जाळली

## पोलिस अधीक्षकांसह ७९ कर्मचारी जखमी

**पाटणा/ भोपाळ, २५ जुलै**

नीट-यूजी पेपरफूट प्रकरणाचा निषेध करण्यासाठी डाव्या गटाच्या विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी बिहार, उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशातील अनेक शहरांत शनिवारी रस्त्यांवर अक्षरशः धुडगूस घातला. आंदोलनावेळी त्यांनी पोलिसांवर दगडफेक करत शासकीय वाहनांची जाळपोळ केली. पाटणा, सिवान, भोपाळ आणि प्रयागराजमध्ये पोलिसांवर करण्यात आलेल्या दगडफेकीत पोलिस अधीक्षकांसह ७९ कर्मचारी जखमी झाले. यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करत आंदोलकांना पिटाळून लावले. आंदोलनात सहभागी झालेले तेजप्रताप यादव यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.



बिहारमधील पाटणा येथे डाव्या विचारसणीच्या विद्यार्थी संघटनांनी पुकारलेल्या बंददरम्यान आंदोलकांनी पोलिस वाहनाची तोडफोड करत दडगफेक केली

शिक्षण प्रणालीत सुधारणा आणि राजधानी दिल्लीतील आंदोलकांवर झालेल्या लाठीमारच्या विरोधात डाव्या गटातील विद्यार्थी संघटनांनी बंद घोषणा केली होती. उत्तरप्रदेशातील प्रयागराज, लखनौ, सहारनपूर, बिहारची राजधानी पाटणा, सिवान आणि मध्यप्रदेशातील भोपाळ, इंदूरसह अनेक शहरांमध्ये निदर्शने करण्यात आली. आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक करत त्यांची वाहने जाळली. पाटणा येथील गांधी मैदानाजवळ मोठ्या संख्येने विद्यार्थी जमले होते. त्यांनी विधानसभेच्या दिशेने मोर्चा काढला. पोलिसांनी मोर्चाला रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी तुफान दगडफेक केली. पोलिसांनी बळाचा वापर केल्यानंतर आंदोलनात सहभागी काही तरुणांनी पोलिसांची वाहने आणि बसेसला आग लावली. या आंदोलनात सहभागी झालेले तेजप्रताप यादव यांना पोलिसांना ताब्यात घेतले.

दुसरीकडे प्रयागराज, लखनौ आणि सहारनपूरसह अनेक शहरांमध्ये कॉक्रोच पार्टीच्या समर्थनार्थ निदर्शने करण्यात आली. जिल्हाधिकार कार्यालयाकडे जाणाऱ्या मोर्चाला पोलिसांनी रोखले असता, आंदोलकांनी त्यांच्यावर दगडफेक केली. यात अनेक पोलिस कर्मचारी जखमी झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. मोर्चासाठी कुठलीही परवानगी घेतली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

### पश्चिम बंगालमध्ये समाजकंटकांवर कारवाई

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुवेन्दू अधिकारी यांनी आंदोलनादरम्यान पत्रकारांवर झालेल्या हल्ल्याचा निषेध केला. आंदोलनाच्या आडून शासकीय मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवर गुंडा कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना दिले. कायद्याचे उल्लंघन झाल्यास कुणालाही सोडणार नाही असा इशारा त्यांनी दिला. दरम्यान, कोलकाता येथे डाव्या विचारसरणीच्या विद्यार्थी संघटनांनी केलेल्या निषेध रॅलीदरम्यान पत्रकार आणि छायाचित्रकारांवर हल्ला करण्यात आला. पोलिसानी याप्रकरणी सहा एफआयआर दाखल केल्या. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, आंदोलनात अनेक गुन्हेगार घुसले आणि त्यांनी पोलिसांसह पत्रकारांवरही हल्ले केले. ◂ (वृत्तसंस्था)

### १५० आंदोलक ताब्यात

मध्यप्रदेशातील इंदूर, भोपाळ, ग्वाल्हेर, जबलपूर, धार, मऊगंज, नर्मदापुरम, झाबुआ, सिंगरौली, भिंड, टीकमगड, शाजापूर, सतना, सीधी, रतलाम, रीवा, बैतूल, उमरिया, बडवानी आणि श्योपूर जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांची निदर्शने केली. तेथेही आंदोलकांनी धुडगूस घालत पोलिसांवर हल्ला केला. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी दीडशेपेक्षा अधिक आंदोलकांना ताब्यात घेतल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली. ■

### भागलपूरमध्ये शासकीय कार्यालयाची तोडफोड

भागलपूरमध्ये आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घुसून तोडफोड केली. तिलका मांझी चौकात उभ्या असलेल्या पोलिसांच्या गाडीला लक्ष्य करून तोडफोड केली. सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलिसांवर दडफेक करण्यात आली. बिहारच्या कटिहारमध्ये आंदोलकांना नियंत्रित करण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर करत धुडगूस घालणाऱ्या ५६ जणांना अटक केली. सिवानमध्ये दगडफेकीत अनेक पोलिस जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, पोलिसांवरील हल्ल्याची चित्रफित जारी करण्यात आली. ■

# व्हिसा शुल्क आकारणे बेकायदेशीरच

## अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

## प्रशासनाची याचिका फेटाळली

## भारतीय कर्मचारी-व्यावसायिकांना दिलासा






**वॉशिंग्टन, २५ जुलै**

अमेरिका सरकारने उच्च कौशल्य असलेल्या परदेशी कर्मचाऱ्यांसाठी एच-१ बी व्हिसासाठी आकारलेले एक लाख अमेरिकन डॉलर्सचे (सुमारे ८० लाख रुपयांपेक्षा जास्त) शुल्क सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरवत ट्रम्प प्रशासनाने दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा अधिक शुल्क आकारणे बेकायदेशीर करासारखा प्रकार असल्याची टिप्पणी यावेळी न्यायालयाने केली. या निर्णयामुळे अमेरिकेत नोकरी करणाऱ्या हजारो भारतीय कर्मचारी आणि व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे.

बोस्टन येथील कनिष्ठ न्यायालयाने व्हिसा शुल्क आकारण्याचा निर्णय जून महिन्यात रद्द केला होता. या निर्णयाला ट्रम्प प्रशासनाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. दोन्ही पक्षाची बाजू एकून घेतल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्याची ट्रम्प प्रशासनाची विनंती अपील फेटाळून लावली. एच-१ बी व्हिसा अर्जावर एक लाख डॉलर्सचे प्रचंड शुल्क लागू करण्याचा निर्णय बेकायदेशीर आहे. काँग्रेसच्या मान्यतेशिवाय शुल्क आकारणे हे बेकायदेशीर करासारखे आहे, राष्ट्राध्यक्षांना असा निर्णय लागू करण्याचा अधिकार नसल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने हे शुल्क रद्द करण्याचा निर्णय दिला. डेमोक्रॅटिक पक्षाच्या २० राज्यांच्या ॲटर्नी जनरल यांनी या शुल्काविरोधात याचिका दाखल केली होती. संसदेची मान्यता न घेता बेकायदेशीर शुल्क आकारून घटनात्मक तरतुदीचे उल्लंघन झाल्याचा युक्तिवाद त्यांनी न्यायालयात केला. ◂ (वृत्तसंस्था)

### पूर्वी काय होता नियम ?

एच-१ बी व्हिसा कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ६५,००० व्हिसा दिले जातात, तर उच्च पदवीधारक कामगारांसाठी अतिरिक्त २०,००० व्हिसा राखीव असतात. हे व्हिसा ३ ते ६ वर्षांच्या कालावधीसाठी मंजूर केले जातात. ट्रम्प यांच्या या निर्णयापूर्वी परदेशी कामगारांसाठी व्हिसा मागणाऱ्या रोजगारदात्यांना विविध घटकांवर आधारित २,००० ते ५,००० डॉलर्स इतकेच शुल्क द्यावे लागत असे. मात्र ट्रम्प यांनी शुल्कवाढ करण्याचा आदेश जारी करत ही रक्कम एक लाख डॉलर्सपर्यंत वाढवली होती. ■

### न्यायालयाने काय म्हटले?

न्यायालयाने, १९८९ च्या निर्णयाचा हवाला देत म्हटले की, सरकारने काँग्रेसची मंजुरी न घेता आकारलेले शुल्क बेकायदेशीर असून, घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन आहे

- शुल्कासाठी लावलेल्या निकषाची गरज काय आहे, याची स्पष्ट माहिती देण्यास प्रशासन अपयशी ठरले, राष्ट्राध्यक्षांना शुल्क आकारण्याचा अधिकार नाही
- तक्रार करणाऱ्या राज्यांना मोठे नुकसान होणार नाही, हे ट्रम्प प्रशासन सिद्ध करू शकले नाही आणि युक्तिवादाच्या समर्थनार्थ त्यांनी कोणताही ठोस पुरावा दिला नाही. ■

### ट्रम्प यांचा गैरवापराचा दावा निरर्थक

**या शुल्कात मोठी वाढ करताना ट्रम्प यांनी दावा केला होता की, अमेरिकन कामगारांना मदत करण्याऐवजी, कमी पगाराच्या आणि कमी कुशल परदेशी कामगारांद्वारे त्यांना हटवण्यासाठी एच-१ बी योजनेचा गैरवापर केला जात आहे. दरम्यान, हे नवीन शुल्क अमेरिकेत आधीपासूनच विद्यार्थी व्हिसावर असलेल्या परदेशी नागरिकांना लागू होणार नाही.** ■

# युरोपियन देशांवर लावणार शंभर टक्के शुल्क

## ट्रम्प यांचा इशारा

**वॉशिंग्टन, २५ जुलै**

नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप करीत युरोपियन युनियनने गुगल, ॲपल, मेटा आणि ॲमेझॉनसारख्या कंपन्यांवर दंड आकारल्याने राष्ट्राध्यक्ष डोनाम्ड ट्रम्प संतप्त झाले. त्यांनी युरोपियन देशांच्या उत्पादनांवर शंभर टक्के शुल्क आकारण्याची धमकी दिली. युरोपियन युनियन अमेरिकन टेक कंपन्यांशी भेदभाव करत असून, त्यांना याची किंमत चुकवावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

युरोपियन युनियनने ॲपल, मेटा, ॲमेझॉन आणि आता गुगलवर लादलेला दंड आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन आहे, असे समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये ट्रम्प यांनी म्हटले. अमेरिका आता स्वस्थ बसणार नाही आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल. युरोपियन युनियनने यापूर्वी देखील ॲपलवर १५ अब्ज डॉलर्स, मेटावर तीन आणि ॲमेझॉनवर २.५ अब्ज डॉलर्स तसेच इतर अनेक अमेरिकन कंपन्यांवर विनाकारण दंड लावला होता. आता त्यांनी गुगलवर एक अब्ज डॉलर्सचा नवीन दंड लावला आहे, ज्यामुळे एकूण दंड १८ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाला. युरोपियन युनियनवर लवकरच शंभर टक्के शुल्क आकारले जाईल, असे ट्रम्प यांनी म्हटले. ◂ (वृत्तसंस्था)

### सप्तपदी सकल दिगंबर जैन वधू-वर पालक परिचय मेळावा आज

**सोलापूर, दि. २५ जुलै -**

दिगंबर जैन पंचम समाज विकास मंडळ, सोलापूर संचलित सप्तपदीतर्फे रविवार, दि. २६ जुलै रोजी सकाळी ९:३० वाजता सकल दिगंबर जैन वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा मेळावा विजापूर रोडवरील सुंदर मल्टिपर्पज हॉल (नेहरू नगर बस स्टॉप समोर, शासकीय ग्राउंडच्या शेजारी) येथे होत आहे.कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष म्हणून फुलचंद चंद्रकांत जैन, उद्घाटक म्हणून अभय गुणधर खोबरे, तर दीपप्रज्वलनकर्ते म्हणून प्रितम राजकुमार शहा उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष अनिल जमगे, सचिव देशभूषण व्हसाळे यांच्यासह सर्व पदाधिकारी व महिला मंडळ कार्यरत आहेत.

(पान १ वरून...)

### पंढरपूर कॉरिडॉर : कोणावरही अन्याय न करता योग्य पुनर्वसन

सांगून मुख्यमंत्री ते पुढे म्हणाले, 'पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक येतात. येथे अत्यंत कमी जागा आहे. आता मोठी जागा तयार करणे गरजेचे आहे. यावर्षी हे काम सुरू करायचे आहे. कॉरिडॉर विकासात येथील व्यावसायिकांचा व्यवसाय वाढेल, नागरिकांना घरे मिळतील, भाडेकरूंची व्यवस्था होईल, अशा पद्धतीने त्याची रचना करण्यात आली आहे.

यावेळी वारीने एक नवा उच्चांक गाठला आहे. यावर्षी २५ किलो मीटरपेक्षा जास्त लांबीची दर्शनासाठी रांग लागली होती. परंतु दर्शनासाठी २५ तास लागले तरीही कोणीही नाराज न होता, न थकता त्याठिकाणी आनंदाने विठ्ठल नामाचा गजर करत हे दर्शन घेत आहेत. पालकमंत्र्यांनी वाळवंटात अतिशय सुंदर व्यवस्था केल्यामुळे तिथला कचरा, विष्ठा आदी संपूर्ण स्वच्छता झाली आहे. त्यामुळे अतिशय सुंदर वाळवंट आपल्याला पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे, असेही ते म्हणाले.

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार, उद्योजक अशा सर्व क्षेत्रातील आहे. वारकऱ्यांची, शेतकऱ्यांची सेवा केली तरी ती सेवा विठुरायापर्यंत पोहोचते. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडावे यासाठी ५६ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय आणि थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असेही त्यांनी सांगितले.

श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रास्ताविक करताना म्हणाले, श्री विठ्ठल मंदिराला पाठबळ देणे, निधी देणे आणि विकास करण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. आज विठुमाऊलीच्या दर्शनासाठीच्या रांगेचे अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्थापन केले आहे. दर्शन रांगेत ५० ते ६० हजार वारकरी असले तरी पालकमंत्र्यांनी राज्य शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून अत्यंत चांगल्या सुविधा केल्यामुळे दर्शन सुसह्य झाले आहे.

शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. गौरगाव, ता. कळंब, जि. धाराशिव येथील बाबासाहेब माधव माने आणि सौ.प्रभावती माने या दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सौ.अमृता फडणवीस यांच्या हस्ते महापूजेनंतर सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना वर्षभर मोफत एसटी प्रवास पास मुख्यमंत्री यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

#### श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्काराचे वितरण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पाणी, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिक मुक्त वारी, वृक्षसंवर्धन आदी विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांना 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कौंडण्यपूर, द्वितीय क्रमांक वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, जालना आणि तृतीय क्रमांक गोऱ्हेकर संस्था, आळंदी देवाची यांना पुरस्कार व धनादेश देण्यात आला.

# ओडिशात माओवाद्यांचा शस्त्रसाठा जप्त



**मालकानगिरी, २५ जुलै**

छत्तीसगडच्या सीमेला लागून असलेल्या ओडिशाच्या मालकानगिरी जिल्ह्यात सुरक्षा दलांनी माओवाद्यांचा शस्त्रसाठा जप्त केला. एका गुप्त माहितीच्या आधारे, सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि ओडिशा पोलिसांच्या संयुक्त पथकाने २४ जुलैला जोदंबो पोलिस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करत अरापादर व घुसुमपादर गावांदरम्यानच्या जंगलमय आणि डोंगराळ भागात माओवाद्यांचा शस्त्रसाठा शोधून काढला.

या कारावाईत जिलेटीनच्या ३२ कांड्या, ११ डेटोनेटर, ५०० ग्रॅम दारुगोळा, तीन मीटर कोडेक्स वायर, एक सोलर पॅनल बॅटरी, एक रेडिओ आणि विजेच्या तारा जप्त करण्यात आल्यात. एकेकाळी माओवाद्यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मलकानगिरी जिल्ह्यातील प्रभावित भागांमध्ये बीएसएफ सातत्यपूर्ण कारवाई करीत आहे. तसेच, या प्रदेशात कायमस्वरूपी शांतता सुनिश्चित करण्यासाठी सुरक्षा दलांचे कारवाईतील वर्चस्व वाढत असल्याचेही त्यात नमूद केले आहे.

### घातपाताचा कट उधळला

माओवाद्यांनी हे स्फोटक पदार्थ पकडले जाऊ नयेत म्हणून जमिनीखाली लपवले होते. या स्फोटकांचा वापर सुरक्षा दलांना लक्ष्य करण्यासाठी किंवा या प्रदेशात विध्वंसक कारवाया करण्यासाठी केला जाणार होता.भविष्यातील हल्ल्याच्या योजनेसाठी माओवाद्यांनी ही स्फोटक सामग्री जमा केली असावी, असा संशय आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# दहशतवादी मॉड्युलचा भंडाफोड, तीन जणांना अटक

## शहजाद भट्टीचे दिल्लीपासून आसामपर्यंत सापडले धागेदोरे



**गुवाहाटी, २५ जुलै**

आसाम पोलिसांनी पाकिस्तानस्थित शहजाद भट्टी नेटवर्कशी संबंधित एका दहशतवादी मॉड्युलचा भंडाफोड केला. या प्रकरणी तीन कथित सदस्यांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वीही देशाच्या विविध भागांत या नेटवर्कच्या सदस्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, आसाम पोलिसांच्या विशेष कृती दलाने (एसटीएफ) शुक्रवारी ही कारवाई केली. या कारवाईत धुबरी, चिरांग आणि बारपेटा जिल्ह्यांतील पोलिसांनीही सहकार्य केले. या कारवाईदरम्यान एसटीएफने धुबरी, चिरांग आणि बारपेटा जिल्ह्यांतून प्रत्येकी एका संशयिताला अटक केली. या कारवाईत पाच मोबाईल फोन, सात सिमकार्ड, आधारकार्ड, बँक पासबुक, डेबिट कार्ड आणि गुन्हेगारी स्वरूपाची कागदपत्रेही जप्त करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### दहशतवादी कारवायासाठी सोशल मीडियाचा वापर

पाकिस्तानस्थित गुंड आणि दहशतवादी शहजाद भट्टीचे नेटवर्क भारतातील तरुणांना आमिष दाखवण्यासाठी आणि दहशतवादी कारवाया करण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करीत आहे. हे नेटवर्क भारतातील अनेक राज्यांमध्ये पसरले आहे आणि सुरक्षा यंत्रणा त्यावर आपली पकड सतत घट्ट करीत आहेत.

शहजाद भट्टीचे नेटवर्क राजधानी दिल्लीसह उत्तरप्रदेश व महाराष्ट्रातही पसरले आहे. उत्तरप्रदेश विशेष कृती दल (एसटीएफ) आणि दहशतवादविरोधी पथकाने मे महिन्यात (एटीएस) शहजाद भट्टी नेटवर्कशी संबंधित अनेक संशयितांना सहारनपूर, मुझफ्फरनगर आणि हरिद्वार येथे अटक केली.तर ६ जुलैला दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने भट्टीच्या दोन दहशतवादी गटांचा पर्दाफाश करीत सहा संशयितांना अटक केली. ◂ (वृत्तसंस्था)

# भेटीविना वैद्यकीय घटकांची सांघिक निर्मिती शक्य

## 'टोहोल्ड आरएनए' आधारित कागदी चाचणी संच विकसित

**पुणे, २५ जुलै**

महासाथीसारख्या आव्हानात्मक काळात केंद्रीय पुरवठा साखळीवरील अवलंबित्त्व कमी करण्यासाठी पाच देशांतील संशोधकांनी एकत्र येऊन महत्त्वपूर्ण उपाय शोधला आहे. या अंतर्गत आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांच्या चमूने स्थानिक पातळीवर उपलब्ध संसाधने, माहितीचा वापर करून, एकमेकांना न भेटताही उच्च दर्जाचे वैद्यकीय घटकांची सांघिक निर्मिती शक्य असल्याचे अनोख्या संशोधन प्रकल्पातून दाखवून दिले आहे.

भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेने (आयसर पुणे) या बाबतची माहिती निवेदनात दिली. युनिव्हर्सिटी ऑफ टोरंटोच्या फार्मास्युटिकल सायन्सेस विभागातील प्रा. कीथ पार्डी यांच्या नेतृत्त्वाखाली करण्यात आलेल्या संशोधनात आयसर पुणेतील जीवशास्त्र विभागातील प्रा. चैतन्य आठले, डॉ. तन्वी काळे यांचा सहभाग होता. या संशोधनाचा शोधनिबंध 'अमेरिकन अकॅडमी फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स'च्या 'सायन्स ॲडव्हान्सेस' या संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झाला. करोना महासाथीच्या काळात केंद्रीय पुरवठा साखळी विस्कळीत झाली होती. त्यामुळे शास्त्रज्ञ विकसित करत असलेली वैद्यकीय उपकरणे, आरएनए लसी, निदान साहित्य पोहोचण्यास विलंब झाला.

परिणामी, अनेक ठिकाणी नुकसान झाले. या पृष्ठभूमीवर, ब्राझील, कॅनडा, चिली, कोलंबिया आणि भारत या पाच देशांतील शास्त्रज्ञांच्या गटाने स्थानिक पातळीवर उपलब्ध होणारे साहित्य-संसाधने, माहितीची देवाणघेवाण यांच्या आधारे उच्च दर्जाच्या वैद्यकीय घटकांची निर्मिती करण्याबाबत संशोधन केले. या संशोधन प्रकल्पासाठी 'कॅनेडियन डेव्हलपमेंट फंड,' 'शास्त्री इंडो-कॅनेडियन इन्स्टिट्यूट' यांनी निधी उपलब्ध करून दिला होता.

संशोधनाअंतर्गत शास्त्रज्ञांनी पेशीविरहित प्रणाली, कृत्रिम जीवशास्त्र तंत्रज्ञानाचा वापर करून अण्विक निदान, पेप्टाइड-आधारित लसींसाठी लागणारी उच्च दर्जाचे प्रथिने प्रयोगशाळेत यशस्वीरीत्या तयार केली. चिलीतून पाठवलेले पेशी अर्क (सेल-फ्री एक्स्ट्रॅक्ट) इतर देशांतील प्रयोगशाळांमध्ये स्थानिक उपकरणांच्या सहाय्याने तंतोतंत, दर्जेदार पद्धतीने पुन्हा तयार करण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)

### पारंपरिक पीसीआर चाचणीला स्वस्त, सुलभ पर्याय

आयसर पुणेतील प्रा. चैतन्य आठले यांच्या प्रयोगशाळेत कृत्रिम डीएनए संरचनांचा वापर करून प्रथिनांची निर्मिती करून या प्रक्रियेची चाचणी घेतली. याच संशोधनामध्ये 'टोहोल्ड आरएनए' तंत्रज्ञानावर आधारित कागदी चाचणी संच विकसित केला. हा चाचणी संच पारंपरिक पीसीआर चाचणीला स्वस्त, सुलभ पर्याय ठरू शकतो. तसेच कॅनडातील संशोधकांनी करोना विषाणूचे 'स्पाइक प्रोटीन' तयार करून त्याची उंदरांवर लस म्हणून यशस्वी चाचणीही केली. या प्रकल्पातील संशोधन साहित्याची देवाणघेवाण टपालाद्वारे करण्यात आली, अशी माहिती आयसर पुणेने दिली. ■

# पी. विजयन् यांच्या मुलीचे बँक खाते सील

**एर्नाकुलम, २५ जुलै**

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) केरळचे विरोधी पक्षनेते पिनाराई विजयन् यांची मुलगी टी. वीणाच्या 'लेकर इंडिया कॉर्पोरेशन' या नवीन कंपनीचे बँक खाते गोठवले आहे. या खात्यात सध्या १५.५७ लाख रुपये जमा आहेत. २७ मे रोजी वीणाच्या निवासस्थानी टाकलेल्या छाप्यात कंपनीशी संबंधित संशयास्पद कागदपत्रे सापडल्यानंतर मनी लॉण्ड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

वीणाची कंपनी एक्झालॉजिक आणि कोचीस्थित सीएमआरएल यांच्यातील आर्थिक व्यवहार उघडकीस आल्यानंतर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) हा तपास सुरू केला. तपासादरम्यान वीणाची दोनदा चौकशी करण्यात आली आहे. या हाय-प्रोफाईल प्रकरणात 'लेकर इंडिया कॉर्पोरेशन'चे नाव पहिल्यांदाच समोर आले आहे. त्यामुळे एजन्सीने एक्झालॉजिक व्यतिरिक्त वीणाच्या मालकीच्या इतर कंपन्या आहेत का याचा तपास सुरू केला आहे. निधीचे स्त्रोत आणि रोख व्यवहारांची सविस्तर चौकशी सध्या पीएमएलए अंतर्गत सुरू आहे.

ईडीनुसार, सीएमआरएलचे माजी व्यवस्थापकीय संचालक शशीधरन कार्था यांनी साक्ष दिली की, कोणतीही आयटी सेवा न देता एक्झालॉजिक सोल्युशन्सला मोठी रक्कम हस्तांतरित करण्यात आली होती. हे पैसे केवळ माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान विरोधी पक्षनेते पी. विजयन् यांच्यासोबतच्या वैयक्तिक संबंधांमुळे दिले गेले होते. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## प्रासंगिक

**प्रवीण दीक्षित**

# पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण नको!



दिल्लीमध्ये जंतरमंतर येथे 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) वतीने 'नीट' पेपरफुटीप्रकरणी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून सीजेपीच्या वतीने संसद भवनावर मोर्चा काढण्यात आला आणि तिथे पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला, म्हणून सर्वत्र पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. पण पोलिसांची बाजू कोणीच समजून घेत नाही.

स्वतःला विद्यार्थी म्हणवून घेणारे नेमके कोण आहेत, ते माहीत नाही. स्वतःला विद्यार्थ्यांचे नेते म्हणवून घेणारे कोणत्या परीक्षेला बसले होते आणि त्या परीक्षांमध्ये काय घोटाळा झाला होता, याचा कुठेही उल्लेख नाही. स्वतःला नेते म्हणवणाऱ्यांपैकी अभिजित दीपके नावाचा कोणीतरी अमेरिकेतून येतो आणि मला आंदोलन करायचे म्हणतो. त्याला दिल्ली पोलिसांनी लगेच जंतरमंतरवर आंदोलन करण्याची परवानगी दिली. म्हणजे त्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, असेही नाही. हे सर्व युवक तिथे आंदोलनाला बसले आणि त्यांनी एकच मागणी लावून धरली आणि ती म्हणजे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. शिक्षणव्यवस्थेत नेमक्या काय सुधारणा हव्या आहेत, शासनाकडून यासंदर्भात त्यांच्या काय अपेक्षा आहेत, याबद्दल त्यांच्याकडून लेखी मुद्दे आलेले दिसले नाहीत. दरम्यान पेपरफुटीप्रकरणी दोषी आढळलेल्या लोकांवर सरकारने कडक कारवाई केली. ती सर्व मंडळी आज तुरुंगात आहेत. पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर 'नीट' परीक्षा तातडीने रद्द करण्यात आली आणि त्यातील त्रुटी दूर करून पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने ती पुन्हा घेण्यात आली. २२ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली, त्यापैकी ११ लाख विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळाला. म्हणजे या विद्यार्थ्यांची तशी तक्रार नाही. त्यांची एवढीच अपेक्षा होती, की आमची परीक्षा व्यवस्थित व्हावी आणि चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना अपेक्षित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा.

सरकारने विद्यार्थ्यांची ही अपेक्षा आपणहून पूर्ण केली. याशिवाय त्यांच्या काही मागण्या असतील तर त्या त्यांनी सरकारला लेखी स्वरूपात द्यायला हव्यात. त्यावर सरकारने विचार करून त्यांची पूर्तता केली असती. पण असे काही न करता त्यांनी २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढणार असल्याचे जाहीर करून टाकले. त्याच दिवशी संसदेचे अधिवेशन सुरू होणार होते. भारतीय संसद हे अतिसंवेदनशील ठिकाण असल्यामुळे आणि तिथे कायदा आणि सुव्यवस्था राखणे, हे पोलिसांचे कर्तव्य असल्यामुळे भारतीय न्यायसंहितेच्या कलम '१६३ ब' आणि पूर्वीच्या भारतीय दंड संहितेच्या '१४४' नुसार या परिसरात पाच किंवा अधिक लोकांना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली. अर्थात संसदेवर मोर्चा काढायचा असेल तरी पोलिस परवानगी देतात, पण त्यासाठी मोर्चा काढणाऱ्यांना आपण कोण आहोत, मोर्चा काढण्याचे कारण काय, मोर्चामध्ये किती लोकांचा सहभाग असणार आहे, जमाव तिथे काय करणार आहे, हे स्पष्ट करावे लागते. सीजेपीने अशी कोणतीही परवानगी घेतली नाही. २० जुलै राजी तिथे देशातल्या अनेक भागांमधून युवक येण्यास सुरुवात झाली. यात विद्यार्थी किती होते, विविध राजकीय पक्षांचे भाडोत्री आंदोलक किती होते, गुंड होते की बेकायदेशीर कामे करणारे होते, याची काहीच कल्पना नव्हती. ही मंडळी आपणहून आलेली नव्हती, तर त्यांना कोणीतरी आणलेले होते. त्यांना आणणाऱ्यांना स्वतःचे चेहरे प्रकाशात येऊ द्यायचे नव्हते. त्यांनी या मुलांना भडकावून धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करा, असे सांगितले होते.

मोर्चा निघताना आम्ही पुष्पगुच्छ घेऊन निघालो आहोत असे दाखवण्यात आले. पण हा केवळ देखावा होता. मागे असलेल्या युवकांसमोर कोणतेही नेतृत्व नव्हते, कोण काय सांगत आहे, याकडे त्यांचे लक्ष नव्हते. संसदेवर काही वेळा हल्ले झाले आहेत, हे आपल्याला माहीत आहे. लोकशाहीच्या दृष्टीने संसद ही अत्यंत महत्त्वाची जागा आहे. संसदेवर मोर्चा आल्यानंतर मोर्चेकऱ्यांनी 'बॅरिकेड्स'च्या अलिकडे थांबावे आणि आपल्या दोन-चार प्रतिनिधींना सरकारशी चर्चा करण्यासाठी पाठवावे, हा दंडक आहे. या मोर्चेकऱ्यांनी मात्र 'बॅरिकेड्स' उधळून लावून किंवा त्यांच्यावर चढून संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे संसदेमध्ये शिरू पाहणाऱ्या लोकांना अडवण्याची पोलिसांची जबाबदारी असते. हे मोर्चेकरी नुसता शिरण्याचा प्रयत्न करून थांबले नाहीत, तर त्यांनी तिथे जोरदार दगडफेक सुरू केली. त्याचबरोबर या युवकांनी तिथे बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिसांवरही हल्ले केले आणि काही पोलिसांना बेदम मारहाण करण्यात आली. अगदी पोलिस शिपायापासून विशेष पोलिस आयुक्त दर्जाच्या आयपीएस अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांना मारहाण केल्याचे किमान ७२ अधिकृत व्हिडीओज उपलब्ध आहेत. या जमावाने तिथे असलेल्या पेट्रोल पंपावर हल्ला केला, महिला पोलिसांवर हल्ला केला, पत्रकारांवर हल्ला केला. म्हणजे यातून त्यांनी कोणालाच सोडले नाही.

हे कमी की काय म्हणून तिथे उभ्या असलेल्या पोलिसांच्या आणि खाजगी वाहनांची तोडफोडही करण्यात आली. गरीब रिक्षावाल्यांनाही सोडले नाही. हे सगळे होत असताना दीपकेसहित सीजेपीचे नेते युवकांना मारहाणीसाठी आणि मालमत्तेचे नुकसान करण्यासाठी प्रोत्साहन देताना दिसत होते. म्हणजे स्वतःची जबाबदारी काय, याची कल्पना नसलेले लोक पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत आहेत. मोर्चामध्ये आंदोलक जाळपोळ करत असतील, कोणाला मारहाण करत असतील, सरकारी आणि खाजगी मालमत्तेचे नुकसान करत असतील तर पोलिसांनी ते शांतपणे पाहत राहणे अपेक्षित नाही. त्यांना कायदा आणि सुव्यवस्थेच्या रक्षणासाठी तैनात करण्यात आलेले असते. हिंसक मार्गाने जाणाऱ्या आंदोलकांवर कारवाई करण्याचे अधिकार त्यांना कायद्याने देण्यात आले आहेत. या जमावाला पोलिसांनी प्रथम शांतता राखण्याचे आवाहन केले, त्यानंतर त्यांना चेतावणी देण्यात आली आणि त्यानंतर कमरेच्या खाली सौम्य लाठीचार्ज करण्यात आला. तरी जमाव नियंत्रणात येत नाही म्हटल्यावर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. नळकांड्या फुटल्यावर त्याचे धातूचे काही तुकडे जमावातल्या काहींना लागू शकतात. त्यांना पॅलेट्स म्हणण्यात काही अर्थ नाही. या घटनेनंतर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एका व्यक्तीला सर्वांसमोर आणले आणि त्याला झालेल्या जखमा पॅलेट्समुळेच झाल्या असल्याचा दावा केला. पण पोलिसांनी पॅलेट गन्सचा वापर केला असता, तर एकाच व्यक्तीला कशा पॅलेट्स लागतील? तिथे जमा झालेल्या शेकडो लाकांना त्या लागल्या असत्या.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या मोर्चासाठी तैनात असलेल्या पोलिसांपैकी १५० हून अधिक पोलिस अधिकारी जखमी झालेत. ते सगळे रुग्णालयात दाखल आहेत. म्हणजे ते काही हल्ला झाल्याचे खोटे सांगत नाहीत. याउलट जमावापैकी कोणालाही रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासली नाही. पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये एका मुलीचा मृत्यू झाल्याची आवई उठवली गेली, तीही खोटी ठरली. या सगळ्या घटनाक्रमाचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये चित्रण झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर केला म्हणून त्यांच्यावर खापर फोडणे योग्य नाही. आंदोलकांची संसदेमध्ये चर्चा करायची तयारी नाही. संसद ठरावीक नियमांप्रमाणे चालते. तिथे मुद्द्यांवर चर्चा केली जाते, प्रक्रियेला वेळ लागतो, पण आंदोलकांना सगळे आत्ताच्या आत्ता हवे आहे. योगेंद्र यादव नावाचे महाशय स्वतःला पत्रकार किंवा नेता म्हणवतात. ते म्हणतात, आता निर्णय संसदेत नाही, तर रस्त्यावर होतील. म्हणजे झुंडशाहीचेच राजकारण चालणार का? झुंडशाहीला हे तथाकथित नेतेच प्रोत्साहन देत आहेत. आज दिल्लीमध्ये दंगल झाली, उद्या कर्नाटक, केरळ किंवा इतर बिगर भाजपाशासित राज्यांमध्येही हे होऊ शकेल. सगळीकडे आपल्याला दंगलीच करायच्या आहेत का, हा मुद्दा आहे.

मुंबईमध्येही निदर्शने झालीत. तिथे पोलिसांनी काही लोकांना थोड्या कालावधीसाठी अटक करून सोडून दिले. तर इथले नेते म्हणतात, की तुम्ही कोण आम्हाला हात लावणारे? सर्वोच्च न्यायालयाने वारंवार स्पष्ट केले आहे, की रस्ता ही निदर्शने करण्याची जागा नाही. रस्त्यावर वृद्ध लोक असतात, रुग्णवाहिका येत-जात असतात, सामान्य नागरिक कामासाठी बाहेर पडलेले असतात. रस्त्याचा वापर करण्याचा पहिला हक्क त्यांचा आहे. प्रत्येक ठिकाणी काही मैदाने आहेत. अशा ठिकाणी परवानगी घेऊन शांततेच्या मार्गाने आंदोलने केल्यास ही समस्याच निर्माण नाही. झुंडशाहीला राजकीय पक्षांनी प्रोत्साहन द्यायचे की नाही, हा मुद्दा आहे. या झुंडशाहीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वसामान्यांच्या संमतीनेच शासनाने पोलिसांना कारवाईचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे कोणीही उठून पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करू नये. ■

(माजी पोलिस महासंचालक)

## दखल

**विश्राम श. देशपांडे**

# 'निश्चित अवधी रोजगार'– असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी वरदान

भारतातील श्रमिक क्षेत्र संघटित आणि असंघटित असे विभाजलेले आहे. संघटित क्षेत्रातील कामगार यांना त्यांच्या संख्याबळामुळे संघटित होता येते. त्यांना त्यांच्या स्वतःच्या किंवा कोणत्याही श्रमिक सांघटनेच्या पाठबळामुळे ते सामुदायिक सौदेबाजी करून स्वतःचे सेवेस शर्ती आणि सोयी सुविधा खूप चांगल्याप्रमाणे प्राप्त करून घेऊ शकतात . या उलट असंघटित क्षेत्रातील कामगारांची आस्थापनेतील संख्या जास्त नसते, ते संघटित होऊ शकत नाहीत, त्यांना संघटनेचे पाठबळ नसते. त्यांना रोजगाराची शास्वती नसते. त्यांना अल्प वेतन असते, त्यांना सुट्टी, सामाजिक सुरक्षा मिळत नाही. या क्षेत्रामध्ये स्वीग्गी, झोमॅटो, ओला, उबेर इत्यादी ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे काम करणाऱ्या व्यक्तींचा समावेश होतो. या असंघटित क्षेत्रामध्ये सुमारे ९३ टक्के कामगार वर्ग कार्यरत आहे.

केंद्र शासनाने २९ विविध कामगार अधिनियमाचे ४ संहितांमध्ये रूपांतर केले आहे. औद्योगिक संबंध संहिता, या संहितेमध्ये एक असून यामध्ये 'निश्चित अवधी रोजगार' (नि.अ.रो.) ही संकल्पना मांडली आहे. भारतात ही संकल्पना प्रथमच नव्याने लागू करण्यात आली आहे. औद्योगिक संबंध संहिता २०२० मधील कलम २ उप कलम (०) मधील 'निश्चित अवधी रोजगार' ही संकल्पना सर्व व्यवसायांकरिता लागू करण्यात अली आहे. 'निश्चित अवधी रोजगार' ही संकल्पना असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी वरदान ठरेल.



प्रथमदर्शनी ही तरतूद कामगारविरोधी आणि जाचक वाटते. देशातील जवळपास सर्वच कामगार संघटनांचा याला विरोध आहे. कामगार संघटनांच्या मते, या तरतुदीमुळे स्थायी (नियमित) स्वरूपाच्या नोकऱ्या संपुष्टात येतील. पर्यायाने कामगारांची संघटनशक्ती कमी होईल आणि त्यांची सामूहिक सौदेबाजी क्षमता कमी होईल. त्यामुळे त्यांचे अधिक शोषण होईल आणि व्यावसायिकांची 'मर्जीनुसार कामावर ठेवा आणि आवश्यकता नसेल तर काढा' ही वृत्ती पुन्हा बळावेल. कामगाराच्या जीवनात कायम रोजगाराची अनिश्चितता राहील, स्थायी रोजगार नसल्याने त्याला कोणते कर्ज मिळणार नाही, त्याची समाजात पत उरणार नाही, तो सदैव व्यावसायिकांवर अवलंबून राहील.

खरे तर यातील कामगार संघटनेच्या काही शंका निराधार आहेत. निश्चित अवधी रोजगार या तत्त्वावर काम करणारे कामगार यांना स्थायी (नियमित) कामगाराप्रमाणे सर्व सोयी व सुविधा देणे संहितेमध्ये बंधनकारक केले आहे. त्यांना स्थायी कामगाराप्रमाणे वेतन आणि सवलती देणे, तसेच लागू असलेल्या सामाजिक सुरक्षिततेच्या योजना त्यांना लागू करणे बंधनकारक आहे. नि. अ. रो. कामगारांचे अभिलेख ठेवले जातील, त्यांची नोंद भविष्य निर्वाह निधी आणि राज्य कामगार विमा येथे असणार आहे. त्यांच्या वेतनातून अनाधिकृत कपात होणार नाही. त्यांच्या कामाच्या तासाचे व सुट्टी याचे नियमन हाईल. ते कामगार संघटनेचे सभासद होऊ शकतात, (पदाधिकारी नाही). ते कामगार संघटनेच्या निवडणुकीमध्ये मतदार म्हणून सहभागी होऊ शकतात, मतदान करू शकतात. तसेच कोणत्याही आस्थापनेची एकूण कामगार संख्येची गणना करताना त्यामध्ये नि. अ. रो. तत्त्वावरील कामगारांची समावेश होईल. मात्र तोटा एवढाच आहे की कामगारांना त्यांना सेवेत कायम करावे ही मागणी करता येणार नाही आणि न्यायालयाच्या क्षेत्राधिकार अंतर्गत सुद्धा ही बाब येणार नाही.

या विपरीत सध्या प्रचलित असलेल्या कंत्राटी व इतर पद्धतीमुळे कामगारांना वरीलप्रमाणे कोणतेही संरक्षण मिळत नाही. ठेकेदाराकडून फसवणूक आणि शोषण होते ही वस्तुस्थिती आहे. या असंघटित कामगारांना नियमित कामगाराप्रमाणे सेवा शर्ती आणि सामाजिक सुरक्षा मिळवून देणारी नि. अ. रो. ही संकल्पना एक वरदान आहे.

सद्यःस्थितीत केंद्र किंवा राज्य शासनाने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप नियमांमध्ये नि. अ. रो.बाबत काही नियम नाहीत. त्यामुळे ही संकल्पना यथायोग्य न राबवली गेल्यास त्याची झळ असंघटित क्षेत्रातील कामगारांना बसेल हे निश्चित आहे. परंतु केंद्र किंवा राज्य शासनाने नि. अ. रो. याचे नियम काळजीपूर्वक आणि व्यवसाय/ उद्योगनिहाय केल्यास ते असंघटित कामगारांसाठी वरदान ठरू शकेल.

नवीन उद्योगांकरिता नि. अ. रो.बाबत स्वतंत्र धोरण असावे. नव्याने कार्यरत झालेल्या उद्योगाला पहिले ६ वर्ष किंवा त्यांच्या व्यवहार्यता अहवालाप्रमाणे ब्रेक-इव्हन पॉईंट यापैकी जे आधी घडेल या कालावधीकरिता १०० टक्के कामगार /कर्मचारी नि.अ.रो. या तत्त्वावर घेण्याची मुभा असावी. मात्र हा कालावधी संपल्यानंतर एकूण कामगार/कर्मचारी संख्येच्या ६० टक्के कामगार/ कर्मचारी स्थायी (नियमित) करण्यात यावे, उर्वरित ४० टक्के (ज्यांचा सेवा करार पुढील सहा वर्षांकरिता वाढवण्यात येईल) पैकी १५ टक्के हे पुढील ६ वर्षांत कायम करण्यात येतील आणि उर्वरित २५ टक्के कामगार संख्या ही नि.अ.रो तत्त्वावर ठेवता येईल अशी मुभा असावी. जेणेकरून नवीन उद्योगांना नोकर भरतीमध्ये लवचीकता मिळेल आणि कामगारांना सुद्धा स्थायित्व मिळेल.

सध्या कार्यरत असलेले उद्योग व्यवसाय, माहिती आणि तंत्रज्ञान आस्थापना, शासकीय आणि निमशासकीय संस्था, मंडळे, महामंडळे, स्थनिक स्वराज्य संस्था, इत्यादींमध्ये निश्चित अवधी रोजगाराचा करार कालावधी हा प्रथम नियुक्तीच्या वेळेस २ वर्ष असावा आणि त्यानंतरचा प्रत्येक करार किमान १० वर्षांच्या कालावधीचा असावा. नियुक्तीच्या नंतरच्या कालावधी हा अल्प (२ वर्ष) आहे याचे कारण म्हणजे नियुक्त उमेदवार योग्य आहे का, हे समजण्यासाठी किमान कालावधी आवश्यक असतो. मात्र कामगारांना रोजगाराची शाश्वती असावी म्हणून त्यानंतरचे करार हे दीर्घ मुदतीच्या कालावधीचे असावे.

बांधकाम प्रकल्प, निश्चित अवधीच्या योजना इत्यादी प्रकल्प असेल येथे नियुक्त कर्मचारी / कामगार हे संपूर्ण प्रकल्पामध्ये त्यांच्या कामाचा कालावधी जेवढा आहे तेवढ्या कालावधीपुरते नि.अ.रो करार तत्त्वावर असतील. हंगामी स्वरूपाच्या उद्योगांकरिता करार तत्त्वावरील कर्मचारी/कामगार यांचा कालावधी संपूर्ण हंगाम कालावधीकरिता असावा. निर्यात केंद्रित कारखाने/ आस्थापना किंवा कोणत्याही कारखान्यास किंवा उद्योगास कोणत्याही कारणास्तव मागणी वाढल्यामुळे वाढीव उत्पादनाकरिता आवश्यकतेनुसार तेवढ्या कालावधीकरिता करार करता येईल. हा करार कालावधी एकावेळी ३ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचा नसावा. मात्र सातत्याने समर्थन नसताना नि.अ.रो. तत्त्वावर अशाप्रकारे कामगार ठेवता येणार नाही.

शासकीय संस्थांमध्ये नि.अ.रो संकल्पना लागू करावी आणि त्याकरिता महाराष्ट्र नागरिक सेवा नियमामध्ये सुधारणा केली पाहिजे. मात्र नि.अ.रो अन्वये नेमलेले अधिकारी/कर्मचारी/कामगार यांच्या सेवा सेवाशर्तीचे नियमन कामगार संहितेनुसार होईल अशी सुधारणा महाराष्ट्र नागरिक सेवा नियमामध्ये करणे आवश्यक आहे. नि.अ.रो. ही संकल्पना व्यावसायिकांना लवचीकता देणारी आहे. त्यामुळे व्यावसायिकांनी पण सामाजिक दृष्टिकोन ठेवून थोडी आर्थिक कळ सोसली पाहिजे. कामगारांना या पद्धतीमुळे कायमस्वरूपी रोजगाराची शाश्वती नसल्याने त्यांना विस्थापन भत्ता या नावाने भरपाईच्या स्वरूपात विशेष भत्ता मिळणे आवश्यक आहे.

विस्थापन भत्ता दर वर्षाला नि.अ.रो. तत्त्वावरील कामगारास देय झालेले एकूण वार्षिक वेतनाच्या १० टक्के ते ७ टक्के इतका असावा आणि तो करार संपुष्टात येईल तेव्हा एकत्रितपणे विस्थापन भत्ता म्हणून देण्यात येईल. मात्र जर नि.अ.रो. तत्त्वावरील कामगारास नियमित केल्यास किंवा त्याचा करार पुन्हा तेवढ्याच कालावधीकरिता वाढ केल्यास हा भत्ता पूर्वीच्या करार कालावधीकरिता अनुज्ञेय राहणार नाही. करार कालावधी कमी वर्षाकरिता वाढविल्यास हा विस्थापित भत्ता त्या अनुषंगाने राहील.

निश्चित अवधी रोजगार ही काळाची गरज आहे. केंद्र शासनाने कामगार संहितेमध्ये या संकल्पनेचा समावेश करून मोठे धाडस दाखवले आहे. परंतु आता केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने औद्योगिक संबंध संहिता २०२० अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रारूप नियमांमध्ये त्या बाबतचे नियमन केल्यास त्याचा फायदा असंघटित क्षेत्रातील कामगार आणि खऱ्या अर्थाने तळागाळातील लोकसंख्येचा आधार होईल. ■

(भूतपूर्व संचालक, ना. मे. लो. महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था तथा अप्पर कामगार आयुक्त, सध्या यशदा येथे प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत.)

## रविवारची पत्रे

### पुनर्विकास पारदर्शकतेचा असावा

नागपुरात जुन्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या (अपार्टमेंट-सोसायट्यांच्या) पुनर्विकासाला वेग आला आहे. पुनर्विकासामुळे अधिक सुरक्षित इमारती, उत्तम पायाभूत सुविधा, आधुनिक सोयी-सुविधा आणि हजारो कुटुंबांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्याची मोठी संधी उपलब्ध होते. मात्र, ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकता, निष्पक्षता आणि सुजाण निर्णयप्रक्रियेवर आधारित असली पाहिजे; कोणत्याही प्रकारच्या प्रभाव, दबाव किंवा स्वार्थी हितसंबंधांवर नव्हे. पुनर्विकास प्रकल्प हे अनेक कोटी रुपयांच्या गुंतवणुकीशी संबंधित असतात. अशा मोठ्या आर्थिक व्यवहारांमध्ये विकासकाची निवड गुणवत्ता आणि पात्रतेपेक्षा इतर घटकांच्या प्रभावाखाली होण्याचा धोका नाकारता येत नाही. त्यामुळे प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्थेने अधिक सतर्क राहून प्रत्येक निर्णय वस्तुनिष्ठ, पारदर्शक आणि सर्व सदस्यांच्या हिताचा होईल, याची काळजी घेणे आवश्यक आहे. पुनर्विकास प्रक्रियेत एक वाढती चिंता म्हणजे मतदान किंवा निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचे प्रयत्न. संपूर्ण सोसायटीसमोर सर्व प्रस्ताव समान पद्धतीने मांडण्याऐवजी काही वेळा वैयक्तिक स्तरावर सदस्यांशी संपर्क साधून विविध आश्वासने, प्रलोभने किंवा विशेष लाभ देण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. प्रत्येक सदनिकाधारकाला विकासकाची आर्थिक क्षमता, पूर्वीचे प्रकल्प, कायदेशीर संरक्षण, प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत, बांधकामाचा दर्जा, पुनर्वसनाच्या अटी आणि करारातील तरतुदी यांची सविस्तर माहिती जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. प्रश्न विचारणे म्हणजे विकासाला विरोध करणे नव्हे; तर जबाबदार मालक म्हणून आपले कर्तव्य पार पाडणे होय. बहुसंख्य कुटुंबांसाठी स्वतःचे घर ही आयुष्यातील सर्वात मोठी गुंतवणूक असते. त्यामुळे पुनर्विकासाशी संबंधित प्रत्येक निर्णयाचे आर्थिक, कायदेशीर आणि भावनिक परिणाम दीर्घकालीन असतात. प्रत्येक सदस्याला सर्व प्रस्तावांचा अभ्यास करण्यासाठी, विविध विकासकांच्या ऑफर्सची तुलना करण्यासाठी, स्वतंत्र कायदेशीर व तांत्रिक सल्ला घेण्यासाठी आणि सखोल चर्चेत सहभागी होण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. सुजाण संमती हा न्याय्य आणि पारदर्शक पुनर्विकासाचा मूलभूत पाया आहे. महाराष्ट्रात वाढत्या पुनर्विकास प्रकल्पांच्या पृष्ठभूमीवर राज्य शासन आणि सहकार विभागाने सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी सर्वसमावेशक पुनर्विकास धोरण तयार करण्याचा गांभीर्याने विचार करावा. पुनर्विकास अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी खालील उपाय आवश्यक आहेत :

सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्पष्ट व एकसमान पुनर्विकास धोरण. सर्व विकासकांसाठी समान मूल्यांकन निकष. प्रत्येक प्रस्ताव, आर्थिक अटी आणि कराराची संपूर्ण माहिती सर्व सदस्यांना उपलब्ध करून देणे. संस्थेमार्फत स्वतंत्र कायदेशीर, तांत्रिक आणि आर्थिक सल्लागारांची नियुक्ती. स्वतंत्र यंत्रणेच्या देखरेखीखाली गुप्त मतदानाची व्यवस्था. दबाव, धमकी किंवा निर्णयप्रक्रियेवर अनुचित प्रभाव टाकण्याच्या सिद्ध झालेल्या प्रकारांवर कठोर कायदेशीर कारवाई. पुनर्विकास प्रक्रिया न्याय्य, पारदर्शक आणि कायदेशीर राहावी यासाठी सहकार विभागाकडून अधिक प्रभावी देखरेख. बहुसंख्य विकासक व्यावसायिक प्रामाणिकपणाने काम करतात आणि दिलेली आश्वासने पूर्ण करतात. शहराच्या विकासात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे आणि त्याचे स्वागतच केले पाहिजे. पारदर्शक आणि गुणवत्तेवर आधारित निवड प्रक्रिया प्रामाणिक विकासकांच्याही हिताची असते. त्यामुळे प्रकल्प गुणवत्ता, विश्वासार्हता आणि क्षमतेच्या आधारे मिळतात, प्रभाव किंवा वैयक्तिक संबंधांच्या आधारे नव्हे. यामुळे पुनर्विकास क्षेत्राविषयी समाजाचा विश्वास अधिक दृढ होतो.

**रोहित मारपकवार**/९४२२४४४३७७

■■

### राईस प्लेट

१९८२ सालातली गोष्ट आहे. आम्ही त्यावेळी एका खेड्यात राहत होतो. माझ्या सासऱ्यांच्या डोळ्याचं ऑपरेशन करायचं ठरलं म्हणून मी सहा वर्षांचा मुलगा व दोन वर्षांची मुलगी यांना घेऊन अमरावतीला जाणाऱ्या बसमध्ये बसले. या प्रवासात दोन गावं सोडले की एका नदीच्या पुलावरून बस जात असे. नदी तशी उथळ. फारसं पाणी नसायचं. ऑगस्ट महिना होता. दोन दिवसांपासून धुवांधार पाऊस सुरू होता. धरणातून पाणी सोडलं होतं. त्यामुळे नदीवरच्या पुलावरून वेगात पुराचं पाणी वाहत होतं. बस पुलावरून जाणं अशक्य होतं. पूर ओसरण्यास तीन तास लागणार होते. संध्याकाळी ६ वाजता निघालेली बस ७ वाजता रस्त्याच्या कडेला उभी करण्यात आली. साडेआठ वाजता माझ्या दोन वर्षाच्या मुलीला भूक लागली. अडीच-तीन तासांतच खरं तर अमरावतीला पोहोचलो असतो एरवी, म्हणून निघताना मुलांसाठी पोळी-भाजी वगैरे काही सोबत घेतलं नव्हतं. आम्ही राहत होतो ते खेडं इतकं लहान होतं की, फक्त आठवडी बाजार भरायचा तेव्हाच बिस्किटं विकत मिळायची. त्यामुळे सोबत तीही घेता आली नाहीत. थोडा मुरमुऱ्याचा चिवडा घेतला होता; तो संपून गेला. कंडक्टरला सांगून आजूबाजूला कोणाचं घर दिसते का शोधू लागले. अंधार असल्याने तसं फारसं दिसत नव्हतं. थोडं चालत गेल्यावर एका झोपडीतून थोडा अंधूक उजेड दिसला. मुलगी आता भुकेने व्याकूळ झाली होती. मुलालाही भूक लागली होती. हिंमत करून झोपडीत शिरले. झोपडीतल्या बाईला काही अन्न असेल तर विचारले. खरं म्हणजे जवळ पाच हजार रुपये होते. सासऱ्यांच्या ऑपरेशन व औषधांसाठी घेतलेले. पण एकही दुकान आसपास नसल्याने अक्षरशः झोपडीत अन्न मागण्याची वेळ आली होती. झोपडीतल्या बाईजवळ अगदी दोन वाट्या तांदूळ होते. शेतावरचे मजूर होते ते. दोघं नवराबायको आणि दहा वर्षांचा एक मुलगा, एवढे जणं झोपडीत राहत होते. सगळी परिस्थिती कळल्यावर बाई त्या दोन वाट्या तांदळाचा भात शिजवून द्यायला तयार झाली. तिने चूलही पेटवली. भात शिजत आला तसा बाईच्या नवऱ्याला व्यवहार आठवला. म्हणाला, ''या भाताचे पैसे पडतील म्याडम!'' म्हटलं, ''देईन.'' वाटलं, असे किती पैसे मागणार? फार तर शंभर रुपये, दोनशे रुपये! मुलांनी तो गरम गरम भात नुसतं मीठ कालवून खाल्ला. आता रात्रीचे ९ वाजले होते. पुराचं पाणी ओसरायला लागलं होतं. अर्ध्या तासात रस्ता मोकळा होईल, असं कंडक्टर येऊन सांगून गेला. मी बाईच्या नवऱ्याला दीडशे रुपये दिले. तो म्हणाला, ''हे एवढेच?'' म्हटलं, ''तुम्ही सांगा, किती द्यायचे?''

''माझा मुलगा शहरातल्या साळंत रोज पैदल जातोया. त्याला साळंत जायला साईकील पायजे हाय. साईकीलची किंमत दोन हजार आन ऐंशी रुपये हाय. त्येवडे द्या.'' त्याची मागणी ऐकून मी हबकलेच. मनात आलं, एवढ्या भाताची किंमत इतकी! पण लगेच वाटलं, अत्यंत गरीब असूनही त्यांचं उद्याचं जेवण त्यांनी माझ्या मुलांना खाऊ घातलं आहे. मला त्यांचं हे ऋण फेडणं आवश्यक आहे. मी त्यांना पैसे दिले. अर्थात ऑपरेशन व औषधांच्या पैशांची सोय अमरावतीला पोहोचल्यानंतर अन्य ठिकाणाहून केली. जगातल्या कुठल्याही महागड्या फाईव्ह स्टार हॉटेलातल्या एखाद्या डीशपेक्षा ही 'राईस प्लेट - रुपये दोन हजार ऐंशी' कितीतरी अमूल्य होती!

**आरती देशपांडे**/पुणे, ९४०३५८०००६

■■

### 'तरुण भारत'चे अभिनंदन...

सर्वप्रथम मला 'तरुण भारत'चे अभिनंदन करायचे आहे ते अशासाठी की दिल्लीत सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाबाबत, इतर वर्तमानपत्रांच्या तुलनेत, सत्य परिस्थिती मांडणाऱ्या बातम्या, सडेतोड अग्रलेख आणि रोखठोक विविध लेखांमधून, आंदोलनाची सर्वाधिक सत्य परिस्थिती सांगणारे, आंदोलनाची कारणमीमांसा करणारे, 'तरुण भारत' हे महाराष्ट्रातील एकमेव दैनिक असल्याचे दिसून आले आहे. त्याबद्दल 'तरुण भारत'चे अभिनंदन!

२५ जुलैच्या तरुण भारतमधील अग्रलेख याचे उत्तम उदाहरण आहे. आंदोलनाचा सर्वाधिक परिचित चेहरा असलेल्या सोनम वांगचुक यांनी सव्वीस दिवस उपोषण केले. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, त्यांची प्रकृती अधिक ढासळू नये, यासाठी सरकारने त्यांना रुग्णालयात उपचार घेण्यासाठी दाखल केले. यादरम्यान त्यांच्या सरकारबरोबर सकारात्मक चर्चाही झाल्या. शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा ही मागणी सोडून सोनम वांगचुक यांनीही समजूतदारपणा दाखवला. त्यांच्या इतर सगळ्या मागण्या सरकारने मान्य केल्यामुळे त्यांनी आपले उपोषण सोडले. दुसरीकडे सरकारने विद्यार्थी प्रतिनिधींशीही चर्चा सुरू केली आहे. कोणत्याही परीक्षेचे पेपर कधीही लीक होऊ नयेत यासाठी सरकारने कठोर निर्णय घेतले आहेत आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठीची प्रक्रियाही सुरू झाली आहे.

असे असताना अभिजित दीपकेने पुढील आंदोलन स्वतः होऊन स्थगित करायला हवे होते. तसे न करता त्याने खुद्द सोनम वांगचुक यांच्यावरच सरकारशी सौदेबाजी केल्याचा आरोप संतापजनक आहे. इथून पुढेही हे आंदोलन सुरूच राहणार असल्याचे आणि देशभरात हे आंदोलन उभे करण्याची धमकी त्याने दिली आहे. शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या राजीनाम्याची मागणी करू अशी दर्पोक्तीही त्याने केली आहे. यावरून दीपकेला पेपर लीक होणे रोखण्यात किती रस आहे हे लक्षात येते.

सरकार विरोधात अन्य कोणताही मुद्दा नसल्यामुळे हे आंदोलन विरोधी पक्षांच्या नेत्यांनी हायजॅक केले आहे. संसदेत चर्चा करण्यास नकार देणाऱ्या आणि हंगामा करून अधिवेशन पाण्यात घालणाऱ्या विरोधी पक्षांबाबत देशातील जनतेमध्ये प्रचंड संताप आहे. त्याबरोबर देशविरोधी शक्तींसह गुंड-गुन्हेगार या आंदोलनात घुसल्यामुळे त्याचे गांभीर्यही वाढले आहे. यामुळे प्रक्षोभक वक्तव्ये करून हिंसा भडकवणाऱ्या राजकीय पक्षाच्या नेत्यांना सरकारने चाप लावला पाहिजे. तसेच आंदोलनात हिंसाचार करणाऱ्या, पोलिसांच्या जीवावर उठणाऱ्या, महिलांचा विनयभंग करणाऱ्या आणि देशात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कायमचा धडा बसेल अशी कडक कायदेशीर कारवाई सरकारने करावी.

नीट परीक्षा पेपर लीक झाल्यानंतर सरकारने परीक्षा रद्द केली आणि नंतर पुन्हा परीक्षा घेऊन त्याचा निकालही लागला आहे. त्याचबरोबर या अपराधात सामील असलेल्या ४७ सरकारी अधिकाऱ्यांना नोकरीतून काढून टाकले आहे. आरोपींवरील सुनावणीसाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करण्याची घोषणाही केली आहे. एवढे सगळे करूनही शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी घेऊन मंत्रिपदाचा राजीनामाही दिला आहे. तेव्हा आता सीजेपीने देशभरातील आपले आंदोलन त्वरित मागे घेऊन विद्यार्थी प्रतिनिधींनी सरकारबरोबर सहकार्य करावे आणि पेपर लीक प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी मदतही करावी. मात्र या राजीनाम्याचे राजकारण न करता, कोणीही देशात हिंसाचार करून, अराजकता निर्माण करून सरकारला ब्लॅक मेल करण्याचा पायंडा पडणार नाही याबद्दलही सरकारला विचार करावा लागेल, यातही शंका नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

■■

### पश्चिम घाटाचे संवर्धन होणे आवश्यक

देशातील पश्चिम घाटाला पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील घोषित करण्याच्या केंद्र सरकारच्या मसुद्याला सहा राज्यांनी कडाडून विरोध केला आहे. भारताच्या पश्चिम किनारपट्टीला लागून असलेली पर्वतरांग म्हणजेच पश्चिम घाट. हिमालयानंतर देशात सर्वाधिक प्रसिद्ध असलेला पश्चिम घाट हा त्याच्या नैसर्गिक परिसंस्थेसाठी ओळखला जातो. पश्चिम घाटात लोकसंख्येची घनता हिमालयापेक्षा अधिक आहे. ज्या ज्या राज्यांमधून पश्चिम घाट जातो त्या राज्यांसाठी ते एक आर्थिक संकटदेखील झाले आहे. या प्रदेशात प्रामुख्याने नगदी पिके घेण्याचे प्रमाण अधिक आहे. पश्चिम घाटाला कायदेशीरदृष्ट्या सुरक्षित करण्यासाठी त्याचे संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी प्रयत्न केला जात आहे. परंतु, राज्य सरकारांनी याबाबत काही आक्षेप आणि चिंता व्यक्त केल्या आहेत

महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या सहा राज्यांना पश्चिम घाट लागला आहे. दिवंगत पर्यावरण शास्त्रज्ञ माधव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखालील समितीने पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी विशेष शिफारशी केल्या होत्या. त्यानंतर इस्रोचे माजी प्रमुख के कस्तुरीरंगन त्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय कार्यसमिती स्थापन झाली होती. या दोन्ही समित्यांनी केलेल्या अभ्यासानुसार पश्चिम घाटातील छपन्न हजार आठशे पंचवीस किलोमीटर क्षेत्राला पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारला देण्यात आला होता. त्यासाठी केंद्र सरकारने अधिसूचनेचा मसुदा जारी केला असता संबंधित राज्यांकडून सहमती येऊ शकली नाही. परिणामी राज्यांनी नोंदवलेले आक्षेप व व्यक्त केलेल्या चिंतेचा अभ्यास करण्यासाठी आणखी एक तज्ज्ञ समिती नेमण्यात आली होती. पश्चिम घाट बाष्पमुक्त वाऱ्यांना अडवून एक नैसर्गिक दूत म्हणून काम करतो आणि मान्सूनवर प्रभाव पडतो. यामुळे घाटांच्या किनारपट्टीच्या भागात मुसळधार पाऊस पडतो. हा मुबलक पाऊस आणि दाट जंगले येथील झऱ्यांना जिवंत ठेवतात. तसेच या भागातील गोदावरी, कृष्णा, कावेरी, पेरियार आणि इतर अनेक नद्यांना जीवन देतात. म्हणूनच संपूर्ण देशासाठी पश्चिम घाटाचे महत्त्व अधिक आहे. तसेच पश्चिम घाट हा अतिसंवेदनशील देखील आहे. ■

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## 'ऑर्किड'च्या दिंडीत विठुरायाच्या गजरात साक्षरतेचा जागर

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

आषाढी एकादशीनिमित्त नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे विश्वस्त तथा युवा उद्योजक यशराजव करजगी, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मातेची आरती व पालखी पूजन करण्यात आले. यावेळी ज्यु.कॉलेज प्राचार्या स्मिता कुलकर्णी, मार्गदर्शिका मीना पारखे उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार करजगी व संस्थेच्या सचिवा वर्षा विभुते यांनी आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेच्या आवारातून दिंडीचे प्रस्थान होऊन ती जुनी मिल मार्गे वीजवितरण कार्यालय येथील महादेव मंदिरास प्रदक्षणा घालून शाळेच्या मैदानावर येऊन अश्वाच्या सोबतीने विद्यार्थी व शिक्षकांनी रिंगण सोहळा पार पाडला. सूत्रसंचालन तृप्ती चाटी यांनी केले.



## ठोकळ प्रशालेत सुरक्षेविषयी कार्यशाळा

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर येथे सोलापूर पोलीस आयुक्तालय व प्रशालेच्या संयुक्त विद्यम ाने विद्यार्थिनींच्या सुरक्षेविषयी जनजागृतीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर पोलिस आयुक्तालयाच्या सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अलका शहापुरे यांनी विद्यार्थिनींना विविध संकटांच्या प्रसंगी स्वतःचे संरक्षण कसे करावे, सोशल मीडियाच्या माध्यमातून कशी फसवणूक केली जाते व जाळ्यात ओढले जाते अशाप्रसंगी कायदेशीर मदत कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांचे सहकारी उषा माळगे, अकिला नदाफ व सुशीला नागरगोजे यांनीही विद्यार्थिनींशी संवाद साधून उपयुक्त माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एएसआय अलका शहापुरे या होत्या. कार्यक्रमास प्राचार्य डी. डी. गाजरे, पर्यवेक्षिका आशा भोसले उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते स्त्रीशक्तीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.सूत्रसंचालन व आभार अश्विनी जाधव यांनी मानले. संस्थेचे अध्यक्ष ॲड. विपीन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संचालिका शिल्पा ठोकळ तसेच सचिव भिकाजी गाजरे यांनी कार्यशाळेचे नियोजन व यशस्वी आयोजन केल्याबद्दल शाळेचे अभिनंदन केले.



## एकता मंचतर्फे भाविकांना फराळ वाटप

**वैराग, दि. २५ जुलै-**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून खेडभाळवणी (ता. पंढरपूर) येथील एकता महिला मंचच्या प्रमुख मीनाक्षी साळूंखे यांच्या वतीने उपक्रम राबवण्यात आला. आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या बाहेरील गावातील दिंडीचे खेडभाळवणी येथे आगमन झाले. विठ्ठल नामाच्या जयघोषात दिंडीतील सर्व भाविक भक्तांना फराळाचे वाटप करण्यात आले.

## किवडे यांच्याकडून जि.प. घोळसगाव शाळेस साउंड सिस्टमची भेट

**अक्कलकोट, दि. २५ जुलै -**

जि. प. प्रा.मराठी शाळा घोळसगाव येथे, हॉटेल व्यावसायिक सचिन किवडे यांचेकडून शाळेस साडे बारा हजार रुपये किमतीचा साऊंड सिस्टीम भेट देण्यात आली. शिक्षण प्रक्रियेमध्ये अधिक परिणामकारकता यावी या उद्देशाने किवडे यांनी ही भेट दिली. त्यानिमित्त शाळेचे मुख्याध्यापक मनोज माने यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामेश्वर पाटील, उपाध्यक्ष रेवणसिद्ध किवडे, नरसिंग कोलाटी, उमेश साळुंखे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित ठाकर यांनी केले. कार्यक्रमासाठी अमोल गुंजोटे, रामेश्वर दरेकर, मुरलीधर वागदकर यांनी परिश्रम घेतले. शाळेला साऊंड सिस्टीम दिल्याने सचिन किवडे यांच्या दानशूर वृत्तीचे कौतुक होत आहे.

## अपंग व्यक्तीच्या न्याय्य हक्कांसाठी महाराष्ट्र लोकाधिकार समिती आक्रमक

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

स्टेट बँक ऑफ इंडिया, जुळे सोलापूर शाखेकडून अपंग व्यक्तीचे पगार खाते कथितरीत्या बेकायदेशीरपणे बंद केल्याने संबंधित कुटुंबावर आर्थिक संकट ओढवल्याचा आरोप करत या प्रकरणी न्याय मिळावा या मागणीसाठी सोमवार दि. २७ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता एसबीआयच्या जुळे सोलापूर शाखेसमोर लोकशाही मार्गाने 'अंत्यविधी तिरडी आंदोलन' करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र लोकाधिकार समितीचे कार्याध्यक्ष योगेश वाघमारे आणि राजश्री जेऊरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. शरणप्पा पुंडलिक जेऊरे यांचे पगार खाते बँकेने कोणतेही न्याय्य कारण नसताना बंद केल्याचा आरोप करण्यात आला. वास्तविक पाहता कर्ज प्रकरणी पूर्णपणे खाते बंद न करण्याचे आदेश उपनिबंधकांनी दिले आहेत. याबाबत वारंवार तक्रारी व हरकती करूनही बँक प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याने हे आंदोलन करण्यात येत आहे. या पत्रकार परिषदेला नंदकुमार लोखंडे, ॲड.सुप्रिया शिरदाळे, ओंकार बासके आदी उपस्थित होते.



# 'डीसीसी'च्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करा

### उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाचा आदेश; ४ आठवड्यांची मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जुलै**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (डीसीसी) निवडणुकीचा कार्यक्रम येत्या चार आठवड्यात जाहीर करून कायद्यानुसार संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठातील न्यायमूर्ती मिलिंद जाधव आणि न्यायमूर्ती नांदेश देशपांडे यांनी दिले आहेत. ॲड. अभिजित कुलकर्णी यांनी ही माहिती दिली.

नियमबाह्य कर्जपुरवठा, कर्जवसुलीतील दिरंगाई आणि अन्य कारणांमुळे २०१८ मध्ये तत्कालीन राज्य सरकारने सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती केली होती. आठ वर्षापासून बँकेवर प्रशासकीय राजवट असल्याने बावची वि.का.स. सोसायटीने बँकेची निवडणूक घेण्याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तिच्या सुनावणीवेळी न्यायालयाने निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला.

यापूर्वी झालेल्या सुनावणीत प्रशासकांना प्रतिज्ञापत्रासह निवडणुकीचा कार्यक्रम देण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. दरम्यान प्रशासकांनी प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले होते. यात बावची विविध कार्यकारी सेवा सोसायटीतर्फे ॲड. सारंग आराध्ये, ॲड. अभिजित कुलकर्णी, ॲड. शंतनू गुरव, ॲड. ज्ञानेश्वरी उत्पात, बँकेच्यावतीने ॲड. भूषण वाळिंबे, ॲड. वर्षा काळे, ॲड. प्रिती वाळिंबे तर सरकारतर्फे ॲड. एस.एच. कंकाळ यांनी काम पाहिले.

**देखरेख संस्थाप्रकरणी ३१ जुलैला सुनावणी**

सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था प्रकरणातही उच्च न्यायालयाने प्रशासकाला एप्रिल २०१७ पासून आजपर्यंत निवडणूक घेण्यासाठी कोणती पावले उचलली याची सविस्तर माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. या याचिकेची पुढील सुनावणी ३१ जुलै रोजी आहे. या सुनावणीत प्रशासकाने गेल्या नऊ वर्षांत निवडणूक घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा तपशील न्यायालयासमोर मांडावा लागणार आहे.

## ज्येष्ठ नागरिकांच्या स्वअर्जित मालमत्तेच्या संरक्षणाला उच्च न्यायालयाचा दुजोरा

### सुनेची याचिका फेटाळली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ जुलै-**

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने ज्येष्ठ नागरिकांच्या स्वअर्जित मालमत्तेच्या संरक्षणाला महत्त्व देत सुनेने दाखल केलेली रिट याचिका फेटाळून लावली आहे. न्यायमूर्ती शैलेश पी. ब्रह्मे यांनी दि. २२ जुलै रोजी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

या प्रकरणात बार्शी येथील ज्येष्ठ नागरिक लता शिंदे व अनिल शिंदे यांनी ज्येष्ठ नागरिक कायदा २००७ अंतर्गत अर्ज दाखल करुन त्यांच्या स्वअर्जित घरातून सुनेला बेदखल करण्याची मागणी केली होती. उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे तसेच अपील प्राधिकरणाने ज्येष्ठ नागरिकांच्या बाजूने आदेश दिला होता. त्या आदेशाला आव्हान देत सुनेने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. प्रतिवादी ज्येष्ठ नागरिकांच्यावतीने संबंधित घर हे प्रतिवादींची स्वअर्जित मालमत्ता असून, याचिकाकर्तीकडून मानसिक व शारीरिक त्रास, धमक्या आणि सततचा छळ होत असल्याने ज्येष्ठ नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी बेदखलीचा आदेश आवश्यक असल्याचा युक्तिवाद केला.

उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा संदर्भ घेत स्पष्ट केले की, ज्येष्ठ नागरिकांच्या जीवन व मालमत्तेच्या संरक्षणासाठी आवश्यक असल्यास बेदखलीचा आदेश देण्याचा अधिकार संबंधित प्राधिकरणाला आहे. सदर प्रकरणात प्रतिवादींची मालमत्ता स्वअर्जित असल्याचे तसेच बेदखलीचा आदेश कायदेशीर व न्याय्य असल्याचे न्यायालयाने नमूद करत याचिका फ `टाळली. ज्येष्ठ नागरिकांतर्फे ॲड. शरद टी. भोसले यांनी काम पाहिले.



## आमदार राऊत यांच्या वृक्षारोपण संकल्पास बाल वारकऱ्यांची साथ

### सुयश विद्यालयाच्या चिमुकल्यांचा वाटा

**तसा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २५ जुलै**

आमदार राजेंद्र राऊत यांच्या हरित बार्शी या वृक्षारोपण संकल्पाला प्रतिसाद देत सुयश विद्यालय, बार्शी येथील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त आयोजित बाल दिंडीमध्ये वृक्षारोपणाचा संदेश देत पर्यावरण संवर्धनाचा आदर्श ठेवला.

शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी आयोजित उपक्रमात विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणीसह संतांच्या आकर्षक वेशभूषा परिधान करुन वारकरी संस्कृतीचे दर्शन घडवले. टाळ-मृदंगाच्या गजरात निघालेल्या दिंडीत विद्यार्थ्यांनी झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण वाचवा, भविष्य घडवा अशा पर्यावरणपूरक घोषणा दिल्या.

दिंडीचे रुपांतर वृक्षारोपण मोहिमेत करत विद्यार्थ्यांच्या हस्ते करंज, आवळा, जांभूळ, वड आणि पिंपळ यासारख्या वृक्षांची लागवड केली. वृक्षांचे महत्त्व, संवर्धन सम जावून सांगण्यात आले. उपक्रम ास संस्थेचे संस्थापक शिवदास नलवडे, मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, मुख्याध्यापिका अलका जगताप, उपमुख्याध्यापक येवले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



## आदिवासी पारधी महासंघातर्फे शिक्षणाधिकारी जगताप यांचा सन्मान

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

आदिवासी पारधी महासंघाचे कार्याध्यक्ष नरेंद्र चव्हाण, माजी नगरसेविका व भटके विमुक्त संघटनेच्या महिला अध्यक्षा राजश्री चव्हाण,अनिल चव्हाण यांनी शुक्रवारी जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयात येऊन माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. याप्रसंगी बहुजन शिक्षक महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, प्राचार्य डॉ. औदुंबर जाधव, प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, प्रा. अनुराधा पाटील, प्रा राजदत्त रसोलगीकर, प्रा विकास काटकर, प्रा. माधव पाटील, प्रा. सागर शिंदे, प्रा. सचिन वाघमोडे, डॉ. घनश्याम भोसले, दादासाहेब शिंदे, विश्वास गजभर, ॲड. रोहिणी गायकवाड, दिलीप चौगुले, सचिन जगताप उपस्थित होते.



## संघर्ष प्रतिष्ठानच्या शिबिरात १४२ रक्तदात्यांचे रक्तदान

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

लस्कार येथील साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय येते मेडिकेअर ब्लड बँक सोलापूर यांच्या सहकार्य याने राणी अवंतीबाई लोधा यांच्या जयंतीनिमित्त संघर्ष प्रतिष्ठान च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरात १४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी आयोजक आदित्य लंगडेवाले, नगरसेवक रवी कय्यावाले, क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे, नगरसेवक भारतसिंग बडूरवले, लष्कर मातंग समाज अध्यक्ष भीमराव गायकवाड, लोधी समाजाचे ज्येष्ठ नेते नागनाथ शिवसिंगवाले, मच्छिंद्र लोकेकर, विश्वेश्वर गायकवाड, उपमुख्य सफाई अधीक्षक फुरडे, सॅनिटरी इन्स्पेक्टर जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जयंती अध्यक्ष राहुल कैय्यावाले, उपाध्यक्ष विवेक पारसवार, उपाध्यक्ष राज बाबावाले, कार्याध्यक्ष सुनील मंनसावाले, खजिनदार शुभम मंनसावले, सह खजिनदार अभिषेक अलकुंडे, सचिव जयसिंग कल्लावाले, सह सचिव चंदन गोरलेवाले, मिरवणूक प्रमुख शुभम लंबूवाले, अजय चौधरी, गोविंद शाहिरवाले, विनायक म्हेत्रे, विशाल सूर्यवंशी, नरेश पालके, दशरथ बतूल उपस्थित होते.

## शंकर कारखान्याच्या गळित हंगामाचे रोलर पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २५ जुलै-**

श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर या कारखान्याच्या गळीत हंगाम २०२६-२७ च्या रोलर पूजनाचा कार्यक्रम आज कारखाना स्थळावर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

.यावेळी कारखान्याचे चेअरमन मा. आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, व्हा. चेअरमन ॲड. मिलिंद कुलकर्णी, जि. प. सदस्य अर्जुनसिंह मोहिते - पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, ॲड. नितीन खराडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष देवीदास ढोपे, आर पीआयचे जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले, सरपंच विरकुमार दोशी, उदय धाईजे, विष्णू भोंगळे, शिवराज निबाळकर, एकनाथ वाघमोडे , सतिश फडतरे, शेतकरी संघटनेचे दत्ता भोसले, संतोष शिंदे, माऊली निबाळकर, बलभिम निंबाळकर, बबन भुजबल, तुकाराम चव्हाण, जगनाथ जाधव, सागर उरवणे उपस्थित होते.



तसेच कारखान्याचे संचालक दत्तु रणनवरे, ॲड सुरेश पाटील, महादेव शिंदे, बाळासाहेब माने, दादा पाटील, सुधाकर पोळ, शिवाजी गोरे, सुनिल माने, सदाशिव वाघमोडे पाटील, रामदास कर्णे, रणजित पाटील, सचिन लोकरे, रामभाऊ खुळे, अर्जुन धाइंजे, तसेच कारखान्याचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर स्वरूप देशमुख, कार्यकारी संचालक अभिजित डुबल, रविराज जगताप, समाधान कागदे, अभिजित माने, आनंदराव गायकवाड, संजय मोरे, निलेश जाधव, कैलास कदम, राहुल मगर, ज्ञानदेव पवार, उत्तम सपकाळ, पंकज फडतरे उपस्थित होते.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मोडनिंबमध्ये विविध सामाजिक उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २५ जुलै-**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमि त्त मोडनिंब (ता.माढा) येथे भारतीय जनता पार्टी आणि ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष वैभव मोरे यांच्या पुढाकारातून विविध सामाजिक उपक्रम पार पडले.



श्री स्वामी समर्थ चौक म ोडनिंब येथे श्रीक्षेत्र भगवानगड व श्रीक्षेत्र नारायणगड पायी दिंडीतील वारकऱ्यांसाठी अन्नदान करण्यात आले. जिल्हा परिषद मुलांची व मुलींची शाळा, मोडनिंब येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ पार पडला. माजी सभापती शिवाजी कांबळे, वैभव मोरे, कैलास तोडकरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विविध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर माजी सभापती शिवाजी कांबळे,जिल्हा उपाध्यक्ष वैभव मोरे, कैलास तोडकरी, युवा मोर्चाचे प्रशांत पाटील, आसिफ अत्तार, शहराध्यक्ष राहुल गांधी, चांगदेव वरवडे, सत्यनारायण गिड्डे,राहूल पाटील, राजेश निंबाळकर, संतोष पाटील मुख्याध्यापक राजन सावंत उपस्थित होते. आभार मुख्याध्यापक सावंत यांनी मानले. त्यानंतर मोडनिंब येथील पशुवैद्यकीय रुग्णालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शिवाजी कांबळे, वैभव मोरे, कैलास तोडकरी, राहुल गांधी, दिपक सुर्वे, राहुल केदार, विशाल पाटील, हनुमंत कुंभार, लखन पाटील,वाल्मिक जाडकर, अनिकेत गुरव, शहाजी माळी, अमोल काटकर, डॉ. मोरे, नवनाथ मोहिते, अमोल सरडे, रोहन शिंदे उपस्थित होते.

# रेशनच्या तांदळाची काळ्या बाजारात तस्करी

### बार्शीत तब्बल ८० कट्टे तांदळासह ९ लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ जुलै-**

सार्वजनिक वितरण प्रणाली (रेशन) अंतर्गत मिळणाऱ्या शासकीय तांदळाची काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणाऱ्या टोळीवर बार्शी तालुका पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी सापळा रचून तब्बल ४,६९० किलो (८० कट्टे) तांदूळ आणि पिकअप वाहनासह ८ लाख ९८ हजार २३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि अक्षय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम सुरु आहे. रेशनच्या तांदळाची अवैध वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी बार्शी-सोलापूर रोडवरील सौंदरे गावच्या परिसरात सापळा रचला. संशयास्पद वाटणारे महिंद्रा मॅक्स पिकअप (क्र. एमएच १३ डी क्यू ६१८४) अडवून तिची तपासणी केली. तपासणीत वाहनाम ध्ये प्लास्टिकच्या कट्ट्यांमध्ये भरलेला ४,६९० किलो तांदूळ आढळून आला. संबंधित तांदूळ हा रेशनचा असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी वाहन व धान्य ताब्यात घेतले. पुढील तपासणी व खातरजमा करण्यासाठी हा साठा तहसील कार्यालय, बार्शी येथील पुरवठा निरीक्षकांकडे पाठवला. पुरवठा निरीक्षकांनी सदर तांदूळ रेशनचा असल्याचा अहवाल दिला. अहवालाच्या आधारे पुरवठा निरीक्षकांच्या फिर्यादीवरून आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. दिगंबर उर्फ आमरुषी सुरवसे, विवेक उर्फ भगवान सुरवसे (रा. बार्शी), अक्षय बारसकर (रा. दत्तनगर, वैराग) अशी आरोपींची नावे आहेत.

सदरची यशस्वी कारवाई सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, आणि बार्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सपोनि अक्षय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार युवराज गायकवाड, सिद्धेश्वर लोंढे, अमृत खेडकर आणि लक्ष्मण चित्तलवाड यांनी या कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि अक्षय सोनवणे करत आहेत.




बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे, काळाबाजार आणि सम ाजविघातक कृत्यांविरोधातील अशा धडक कारवाया यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहतील.
**-अक्षय सोनवणे,**
सहायक पोलीस निरीक्षक, बार्शी तालुका पोलिस ठाणे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि.सोलापूर सब डि.व ता.बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु.पल. हद्दीतील गट नं. १३९९/१/१/१/२ पैकी प्लॉट नं. २१ याचे क्षेत्र १५०.०० चौ.मी. यासी चतुः सिमा पुर्वेस - प्लॉट नं. -२० , दक्षिणेस - प्लॉट नं ६ मीटर चा रोड, पश्चिमेस - प्लॉट नं.- २२ व उत्तरेस - प्लॉट नं. १४ येणे प्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकत आतील तदंगभुत वस्तुहक्कासह वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह सौ. लक्ष्मी कृष्णा माळी, रा. बार्शी, ता. बार्शी याचे खरेदी मालकी कब्जे वहीवाटीची आहे. सौ. लक्ष्मी कृष्णा माळी यांनी घर बांधकामासाठी आमचे अशिल सांगली अर्बन को-ऑप. बँक लि. सांगली, शाखा - बार्शी या बँकेकडे कर्जाची मागणी केली व त्यांना १९,८५,०००/- चे कर्ज मंजूर केले आहे. वर नमुद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालक कर्जदार यांनी दिलेला आहे. सदर कर्जास सदर मिळकत ही कर्जदार म्हणुन गहाणखत करून देण्याची सौ. लक्ष्मी कृष्णा माळी यांनी घेतलेल्या कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे.

वर नमुद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, निज, बोजा, साठेखत खरेदीखत, कर्जबोजाचे, बक्षिस वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणचीही तक्रार चालणार नाही कोणचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली आहे. ता. २५/०७/२०२६

सही/-
श्री. प्रसाद जा. कुलकर्णी, ॲडव्होकेट
बी. एस. एल. एल एल. बी
पत्ता - लक्ष्मी नृसिंह, ७३०/२/४४/ अ
सिद्धेश्वर नगर, कासारवाडी रोड,
बार्शी. फो. ९४२३३ ३२०४८

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### गोल्फपटू दीक्षा डागर पुढील फेरीसाठी पात्र



**डंडोनल्ड लिंक्स :** स्कॉटलंड येथे सुरू असलेल्या महिला स्कॉटिश ओपन गोल्फ स्पर्धेत दुसऱ्या फेरीत भारतीय गोल्फपटू दीक्षा डागरने 'वन-ओव्हर ७३' (एक स्ट्रोक जास्त) अशी कामगिरी नोंदविली आणि ती स्पर्धेच्या पुढील टप्प्यासाठी पात्र ठरणारी एकमेव भारतीय ठरली. ७४ आणि ७३ अशा फेऱ्यांनंतर तिची एकूण गुणसंख्या '३-ओव्हर' (पारापेक्षा ३ स्ट्रोक जास्त) इतकी आहे आणि ती संयुक्तपणे ३५ व्या स्थानावर आहे; स्पर्धेतील अजून दोन फेऱ्या शिल्लक आहेत. प्रणवी उर्स (८४-७१) हिच्या दोन फेऱ्यांमधील कामगिरीत १३ स्ट्रोक्सचा फरक होता; ती '११-ओव्हर'वर राहिली आणि तिला 'कट' गाठता आला नाही. तसेच अवनी प्रशांत (८०-७७) हिलाही 'कट' गाठण्यात अपयश आले. या स्पर्धेत 'कट'ची रेषा '+६' वर निश्चित झाली आणि ६५ खेळाडूंनी अंतिम टप्प्यातील फेऱ्यांसाठी पात्रता मिळवली. दीक्षाने दुसऱ्या, सातव्या आणि १४ व्या होलवर 'बर्डीज' (पारापेक्षा एक स्ट्रोक कमी) मिळवले, परंतु तिसऱ्या, सहाव्या, १३ व्या आणि १५ व्या होलवर तिचे स्ट्रोक्स वाया गेले (ड्रॉप झाले). सध्या 'एलईटी' ऑर्डर ऑफ मेरिटमध्ये पहिल्या १० खेळाडूंमध्ये असलेल्या दीक्षाला, पुढील आठवड्यात होणाऱ्या 'एआयजी महिला ओपन गोल्फ' स्पर्धेत स्थान मिळविण्यासाठी दमदार कामगिरीची गरज आहे. कोरियाच्या जेनी शिनने आदल्या दिवसाचा फॉर्म कायम राखत उत्कृष्ट कामगिरी केली आणि स्पर्धेच्या मध्यावर पाच स्ट्रोक्सची आघाडी घेतली.

### वोझिन्हा चिलीच्या क्लबशी करारबद्ध

**केप वर्दे :** अलिकडेच फिफा फुटबॉल विश्वचषकात आश्चर्यकारक कामगिरी करणारा केप वर्देचा गोलरक्षक वोझिन्हा याने चिलीच्या कोलो कोलो संघात सहभागी होण्यासाठी करार केला आहे, असे क्लबचे अध्यक्ष अनिबल मोसा यांनी सांगितले. ४० वर्षीय वोझिन्हा आता कोलो कोलोचा खेळाडू असेल, लवकरच तो वैद्यकीय तपासणीसाठी चिलीला प्रवास करेल आणि त्यानंतर एस्टाडियो मॉन्युमेंटल येथे तो अधिकृतपणे संघात प्रवेश करेल, असे मोसा यांनी डेपोर्टेस लिमाचे विरुद्धच्या कोलो कोलोच्या लीग सामन्यापूर्वी पत्रकारांना सांगितले. वोझिन्हाच्या विश्वचषकातील कामगिरीने हे दाखवून दिले आहे की तो या करारास पात्र आहे, तसेच या करारामध्ये चिलीच्या संघासाठी विपणनाच्या दृष्टीनेही आकर्षण आहे, असेही ते म्हणाले. जरी हा करार अद्याप अंतिम झालेला नसला तरी, कोलो कोलोने समाज माध्यमावर एक फोटो पोस्ट करून या कराराची झलक दाखविली आहे.



वोझिन्हा

# भारताने जिंकली टी-२० मालिका

**। दुसऱ्या सामन्यात झिम्बाब्वेवर ९० धावांनी विजय । ईशान किशन, तिलक वर्माची अर्धशतके**

**भारत ५ बाद २१९**
**झिम्बाब्वे सर्वबाद १२९**



सामनावीर ईशान किशन



तिलक वर्मा

**हरारे, २५ जुलै**

हरारे स्पोर्ट्स क्लबवर शनिवारी झालेल्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात यष्टिरक्षक-फलंदाज ईशान किशन आणि उपकर्णधार तिलक वर्माच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने झिम्बाब्वेवर ९० धावांनी विजय शानदार विजय नोंदविला आणि तीन सामन्यांची टी-२० मालिका २-० ने खिशात घातली. आता रविवारी याच मैदानावर उभय संघादरम्यान होणारा मालिकेतील तिसरा व अंतिम सामना केवळ औपचारिकता ठरेल. विदर्भाचा वेगवान गोलंदाज यश ठाकूरने पदार्पणातच ३० धावांत २ बळी टिपण्याची किमया केली.

झिम्बाब्वेने प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केल्यानंतर ईशान किशन व तिलक वर्माच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने २० षटकांत ५ बाद २१९ अशी दमदार धावसंख्या उभारली. प्रत्युत्तर देताना झिम्बाब्वेचा संपूर्ण संघ १७.५ षटकांत १२९ धावांतच गारद झाला.

ईशान किशनने ४४ चेंडूंत ९ चौकार व २ षट्कारांसह ८१ धावांची धडाकेबाज खेळी केली व त्याने क्षेत्ररक्षण करताना दोन झेल पकडले. त्यालाच सामनावीर पुरस्कार देण्यात आला. तिलक वर्माने २९ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ६० धावांची खेळी करीत डावाला बहारदार शेवट करून दिला व भारताला २१० धावांचा टप्पा ओलांडण्यास मदत केली. ईशान किशनने श्रेयस अय्यरसोबत तिसऱ्या गड्यासाठी ६६ धावांची, तर तिलक वर्मासोबत चौथ्या गड्यासाठी ९४ धावांची भागीदारी केली. श्रेयस अय्यरने २९ चेंडूत २५ धावांची भर घातली. अभिषेक शर्माने (८) सिकंदर रझाच्या पहिल्या षटकांत सलग दोन चौकार मारून संघाला वेगवान सुरुवात करून दिली. मात्र, दुसऱ्या षटकात ब्लेसिंग मुझराबानीने त्याला बाद केले. गत सामन्यात आपले पहिले टी-२० अर्धशतक झळकावणाऱ्या सलामीवीर वैभव सूर्यवंशीला (२०) तिसऱ्या षटकांत रिचर्ड नगारवाने शेवटच्या चेंडूवर स्वतःच झेल घेत बाद केले.

धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेचा सलामीवीर ब्रायन बेनेटने तेवढी एकाकी झुंज देत ३२ धावा केल्या. ब्रेनेटसह डियॉन मेयर्स (१२), रायन बर्ल (२०), ताडीवानाशे मारूमनी (२४) व ब्रॅड इव्हान्स (१९) हे पाच फलंदाजच दोन अंकी धावा करू शकले, मात्र इतर फलंदाज भारताच्या युवा गोलंदाजांसमोर खेळपट्टीवर फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत. डावखुरा फिरकीपटू अभिषेक शर्माने ३ बळी, यश ठाकूर व प्रिन्स यादवने प्रत्येकी २ बळी, तर रवी बिश्नोई, शिवम दुबे व तिलक वर्माने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

### विदर्भाच्या यश ठाकूरचे पदार्पणात दोन बळी



विदर्भाचा वेगवान गोलंदाजां यश ठाकूरला झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्याच्या माध्यमातून प्रथमच भारताचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली आहे. यश ठाकूर भारताचा १२४ वा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू झाला. पदार्पणातच त्याने दोन बळीची नोंद केली. गत महिन्यात भारताच्या टी-२० संघाचे कर्णधारपद स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच नाणेफेक हरलेल्या श्रेयस अय्यरने संघात एका बदलाची घोषणा केली. गत टी-२० सामन्यात पदार्पण करणाऱ्या अशोक शर्माच्या जागी विदर्भाच्या यश ठाकूरला भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी देण्यात आली.

# झंडू कुमारने जिंकले भारताचे पहिले पदक

**ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा**
**ग्लासगो, २५ जुलै**

भारताच्या झंडू कुमारने शुक्रवारी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या हेवीवेट पॅरा पॉवरलिफ्टिंग प्रकारात कांस्यपदक जिंकले. या स्पर्धेतील भारताचे हे पहिलेच पदक ठरले.पोलिओ, गरिबी आणि उदरनिर्वाहासाठी केलेली अनेक छोटी-मोठी कामे अशा आव्हानात्मक बालपणावर मात करीत २८ वर्षीय कुमारने १८१ किलो आणि १९० किलो वजन यशस्वीपणे उचलत एकूण १३०.९ गुण मिळविले व पदक विजेत्यांच्या यादीत स्थान मिळविले.

मात्र, १९६ किलो वजन उचलण्याचा त्याचा अंतिम प्रयत्न अयशस्वी ठरला. या स्पर्धेत सहभागी असलेला दुसरा भारतीय खेळाडू सुधीर (११४.१ गुण) सहाव्या स्थानावर राहिला. नायजेरियाच्या इद्रिस रिलुवानने १३२.८ गुणांसह सुवर्णपदक जिंकले, तर मॅथ्यू हार्डिंगने (१३१ गुण) रौप्यपदक पटकावले.

कुमारचा हा विजय बिहारमधील नालंदा जिल्ह्यातील हरनौत गावापासून सुरू झालेल्या त्याच्या उल्लेखनीय प्रवासाचा कळस ठरला. वयाच्या पाचव्या वर्षी पोलिओची लागण झाल्यानंतर, कुटुंबाला आर्थिक आधार देण्यासाठी तो आपल्या पालकांना भाजीपाला विकण्याच्या कामात मदत करत असे. आर्थिक पाठबळ कमी असतानाही, कुमारने सुरुवातीला २०१० ते २०१२ या काळात केवळ शारीरिक ताकद वाढवण्यासाठी वजन उचलण्याचा सराव सुरू केले होता त्यानंतर त्याने गोळाफेक व भालाफेक या खेळांमध्येही प्रयत्न केले. (वृत्तसंस्था)



हेवीवेट पॅरा पॉवरलिफ्टिंगमध्ये कांस्यपदक जिंकल्यानंतर आनंद साजरा करताना भारताचा झंडू कुमार

### पंतप्रधान मोदींकडून झंडू कुमारचे कौतुक

**नवी दिल्ली :** ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या हेवीवेट प्रकारात कांस्यपदक जिंकून भारताचे खाते उघडणाऱ्या, मूळचे बिहारचे रहिवासी असलेल्या पॅरा पॉवरलिफ्टर झंडू कुमार याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी अभिनंदन केले. पदक जिंकल्यानंतर काही वेळातच 'एक्स'वर प्रतिक्रिया देताना पंतप्रधानांनी झंडूच्या जिद्दीचे कौतुक केले आणि त्याच्या या यशामुळे देशाला अभिमान वाटत असल्याचे म्हटले. 'झंडू कुमारची अत्यंत प्रभावी कामगिरी! त्याने पुरुषांच्या हेवीवेट पॅरा पॉवरलिफ्टिंग प्रकारात कांस्यपदक जिंकून राष्ट्रकुल स्पर्धेत भारताच्या पदकांची सुरुवात केली आहे,' असे पंतप्रधान मोदींनी 'एक्स'वर लिहिले.

# सचिन सिवाचची आगेकूच

**ग्लासगो, २५ जुलै**

२३ व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या ६० किलो वजनी गटाच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत अंतिम-३२ खेळाडूंच्या फेरीत भारताच्या सचिन सिवाचने कॅनडाच्या केओमा अल-अहमदिएहवर ४-१ अशा गुणांनी विजय मिळवला आणि उपांत्य-पूर्व फेरी गाठली. आता सचिनचा सामना इंग्लंडच्या विल्यम हेविटशी होणार आहे.

राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेचा माजी विजेता असलेल्या २६ वर्षीय सचिनचा सुरुवातीचा 'राईट हुक'चा प्रयत्न फसला, कारण कॅनेडियन खेळाडूने तो चपळाईने चुकवला. याला प्रत्युत्तर म्हणून किओमाने सचिनच्या चेहऱ्यावर उजव्या हाताने ठोसा मारला. मात्र, त्यानंतर भारतीय खेळाडूने सामन्यावर पकड मिळविली. पहिल्या फेरीत पंचांनी सचिनच्या बाजूने १०-९ असे गुण दिले होते.

पहिली फेरी गमावल्यानंतर सावरण्याच्या उद्देशाने किओमाने दुसऱ्या फेरीत आक्रमकता वाढवली. दबावाखालीही सचिनने संयम राखला; त्याने प्रतिस्पर्ध्याचे अनेक वार चुकवले आणि त्यानंतर प्रति-आक्रमण करत अचूक ठोशांची मालिका चढवली. त्याच्या या शिस्तबद्ध खेळाला पाचही पंचांनी १०-९ असे गुण दिले, त्यामुळे सचिनने ही फेरी ५-० अशी जिंकली.



कॅनडाच्या केओमा अल-अहमदिएहला ठोसा मारताना भारताचा सचिन सिवाच (निळी जर्सी)

तिसरी फेरीही अत्यंत चुरशीची ठरली. कॅनेडाच्या किओमने सचिनला कडवी झुंज दिली आणि तिसरी फेरी २-३ अशी जिंकली, तरीही सचिनने विजयासाठी आवश्यक कामगिरी आधीच केली होती. किओमने बर्मिंगहॅम २०२२ राष्ट्रकुल स्पर्धेत ५७ किलो गटात कांस्यपदक जिंकले होते. (वृत्तसंस्था)

### मोहन बागानचा ईस्ट बंगालवर विजय

**कोलकाता, २५ जुलै**

मोहन बागान सुपर जायंटने प्रतिष्ठेच्या ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेत आपल्या मोहिमेची सुरुवात कट्टर प्रतिस्पर्धी ईस्ट बंगालवर एका गोलने मिळवलेल्या संघर्षपूर्ण विजयाने केली. सलामीच्या सामन्यातील मोहन बागानच्या विजयात साहल अब्दुल समदने उत्तरार्धात केलेला गोलची महत्त्वपूर्ण ठरला.

इंडियन सुपर लीग जिंकल्यानंतर राष्ट्रीय स्तरावर पहिल्यांदाच खेळणाऱ्या ईस्ट बंगालसाठी हा पराभव एक धक्का ठरला. तथापि, सामन्याचा निकाल खेळातील प्रत्यक्ष चुरशीचे पूर्णपणे प्रतिबिंब दर्शवित नव्हता, कारण दोन्ही संघांकडे पूर्ण ताकदीचे संघ उपलब्ध नव्हते आणि अनेक मुख्य खेळाडू अजूनही संघाच्या शिबिरात सहभागी झालेले नव्हते. (वृत्तसंस्था)

# भारतीय जलतरणपटू ४०० मीटर फ्रीस्टाईलच्या अंतिम फेरीतून बाहेर

**ग्लासगो, २५ जुलै**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ४०० मीटर फ्रीस्टाईल जलतरण प्रकाराच्या अंतिम फेरीसाठी भारतीय जलतरणपटू दक्षन शशिकुमार व आर्यन नेहरा पात्र ठरू शकले नाहीत. टोलक्रॉस स्विमिंग सेंटर येथे झालेल्या या शर्यतींमध्ये दोन्ही जलतरणपटूंना आपापल्या प्राथमिक फेरीमधून पुढील फेरी गाठण्यात अपयश आले.

४०० मीटर फ्रीस्टाईलच्या प्राथमिक फेरीत शशिकुमार १५ व्या आणि नेहरा १६ व्या स्थानावर राहिले. शनिवारी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय जलतरणपटूंची निराशाजनक कामगिरी पाहायला मिळाली. दक्षन शशिकुमार (३:५८.०९ सेकंद) आणि आर्यन नेहरा (४:००.२६ सेकंद) हे दोघेही ४०० मीटर फ्रीस्टाईल प्रकाराच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरण्यात अपयशी ठरले.



आर्यन नेहरा

शशिकुमार शर्यतीच्या अर्ध्या टप्प्यावर सातव्या स्थानावर पोहोचला होता, परंतु आपली 'हीट' जिंकून किंवा पात्र ठरण्याइतपत चांगली कामगिरी त्याला करता आली नाही. चौथी 'हीट' खेळताना नेहरा अर्ध्या टप्प्यावर शेवटच्या स्थानावर होता आणि शर्यत संपतानाही तो त्याच स्थानावर राहिला. (वृत्तसंस्था)

# रूपा, पिंकीचा सलग तिसरा विजय

**ग्लासगो, २५ जुलै**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील महिलांच्या 'लॉन बोल्स' दुहेरी गटातील सामन्यात, रूपा राणी तिर्की आणि पिंकी या भारतीय जोडीने टोंगाच्या पॅरिस बेकर व मिलिका नॅथन यांच्याकडून मिळालेल्या कडव्या आव्हानावर मात केली. शनिवारी झालेल्या या सामन्यात त्यांनी संयमी खेळ करत 'टाय-ब्रेकर'मध्ये विजय निश्चित केला. या भारतीय महिला जोडीचा हा सलग तिसरा विजय ठरला.

भारतीय जोडीने सावध सुरुवात केली, परंतु पहिल्या 'एंड'मध्ये (फेरीत) त्यांना पराभव पत्करावा लागला आणि टोंगाने पहिल्या सेटमध्ये १-० अशी आघाडी घेतली. मात्र, दुसऱ्या 'एंड'मध्ये त्यांनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत त्वरित पुनरागमन केले. पिंकीने रूपा राणीला अचूक 'बोल' (गोळा) टाकण्यासाठी मार्गदर्शन केले; रूपाने टाकलेला तो 'बोल' थेट 'जॅक'च्या (लक्ष्याच्या) अगदी जवळ जाऊन थांबला, ज्यामुळे भारताने धावसंख्या १-१ अशी बरोबरीत आणली. त्याच लयीचा फायदा घेत भारतीय खेळाडूंनी उर्वरित सेटवर वर्चस्व राखले आणि ५-२ अशा फरकाने तो सेट जिंकून आणखी एका विजयाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले. (वृत्तसंस्था)



रूपा राणी तिर्की



पिंकी सिंग

# डंकन स्कॉटने जिंकले स्कॉटलंडसाठी पहिले सुवर्णपदक

**ग्लासगो, २५ जुलै**

येथे सुरू असलेल्या २३ व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत डंकन स्कॉटने स्कॉटलंडसाठी पहिले सुवर्णपदक जिंकले.

'टोलक्रॉस इंटरनॅशनल स्विमिंग सेंटर'मध्ये पुरुषांच्या २०० मीटर वैयक्तिक 'मेडले' शर्यतीच्या अंतिम फेरीत राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक जिंकल्यानंतर डंकन स्कॉटने आपली सुटकेची भावना व्यक्त केली.ऑलिम्पिकमध्ये आठ पदके जिंकणाऱ्या या २९ वर्षीय डंकन स्कॉटने १ मिनिट ५६.२८ सेकंदांची वेळ नोंदवित 'स्पर्धा विक्रम' प्रस्थापित केला आणि २०२६ च्या स्पर्धेत स्कॉटलंडसाठी पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. उत्साही प्रेक्षकांच्या उपस्थितीत स्कॉटने 'बॅकस्ट्रोक'च्या प्रारंभीच्या टप्प्यावर आघाडी घेतली व ती आघाडी अधिक वाढवली. अखेरीस त्याने न्यूझीलंडच्या लुईस क्लेअरबर्टच्या आधी शर्यत पूर्ण केली, तर ऑलिम्पिकमध्ये तीन सुवर्णपदके जिंकणाऱ्या इंग्लंडच्या टॉम डीनने कांस्यपदक पटकावले. मला फक्त सुरुवातीपासूनच आक्रमकपणे पुढे राहायचे होते, असे स्कॉट म्हणाला. (वृत्तसंस्था)



डंकन स्कॉट

# श्रीलंका दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघाची निवड पुढील आठवड्यात

### बुमराहच्या तंदुरुस्तीकडे सर्वांचे लक्ष

**बंगळुरू, २५ जुलै**

श्रीलंका विरुद्धच्या आगामी दोन सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेसाठी भारताचा संघ पुढील आठवड्यात जाहीर होणार असून, यात वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या तंदुरुस्तीबाबत विशेष चर्चा होणार आहे.

भारतीय संघ या दौऱ्याची सुरुवात १५ ऑगस्ट रोजी गॅले येथे होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्याने करणार असून त्यानंतर २३ ऑगस्टपासून कोलंबो येथे दुसरा कसोटी सामना खेळणार आहे.

इंग्लंडविरुद्ध लॉर्ड्सवर झालेल्या मालिकेचा निकाल ठरवणाऱ्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यातून बुमराहला बाहेर बसावे लागले होते; कारण त्याच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली होती आणि तिथे सूज आली होती. आम्ही बुमराहच्या प्रकृतीत होत असलेल्या सुधारणेवर लक्ष ठेवून आहोत. कसोटी मालिका सुरू होण्यास अजूनही सुमारे तीन आठवडे शिल्लक आहे, त्यामुळे त्याला सावरण्यासाठी आणि श्रीलंकेत संघात दाखल होण्यासाठी पुरेसा वेळ आहे, अशी माहिती या घडामोडींशी संबंधित एका सूत्राने दिली. तथापि, भारतीय संघ ४ ऑगस्टपर्यंत श्रीलंकेत पोहोचेल आणि तिथल्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी कोलंबोमधील 'नॉनडिस्क्रिप्ट्स क्रिकेट क्लब'वर चार दिवसांचा सराव सामना खेळण्याचे नियोजित आहे. पण बुमराह ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात संघासोबत प्रवास करू शकेल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



जसप्रीत बुमराह

दुसरीकडे, अनुभवी अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील संघात पुनरागमन करण्यास सज्ज आहे. त्याने जानेवारीत न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामना खेळला होता आणि श्रीलंकाविरुद्धच्या मालिकेत त्याच्या अष्टपैलू कौशल्याचा संघाला मोठा फायदा होऊ शकतो. इंग्लंडविरुद्धच्या अलीकडील तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेसाठी जडेजाची निवड करण्यात आली नव्हती. भारताने ही वन-डे मालिका १-२ ने गमावली होती. वेगवान गोलंदाजीची जबाबदारी बुमराह, मोहम्मद सिराज व प्रसिध कृष्णा यांच्यात विभागली जाण्याची शक्यता आहे, तर फिरकी गोलंदाजीची धुरा अनुभवी कुलदीप यादव सांभाळेल. त्याला साथ देण्यासाठी डावखुरा फिरकीपटू मानव सुथार असेल. सुथारने अलीकडेच अफगाणिस्तानविरुद्ध प्रभावी पदार्पण केले होते. तिसरा फिरकीपटू म्हणून वॉशिंग्टन सुंदरचा विचार होऊ शकतो. सुंदरने मुल्लानपूर येथे अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्याच्या दुसऱ्या डावात चार बळी घेतले होते; तसेच डावखुरा फिरकीपटू हर्ष दुबे हा अतिरिक्त संथ गतीचा गोलंदाज म्हणून संघात असेल. (वृत्तसंस्था)

# डोपिंगच्या अडथळ्यांनंतरही वर्चस्व गाजविण्यास भारतीय भारोत्तोलक सज्ज

**ग्लासगो, २५ जुलै**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताच्या भारोत्तोलन मोहिमेचे नेतृत्व ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती मीराबाई चानू करणार आहे. डोपिंग प्रकरणांमुळे तयारीच्या काळात आलेल्या अडचणींवर मात करून, या चार वर्षांनी होणाऱ्या स्पर्धेत आपले वर्चस्व कायम राखण्याचा भारतीय भारोत्तोलन संघाचा प्रयत्न असेल. मीराबाई चानू हिच्याकडून सुवर्णपदकाची आशा आहे. ती कोणत्याही अडचणीशिवाय आपले राष्ट्रकुल विजेतेपद कायम राखेल अशी अपेक्षा आहे.

स्पर्धेपूर्वीच भारताच्या पदकांच्या आशांना मोठा धक्का बसला. डोपिंगच्या अनेक नियमांच्या उल्लंघनामुळे भारोत्तोलन संघातील सदस्यांची संख्या १६ वरून ११ पर्यंत कमी करण्यात आली. यात सर्वात अलीकडील फटका म्हणजे ९६ किलो वजनी गटातील दिलबाग सिंग याला या आठवड्याच्या सुरुवातीला स्पर्धेतून माघार घ्यावी लागली, त्यामुळे संघाची ताकद आणखी कमी झाली. अडचणी असूनही राष्ट्रकुल भारोत्तोलनामध्ये भारत एक प्रबळ शक्ती म्हणून कायम आहे; विशेषतः चीन व उत्तर कोरिया यांसारख्या पारंपरिक दिग्गज देशांच्या अनुपस्थितीचा भारताला फायदा होत आहे.



मीराबाई चानू

**राष्ट्रकुल भारोत्तोलनात भारताचे वर्चस्व**

१९९०, २००२, २०१८ आणि २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये भारतीय भारोत्तोलकांनी सर्वोत्तम कामगिरी केली आहे. ४६ सुवर्णपदकांसह एकूण १३३ पदके जिंकून ऑस्ट्रेलियानंतर भारत या खेळात सर्वाधिक यशस्वी देश ठरला आहे. २०२२ च्या बर्मिंगहॅम स्पर्धेत भारताने ३ सुवर्ण आणि ३ रौप्यपदकांसह एकूण १० पदके जिंकून भारोत्तोलनाच्या पदक तालिकेत अव्वल स्थान पटकावले होते आणि आता ग्लासगो स्पर्धेतही अशाच दमदार कामगिरीची अपेक्षा आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महत्वाचे...




## रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर एलीटतर्फे महावीर हायस्कूलमध्ये मार्गदर्शन

**सोलापूर, दि. २५ जुलै-**
विकास नगर येथील श्री महावीर हायस्कूल येथे रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर एलीटच्या सौजन्याने सुशिक्षित किशोरी, सशक्त भविष्य या अभियानांतर्गत किशोरवयीन मुलींसाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. उर्वशी देशमुख यांनी विद्यार्थिनींना आरोग्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि जीवनमूल्यांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला पाटील यांनी प्रमुख वक्त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर एलीटचे अध्यक्ष संदीप कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रशालेचे माजी विद्यार्थी तथा कॅन्सरतज्ज्ञ डॉ. अवधूत डांगे यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थिनींना प्रेरणादायी वातावरण लाभले. आपल्या मार्गदर्शनात डॉ. उर्वशी देशमुख यांनी ९ ते १६ वयोगटातील किशोरवयीन मुलींमध्ये होणारे शारीरिक, भावनिक व मानसिक बदल याविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन राजेंद्र खोत यांनी केले. एस. बी. बिडवई यांनी आभार मानले.



## महापालिकेच्या वतीने लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २५ जुलै-**
सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने लोकमान्य टिळक यांच्या जयंती दिनानिमित्त टिळक चौक येथील लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास तसेच कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगरसेवक चेतन नरोटे, नगरसेवक नरसिंग असादे, विभागीय अधिकारी गायधनकर, महेश देवकर,सलमान माणियार,चंद्रकांत दोतुल,जयप्रकाश आम णगी,भास्कर सामलेटी, विश्वनाथ काबणे, सिद्धू तीमीगार, स्वप्निल बंदोडकर, प्रेम पवार उपस्थित होते.



## अरिहंत स्कूलमध्ये वृक्षारोपण

**सोलापूर, दि. २५ जुलै-**
सोलापूर येथील अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये पु.ना. गाडगीळ अँड सन्स यांच्यातर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास पु.ना.गाडगीळ सन्सचे सोलापूर झोनचे सेल्स हेड जितेंद्र जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महानंदा लिगाडे, सतीश दासरी, शिवराज काजळेकर, मोहन उडाणशिव, ओंकार वैद्य, गणेश गवळी यांच्यासह सोलापूर शाखेचे व्यवस्थापक हेमंतकुम ार साई आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ.अजय पोन्नम, संचालिका सुलक्षणा पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, पर्यवेक्षिका अर्चना महांकाळ, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



## लायन्स क्लब बार्शी रॉयलकडून विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

**बार्शी दि २५ जुलै -**
वखारिया विद्यालय, उपळे दुमाला या विद्यालयातील गरजू व गरजवंत विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आल्या. उपक्रमात पाचवीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थी व विद्यार्थिनीचा सहभाग होता.

उपक्रमासाठी चांगभले स्टीलचे मालक ला. राजेश चांगभले यांनी अर्थसहाय्य केले. प्रत्येक विद्यार्थ्याला अर्धा डझन वह्या दिल्या. साधारणत: ५० विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना या उपक्रमाचा लाभ झाला. कार्यक्रमासाठी क्लबचे अध्यक्ष मंगेश बागुल, जितेंद्र दोशी, सुनील पाटील, राजेश चांगभले, प्रोजेक्ट चेअरमन सचिन दोशी, वर्षा चांगभले, कावेरी बागुल, रेवडकर, वैष्णवी जाधव, मुख्याध्यापक दयानंद रेवडकर तसेच वखारीया विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# चरणसेवेतून युवा शक्तीचे दर्शन : देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'निर्मलवारी-समृद्धवारी' व 'चरणसेवा' उपक्रमाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२५ जुलै -**
चरणसेवा उपक्रमाच्या माध्यमातून डॉक्टर आणि स्वयंसेवकांनी आई वडिलांप्रम ाणे भक्तीभावाने थकलेल्या वारकऱ्यांची चरणसेवा केली. खऱ्या अर्थाने भारताच्या युवा शक्तीचे चित्र, भारत आणि महाराष्ट्र धर्म पाहायला मिळतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पंचायत समिती, पंढरपूर येथे ग्रामविकास आणि पंचायतराज विभागातर्फे आयोजित 'निर्मलवारी-समृद्धवारी' आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते.



फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात वारकऱ्यांसाठी सुविधा उपलब्ध करुन देणे राज्य शासनाचे कर्तव्य आहे. त्यादृष्टीने २०१६ पासून विविध सेवा सरकार देत आहे. पंढरपूर येथील वाळवंट स्वच्छ करुन चंद्रभागा नदीचे पाणी स्वच्छ पोहोचविण्याच्यादृष्टीने व्यवस्था केली आहे. सुमारे ३० ते ३५ लाख वारकरी पंढरपूर येथे आल्यानंतरही संपूर्ण पंढरपूर स्वच्छ दिसत आहे. वारीचा कालावधी संपल्यानंतरही पंढरपूर असेच स्वच्छ राहील, अशी अपेक्षा फडणवीस यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांनी यावेळी लोकप्रतिनिधी, सोलापूर, सातारा आणि पुणे जिल्हाप्रशासन, पोलीस प्रशासन, विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी, निर्मलवारीमध्ये विविध परंपरांच्या माध्यमातून जनजागृती करणारे कलावंत तसेच वारी यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व घटकांचे कामाचे कौतुक केले.

### उत्कृष्ट काम केलेल्यांचा मुख्यमंत्र्यांकडून सन्मान

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते स्वच्छ भारत मोहिमेत महाराष्ट्र प्रथम स्थानी आल्याबद्दल संचालक शेखर रौंदळ तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रमात सेवा बजावणाऱ्या डॉक्टर व सेवा भावी संस्था आणि आषाढी वारीतील स्वच्छतादूतांचा सन्मान केला. 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२६' बोधचिन्हाचे अनावरणही करण्यात आले.

गोरे म्हणाले, स्वच्छता कर्मचाऱ्यांनी जबाबदारी न समजता सेवा म्हणून कार्य केले. यामुळे ही संपूर्ण वारी साथीच्या रोगापासून मुक्त झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी आषाढी वारीमध्ये सहभागी वारकऱ्यांसाठी उपलब्ध केलेल्या सुविधांची माहिती दिली. सातारा, सोलापूर जिल्ह्यात १३ लाख चौरस फूट जर्मन हँगर, ७ लाख ८० चौरस फूट जलरोधक मंडप उभारल्याचे सांगितले.

कार्यक्रमात 'निर्मलवारी-समृद्धवारी' व 'चरणसेवा' उपक्रमाचे माहितीपट दाखविण्यात आले. कार्यक्रमाला आमदार राजेंद्र राऊत, गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, नारायण पाटील, नंदकिशोर महाजन, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, विभागीय आयुक्त शितल तेली-उगले, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक आदी उपस्थित होते.

# उड्डाणपूल प्रकल्पासाठी जागा हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कागदपत्रे सुपूर्द

### टेंडर प्रक्रिया अखंडित राहणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२५ जुलै -**
शहरातील बहुप्रतिक्षित उड्डाणपूल प्रकल्पाच्या उभारणीसाठी आवश्यक असलेल्या खाजगी व राज्य शासनाच्या जागेचे नॅशनल हायवेकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पूर्ण झाली. या प्रक्रियेमुळे प्रकल्पातील सर्वात म हत्त्वाचा प्रशासकीय अडथळा दूर झाला असून, सुरू असलेली निविदा प्रक्रिया अखंडितपणे पुढे सुरू राहणार आहे. त्यामुळे उड्डाणपूलाच्या प्रत्यक्ष कामाला लवकरच प्रारंभ होणार आहे.




पंढरपूर येथे आयोजित कार्यक्रम ात जिल्हाधिकारी एन. कार्तिकेयन यांनी हस्तांतरणासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केली. त्यानंतर मुख्यमंत्री यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे तसेच नॅशनल हायवेच्या अधिकाऱ्यांकडे संबंधित कागदपत्रे सुपूर्द केली.

उड्डाणपूल प्रकल्पाची निविदा प्रक्रिया ३ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, त्यासाठी २५ जुलैपूर्वी जागा हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक होते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्दे शानुसार जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी आवश्यक कार्यवाहीला गती देत सुमारे ९३ टक्के प्रक्रिया पूर्ण केली होती.

आज औपचारिक हस्तांतरण झाल्याने नव्याने टेंडर काढण्याची गरज टळली आहे.

राज्य शासनाच्या जागा म हानगरपालिकेच्या ताब्यात आल्यामुळे प्रकल्पाच्या प्रशासकीय, तांत्रिक आणि कायदेशीर प्रक्रियेलाही वेग मिळणार आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण होताच प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या वेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# तक्रार अर्जावर आठवडाभरात निर्णय घ्या : उच्च न्यायालय

### जामगांव (आ) ग्रामपंचायत कथित भ्रष्टाचार प्रकरण

**बार्शी दि. २५ जुलै-**
बार्शी तालुक्यातील जामगांव (आ) ग्रामपंचायतीत २०२१ ते २०२३ या कालावधीत विकासकामांत कथित भ्रष्टाचार व आर्थिक अनियमित प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि बार्शी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी याचिकाकर्त्यांची बाजू ऐकून घेऊन तक्रार अर्जांवर आठवड्यात निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले आहेत.

न्यायमूर्ती मिलिंद जाधव आणि नंदेश देशपांडे यांच्या खंडपीठाने याचिकाकर्ते रावसाहेब आवटे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर हा आदेश दिला. आवटे यांनी ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण अहवाल व अन्य कागदपत्रांचा अभ्यास करुन १४ वा व १५ वा वित्त आयोग, ग्रामनिधी, दलित वस्ती सुधार योजना तसेच पाणीपुरवठा निधीतील खर्चात मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे. तसेच महिला सरपंचांच्या पुत्राकडून ग्रामपंचायतीच्या कामकाजात कथित बेकायदेशीर हस्तक्षेप होत असल्याचाही दावा केला आहे.

आवटे यांनी २१ एप्रिल व ५ मे २०२६ रोजी सोलापूर जिल्हा परिषद आणि बार्शी पंचायत समितीकडे संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली होती. दरम्यान, गटविकास अधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालात काही कामांतील त्रुटी, प्रशासकीय मंजुरीचा अभाव आणि दप्तरातील अनियमितता निदर्शनास आली होती. मात्र त्यानंतरही ठोस कारवाई न झाल्याने त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. १७ जुलै २०२६ रोजी सुनावणीनंतर न्यायालयाने संबंधित अधिकाऱ्यांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून निर्णय घेण्याचे आदेश दिले. या आदेशा मुळे जामगाव (आ) ग्राम पंचायतीतील कथित आर्थिक अनियमितता प्रकरणाच्या चौकशीला गती मिळण्याची शक्यता आहे.

## एमआयटी व्हीजीएस शाळेत रंगली आषाढी एकादशी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २५ जुलै**
श्रीमती प्रयाग कराड विश्वशांती इंग्लिश मीडियम हायस्कूल, बार्शी येथे आषाढी एकादशीचा सोहळा साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्म, संस्कार आणि संतपरंपरेची ओळख निर्माण करण्याच्या उद्देशाने याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात विश्वशांती प्रार्थना, शाळेचे गीत आणि प्रतिज्ञेने झाली. विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमात भक्तिगीते, भजन, अभंगगायन तसेच संतांच्या जीवनावरील आणि विठ्ठल भक्तीवरील कथा सादर करण्यात आल्या. संत गोरा कुंभार यांच्यावरील समूह नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले. छोट्या वारकऱ्यांचा दिंडी सोहळा मोठ्या पार पडला. पूर्वप्राथमिक ते इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी शाळा परिसरात, तर इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी भगवंत मंदिरात दिंडी काढून, तसेच नृत्यविष्कार सादर करुन विठ्ठल नामाचा गजर केला. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांना संतांच्या विचारांचे आचरण करण्याचा संदेश देत आषाढी एकादशीचे आध्यात्मिक महत्त्व विशद केले. आभार प्रदर्शनानंतर विठ्ठल नामाच्या गजरात कार्यक्रमाची सांगता झाली. आयोजनासाठी मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सांस्कृतिक विभाग तसेच विद्यार्थ्यांनी योगदान दिले.



# संस्कारांची अखंड ज्योत : श्रद्धेय रत्नप्रभादेवी (आक्कासाहेब) शंकरराव मोहिते-पाटील

## आदर्श मातृत्व, स्त्रीशक्ती आणि मूल्यनिष्ठ नेतृत्वाची जननी

**महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा इतिहास लिहिताना सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. हे नेतृत्व जितके तेजस्वी होते, तितकीच त्या तेजामागे शांत, संयमी आणि विलक्षण सामर्थ्याने उभी असलेली एक स्त्री होती-श्रद्धेय रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते-पाटील, ज्यांना संपूर्ण महाराष्ट्र प्रेमाने आणि आदराने 'आक्कासाहेब' म्हणून ओळखतो.**

-----------------------------

२५ जुलै १९२४ रोजी जन्मलेल्या रत्नप्रभादेवींचे आयुष्य हे केवळ एका कर्तव्यदक्ष पत्नीचे किंवा मम तामयी आईचे चरित्र नाही; ते भारतीय स्त्रीशक्तीच्या अदृश्य सामर्थ्याचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी कधी व्यासपीठाची अपेक्षा केली नाही, प्रसिद्धीचा मोह बाळगला नाही किंवा पदाचा आग्रह धरला नाही. परंतु त्यांच्या संस्कारांनी घडलेली पिढी महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात प्रभावी ठरली. त्यामुळे आक्कासाहेबांचे जीवन समजून घेणे म्हणजे एका कुटुंबाचा इतिहास नव्हे, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा इतिहास समजून घेणे होय.

शंकरराव मोहिते-पाटील यांचे संपूर्ण आयुष्य जनतेच्या सेवेसाठी वाहिले गेले. अशा परिस्थितीत घर, कुटुंब आणि मुलांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारी आक्कासाहेबांनी स्वतःच्या खांद्यावर घेतली. परंतु त्यांनी ती जबाबदारी ओझे म्हणून स्वीकारली नाही; उलट राष्ट्रसेवा असल्याची भावना आयुष्यभर जपली. त्या काळातील ग्रामीण जीवनात स्त्रियांना निर्णयप्रक्रियेत स्थान फारसे मिळत नव्हते. तरीही आक्कासाहेबांनी आपल्या संयम, विवेक आणि दूरदृष्टीच्या बळावर घराचा प्रत्येक निर्णय मूल्याधिष्ठित ठेवला. त्यांनी संकटांना कधी शरणागती पत्करली नाही. परिस्थिती कठीण असली तरी मुलांवर त्याची सावली पडू दिली नाही. आक्कासाहेब आणि शंकरराव यांना सहा पुत्र आणि दोन कन्या लाभल्या. विजयसिंह मोहिते-पाटील, प्रतापसिंह म ोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, उदयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह म ोहिते-पाटील, राजसिंह मोहिते-पाटील तसेच दोन कन्या-या सर्वांच्या घडणीत आक्कासाहेबांच्या संस्कारांचा अत्यंत महत्त्वाचा वाटा होता. प्रत्येक मूल वेगळ्या स्वभावाचे असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा समान धागा होता- शिस्त, साधेपणा, समाजाविषयीची बांधिलकी आणि कर्तव्यनिष्ठा. हे गुण आक्कासाहेबांच्या दैनंदिन आचरणातून मुलांच्या मनात रुजले होते.



आजच्या काळात पालकत्वाचा अर्थ अनेकदा म ुलांच्या भौतिक गरजा पूर्ण करण्यातच मर्यादित राहतो. आक्कासाहेबांनी वेगळा आदर्श घालून दिला. त्यांच्या मते, मुलांच्या हातात संपत्ती देण्यापेक्षा त्यांच्या मनात मूल्ये रुजविणे अधिक आवश्यक आहे. त्यांनी आपल्या मुलांना शिकवले की सत्ता ही प्रतिष्ठेचा अलंकार नसून समाजसेवेचे साधन आहे; संपत्ती ही अहंकाराची नव्हे तर लोकहिताची जबाबदारी आहे; आणि नेतृत्व म्हणजे लोकांच्या पुढे चालणे नव्हे, तर त्यांच्या दुःखात सहभागी होणे. अकलूजमधील त्यांच्या निवासस्थानी येणारा प्रत्येक पाहुणा हा केवळ पाहुणा नव्हता; तो घरचा सदस्यच होता. गरीब शेतकरी, गरजू महिला, विद्यार्थी किंवा संकटात सापडलेले कुटुंब-कोणीही त्यांच्या दारातून रिकाम्या हाताने किंवा निराश परत जात नसे. करुणा, सहिष्णुता आणि सेवाभाव हे त्यांच्या स्वभावाचे केवळ गुण नव्हते; ती त्यांची जीवनपद्धती होती. मुलांनी हे सर्व बालपणापासून पाहिले आणि अनुभवले. म्हणूनच त्यांच्या पुढील सार्वजनिक जीवनात लोकांशी असलेला आत्मीय संवाद हा कृत्रिम वाटत नाही.

विशेषतः माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या विनम्रतेचा, जनसामान्यांशी असलेल्या जवळिकीचा आणि संयमी स्वभावाचा उल्लेख होताना अनेकजण त्यांच्या आईच्या संस्कारांची आठवण काढतात. परंतु हे श्रेय केवळ एका मुलापुरते मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. आक्कासाहेबांनी आपल्या सर्व अपत्यांमध्ये समान मूल्यांची पेरणी केली. म्हणूनच मोहिते-पाटील घराण्याने सहकार, शिक्षण, कृषी, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक जीवनात सातत्याने योगदान देणारी परंपरा निर्माण केली.

आक्कासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची विलक्षण व्यवस्थापन क्षमता. आधुनिक भाषेत सांगायचे तर त्या एक उत्कृष्ट 'मॅनेजर' होत्या. मोठे संयुक्त कुटुंब, शेती, पाहुणचार, सामाजिक संबंध आणि सतत जनतेच्या संपर्कात असलेले घर-या सर्वांचा त्यांनी अविश्वसनीय समतोल साधला. त्यांनी कधी अधिकार गाजवला नाही; परंतु आपल्या शांत स्वभावाने आणि तर्कशुद्ध निर्णयांनी प्रत्येकाला एकत्र बांधून ठेवले. आक्कासाहेबांनी स्त्रीसक्षमीकरणाची व्याख्या कृतीतून मांडली. त्यांनी सिद्ध केले की स्त्रीची शक्ती केवळ पद किंवा प्रसिद्धीत नसते; ती योग्य मूल्यनिर्मितीत असते. घर सांभाळणारी स्त्री समाजही घडवू शकते आणि समाज घडविणाऱ्या पुरुषाला नैतिक आधारही देऊ शकते.

त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की कुटुंबव्यवस्था आणि स्त्रीस्वातंत्र्य हे परस्परविरोधी नाहीत; उलट परस्परपूरक आहेत. शिक्षणाबद्दल त्यांची भूमिका अत्यंत दूरदर्शी होती. त्या नेहमी सांगत असत की शिक्षित आई म्हणजे सुसंस्कृत समाजाची जननी. पुढील काळात मोहिते-पाटील परिवाराने उभारलेल्या शैक्षणिक संस्थांमधून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली; त्या कार्यामागे आक्कासाहेबांनी जोपासलेली मूल्यव्यवस्था स्पष्टपणे जाणवते.

त्यांच्या आयुष्यात प्रसिद्धीपेक्षा प्रतिष्ठेला महत्त्व होते. त्या स्वतः प्रकाशझोतात कधी आल्या नाहीत; परंतु ज्यांच्या आयुष्याला त्यांनी स्पर्श केला, त्या प्रत्येकाच्या मनात त्या कायमच्या उजळून राहिल्या. हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. त्यांनी केलेल्या कार्याची जाहिरात नव्हती; पण त्यांच्या कृतींचा प्रभाव अनेक पिढ्यांवर उमटला.

२८ जून २००२ रोजी आक्कासाहेबांचे निधन झाले. तो दिवस केवळ मोहिते-पाटील परिवारासाठीच नव्हे, तर संपूर्ण अकलूज आणि सहकार चळवळीसाठी भावनिक ठरला. एका आईचे निधन झाले होते; परंतु त्याहून मोठी गोष्ट म्हणजे मूल्यांची जपणूक करणारा एक जिवंत संस्कारवृक्ष काळाच्या पडद्याआड गेला होता. आजही मोहिते-पाटील परिवारातील सदस्य कोणत्याही महत्त्वाच्या कार्याची सुरुवात करण्यापूर्वी त्यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होतात.

श्रद्धेय रत्नप्रभादेवी 'आक्कासाहेब' शंकरराव मोहिते-पाटील या युगप्रवर्तक माता होत्या. त्यांनी केवळ आपल्या आठ अपत्यांचे संगोपन केले नाही, तर मूल्यनिष्ठ नेतृत्वाची परंपरा निर्माण केली. त्यांनी महाराष्ट्राला आदर्श मातृत्वाचा एक तेजस्वी मानदंड दिला. म्हणूनच त्या केवळ एका घराण्याच्या मातृमुखिया नव्हत्या; त्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील संस्कारमूर्ती, ममतेची अखंड ज्योत होत्या.

- चाँद शेख
पुणे (अकलूज)

# ‘श्रीमंत दामोदरपंत’मधील अचूक टायमिंगमुळे प्रेक्षक वर्गात पिकला हशा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२५ जुलै-**

श्रीमंत दामोदर पंत हे केदार शिंदे दिग्दर्शित एक अत्यंत लोकप्रिय आणि धम्माल विनोदी मराठी नाटक संपन्न झाले, भरत जाधव एन्टरटेन्मेंट निर्मित मराठी नाटक ‘‘श्रीमंत दामोदरपंत’’ लेखक, दिग्दर्शक केदार शिंदे आणि सहकारी यांच्या नाटकाने ख्यातनाम सदरच्या कार्यक्रमास श्रोत्यांनी प्रचंड गर्दी झाली होती. हे नाटक भन्नाट कथानक: कथानकात दररोज संध्याकाळी ठीक ६ वाजता एका स्वातंत्र्यसैनिकाचा (श्रीमंत दामोदर पंत) आत्मा त्यांच्या नातवाच्या (दामूच्या) शरीरात प्रवेश करतो. त्यानंतर घरात होणारी तारांबळ आणि निर्माण होणारा संभ्रम व प्रसिद्ध अभिनेते भरत जाधव यांनी दामोदर पंत आणि दामू या दोन्ही भूमिका अत्यंत सहजसुंदर आणि ऊर्जेने भारलेल्या केल्याने त्यांच्या विनोदाच्या अचूक टायमिंगमुळे प्रेक्षक वर्गात हशा पिकला.

नाटकातील संवाद अतिशय चटपटीत आणि लक्षात राहण्याजोगे होते. केदार शिंदे यांच्या दिग्दर्शन शैलीमुळे नाटकाची गतिशीलता शेवटपर्यंत टिकून राहिले, परिपूर्ण कौटुंबिक नाटक असून, यात विनोदासोबतच नातेसंबंध, भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचा उत्तम मेळ पाहायला मिळाल्याने प्रेक्षकातून आनंद व्यक्त झाला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ३९ व वर्धापन दिन आणि श्री गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम २०२६ च्या आयोजनाने अक्कलकोटकर व स्वामी भक्तातून समाधान व्यक्त होत आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा. वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, शनिवारी भरत जाधव एन्टरटेन्मेंट निर्मित मराठी नाटक ‘‘श्रीमंत दामोदरपंत’’ लेखक, दिग्दर्शक केदार शिंदे आणि सहकारी यांच्या नाटकाने कार्यक्रमाचे ७ वे पुष्प संपन्न झाले.

ज्येष्ठ पत्रकार मिलिंद कुलकर्णी, डॉ.रोहिणी पाटील, डॉ.शैलेश पाटील, वैभव ढेरे, उमेश येळवे, दुधनी नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे, जि.प. सदस्य नेताजी खंडागळे, उद्योगपती दत्ताअण्णा सुरवसे, दत्ता मुळे, सुशील हडदरे, संतोष भोगशेट्टी, माल्लीकाजून पाटील, विकास तरे, ठाणे, संजय कुलकर्णी, सुरज धाये, जावेद पटेल, नगरसेवक रमेश कापसे, शिवसेना नेते संजय देशमुख, दत्तकुमार साखरे, भाऊ घाडगे, यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचा व कलाकारांचा भरत जाधव, कमलाकर सातपुते, मनोज टाकणे, मयूर पाटील यांचा सत्कार न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती व प्रतिमा आणि छत्रपती शिवाजी महाराजांची सुबक, कोरीव प्रतिमा कृपावस्त्र देऊन करण्यात आला. न्यासाचे पुरोहित सोमकांत व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले.

डॉ.संतोष मेहता, वैद्यकीय यांना विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नगरसेवक देवीदास कवटगी, मुद्रांक कार्यालय राहूल घाडगे, पोस्ट मास्तर सचिन ज्योतिराम येडके, पत्रकार सतीश पालापुरे, सुनिल विश्वनाथ शिंदे यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ७ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. दरम्यान, चप्पळगांव व बावकरवाडी ग्रामस्थाच्या वतीने न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल व मंडप सजावट कल्लप्पा छकडे यांनी केले.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, अनुयाताई संदीप फुगे, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वाती निकम, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, संगीता राठोड, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, छाया पवार, सरोजनी मोरे, प्रिया निकम, स्वप्ना माने, तृप्ती बाबर, सुवर्णा घाडगे, कविता भोसले, क्रांती वाकडे, अनिता गडदे, दिव्या मोरे, कल्पना मोरे, अक्षता मोरे, कोमल क्षीरसागर, शितल क्षीरसागर, अक्षता खोबरे, हिरकणी संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य व न्यासाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे, सचिव- शाम राव मोरे, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, कु. समर्थ संदीप फुगे, विश्वस्त- लक्ष्मण पाटील, भाऊ कापसे, लाला राठोड, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, राजाभाऊ निकम, अशोकराव उटगे, मनोज निकम, अरविंद शिंदे, ओंकारेश्वर उटगे, सौरभ मोरे, प्रवीण देशमुख, शीतल फुटाणे, अमोल पाटील, वैभव मोरे, अतिश पवार, प्रवीण घाडगे, निखील पाटील, शिवराज स्वामी, चिदानंद मुस्तारे, विलास राठोड, सिद्धेश्वर मोरे, योगेश कटारे, प्रा.प्रशांत शिंपी, बाळासाहेब कुलकर्णी बबलादकर, सुरेश पाटील, मल्लिनाथ स्वामी, शाम ढवने, ॲड. फहीम पिरजादे, सोनटक्के बंधू, विजय इंगळे, सर्फराज शेख, प्रशांत साठे, मैनुद्दीन कोरबू, अश्पाक काझी, असद फुलारी, रोहित खोबरे, रोहित पाटील, राहुल भंडारे, अप्पा हंचाटे, आकाश शिंदे, रोहन शिर्के, वासू कडबगांवकर, स्वामिनाथ बाबर, प्रा. सायबण्णा जाधव, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, आकाश सूर्यवंशी, किरण पाटील, राजाराम पवार, सुमित कल्याणी, अमर मसरे, शुभम सावंत, यश विभूते, बलभीम पवार, गोविंदराव शिंदे, धनप्पा उमदी, कुमार सलबत्ते, शहाजीबापू यादव, कुमार पाटील, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, मल्लिकार्जुन बिराजदार, आकाश शिंदे, प्रसाद हुल्ले, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, शरद भोसले, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, अनिल बिराजदार, श्रीशैल कुंभार, महांतेश स्वामी, संजय गोंडाळ, प्रसाद मोरे, वैभव मोरे, फहीम पिरजादे, केदार तोडकर, योगेश पवार, निखील शिंदे, अभिषेक चव्हाण, अमित कोळी, लक्ष्मण शिंदे, आकाश सूर्यवंशी, विनायक भोसले, सुमित घाटगे, समर्थ घाटगे, सैदप्पा इंगळे, भरत राजेगावकर, संतोष माने, बाबू मसुती, किरण साठे, ज्ञानेश्वर भोसले, समर्थ चव्हाण, राहुल इंडे, रमेश हळसंगी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठलराव रेड्डी आदी उपस्थित होते.



### अन्नछत्र मंडळाने धार्मिक, सामाजिक कार्याचा आदर्श निर्माण केला

भाविकांसाठी अखंड अन्नछत्र सुरू ठेवून आपल्या संस्थेने निःस्वार्थपणे सामाजिक आणि धार्मिक कार्याचा आदर्श निर्माण केला आहे. श्री स्वामी समर्थांचा आशीर्वाद या निमित्ताने सर्व भाविकांपर्यंत पोहोचावा ही प्रार्थना. वर्धापन दिन आणि श्री गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त धर्मसंकिर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले आहे. त्यायोगे श्री स्वामी समर्थांचे आध्यात्मिक विचार, भूतदयेचे आणि विश्वकल्याणाचे संस्कार सर्व समाजघटकांमध्ये रुजावेत अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. धर्मसंकिर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनाबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन. श्री स्वामी समर्थांच्या चरणी अंतःकरणपूर्वक नमस्कार, अशा आशयाचा शुभसंदेश विधानपरिषदेचे उपसभापती प्रा.राम शिंदे यांनी पाठवून दिले.

### आज खेळ मांडियेला कार्यक्रम; भक्ती रन मॅरेथॉन स्पर्धा

दि. २६ जुलै रोजी रविवार सायंकाळी ७.१५ ते रात्रौ ९.३० पर्यंत आदेश बांदेकर प्रस्तुत ‘खेळ मांडियेला’ खेळ, किस्से, गप्पा, साऱ्या कुटुंबासाठी हा कार्यक्रम होणार आहे. पहाटे ५.३० ते ९.३० वा पर्यंत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), व चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘‘आरोग्य ते अध्यात्म’’ हा प्रेरणादायी संदेश देणारी ही ‘‘भक्ती रन’’ स्पर्धा आयोजित करण्यात आली. शारीरिक तंदुरुस्ती, अध्यात्मिक उन्नती आणि भक्तीमय वातावरणाचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळणार आहे. या भव्य ‘‘अक्कलकोट १० भक्ती रन’’ या आगळ्यावेगळ्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

### डॉ. रोहिणी पाटील यांचे महिलांचे आरोग्यविषयी मार्गदर्शन

महिलांच्या आरोग्य विषयी मार्गदर्शनपर बोलताना डॉ. रोहिणी पाटील म्हणाल्या, घरातील सर्वांची काळजी घेणाऱ्या महिला अनेकदा स्वतःच्या आहाराकडे आणि आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, त्या मुळे लवकर आजारी पडतात. महिलांनी आरोग्यासाठी घरात उपलब्ध असणारे पौष्टिक पदार्थ, अळीव, इसबगोल यांसारख्या पारंपरिक आणि आरोग्यदायी पदार्थांचा आहारात समावेश असणे गरजेचे आहे. रोज एक चमचा तूप आणि एक ग्लास गरम पाणी प्यावेत, दिवसभरात ३.५० लिटर पाणी प्यावेत, जेवणानंतर आहे तिथे २० मिनिटे चालावेत, रोज जेवणात डाळ, काकडी, गाजर खावेत, नियमित ७.५० तास झोप आवश्यक आहे, असा सल्लाही त्यांनी दिला.

## विद्यार्थ्यांनी धारण केली होती प्राणी, पक्षी यांची वेशभुषा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

चतुरबाई श्राविका विद्यालयात आषाढी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापिका राखी देशमाने यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीचे व पालखीचे पूजन करण्यात आले. संताच्या वेशातील मूली वारकरी त्यानंतर वारकरी वेशातील मुले असे गट करून १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांची दिंडी श्राविका शाळा ते बाळीवेस कस्तुरबा मार्केट ते सम्राट चौक व पुन्हा श्राविका चौक असे पालखीचे व दिंडीचे गमन करण्यात आले. इयत्ता पहिलीचे विद्यार्थी यांनी प्राणी व पक्षी यांची वेशभूषा धारण केली होती. इ २ री ते ४ थी मुलांनी संत वारकरी यांचा वेश परिधान केला व मुलींनी डोक्यावर तुळस घेतला व उर्वरित इयत्ता तिसरी व चौथीच्या विदयार्थ्यांनी निसर्गाचे रक्षण, पाणी व वीज जपून वापर, प्लास्टिक वापर बंदी आदींच्या घोषणा दिल्या.



## ‘प्रवासी वादळवाटेवरचा’ या चरित्रग्रंथाचे आज प्रकाशन

**सोलापूर, दि.२५ जुलै-**

रिपब्लिकन चळवळीतील कार्यकर्ते, माजी नगरसेवक, शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य, सोलापूर महानगरपालिका कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष ॲड. पी.आर. क्षीरसागर यांच्या जीवनकार्याचा प्रेरणादायी प्रवास उलगडणाऱ्या ’प्रवासी वादळवाटेवरचा’ या चरित्रग्रंथाचे रविवार, दि.२६ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे प्रकाशन करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत, लेखक दत्ता गायकवाड यांनी या चरित्रग्रंथाचे लेखन केले आहे. ॲड.पी.आर. क्षीरसागर यांच्या सामाजिक, राजकीय आणि आंबेडकरी चळवळीतील योगदानाचा वेध या पुस्तकातून घेण्यात आला आहे. माजी आमदार ॲड.जयदेव गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, प्रा.एम.आर.कांबळे, युवराज सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## बेकायदेशीर गुटखा विक्रेत्यावर छापा

### २८ हजारांचा गुटखा जप्त, एक ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि २५ जुलै-**

बार्शी शहर पोलिसांनी प्रतिबंधित असलेला २७,९८० रुपयांचा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. याप्रकरणी पोलिस अंमलदार कदर तांबोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अविनाश शिंदे (वय-४२, रा.कुसळंब, ता.बार्शी) याच्यावर गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आली.

पोलिस निरीक्षक गणेश कुंभार हे पथकासह श्री भगवंत रथ मार्गावर गस्त घालत असताना, सहाय्यक पोलीस फौजदार अजित वरपे यांना बीआयटी कॉलेज चौक परिसरात एकजण प्रतिबंधित गुटखा विक्रीसाठी घेऊन येणार असल्याचे समजले. त्यावरुन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सापळा रचला. यावेळी संशयित इसम तीन पिशव्यांमध्ये गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ घेऊन आढळून आला.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि गणेश कुंभार, सपोनि सुनील धनवटे, सपोफौ अजित वरपे, पोकॉ कदर तांबोळी, सचिन देशमुख, चालक मरठे यांनी ही कामगिरी पार पाडली.

## दुर्धर आजारग्रस्तांच्या १४ प्रस्तावांपैकी १० मंजूर

### प्रत्येकांच्या खात्यावर १५ हजार रुपये जमा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

दुर्धर आजारांमुळे उपचाराचा वाढता खर्च आणि आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या रुग्णांसाठी शासनाच्या आर्थिक सहाय्य योजनेतून दिलासा देणारा निर्णय झाला आहे. संबंधित कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या १४ प्रस्तावांपैकी १० पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी १५ हजार रुपये थेट जमा करण्यात आले आहेत. या माध्यमातून एकूण १ लाख ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य वितरित करण्यात आले आहे.

लाभार्थ्यांची नावे याप्रमाणे; भारत रामा गावळी, प्रभावती नवनाथ कोडलिंगे, शाहिद फारुख कुरेशी, शारदा अभिमान राजगुरु, गणेश श्रीहरी माळी, मधुकर भानुदास लोंढे, विष्णू जांगलू कसबे, रमेश भगवान पवार, सविता रामदास देशमुख, परमेश्वर नागनाथ खंडागळे. दरम्यान, उर्वरित चार प्रस्तावांबाबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि प्रशासकीय प्रक्रिया सुरु असल्याची माहिती विस्ताराधिकारी मेहबूब निटोरे यांनी दिली.

## महापालिका घेत आहे भटक्या कुत्र्यांचा शोध

- निर्बिजीकरण मोहीम घेण्यात आले हाती
- अहवालानंतरच होईल नेमके कारण स्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जुलै-**

घोंगडे वस्ती येथील समर्थ योगिनाथ स्वामी या ९ वर्षीय मुलाला झालेली जखम कुत्र्याने चाटल्याने रेबीज होऊन त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडताच सोलापूर महापालिकेने निर्बिजीकरण मोहीम हाती घेत शहरातील भटक्या कुत्र्यांचा शोध घेत आहे.

या घटनेती मृत समर्थ स्वामी या मुलाला भटक्या कुत्र्याने चावा घेतला होता की त्याच्या उघड्या जखमेवर चाटल्यामुळे संसर्ग झाला? याबाबत अद्याप संभ्रम कायम असून शवविच्छेदन अहवालानंतरच नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे सांगण्यात येते. संबंधित कुटुंबातील सदस्यांना प्रतिबंधात्मक लस देण्यात आली. घोंगडे वस्ती परिसरात यापूर्वी सात कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आले. संबंधित कुत्र्याचा शोध घेण्यात येत आहे, असे महापालिका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.सतीश चौगुले यांनी सांगितले.

रेबीजच्या जोखमीच्या दृष्टीने रुग्णांचे सामान्य संपर्क, ओरखडे आणि चावा अथवा उघड्या जखमेचा संपर्क अशा तीन कॅटेगरींमध्ये वर्गीकरण केले जाते. गेल्या चार वर्षांनंतर शहरात संशयित रेबीजचा हा पहिला रुग्ण आढळला आहे. हा रुग्ण कॅटेगरी-३ प्रकारात मोडत असल्याचे दिसून येत असल्याचे सांगण्यात येते.

## निर्बीजीकरणातील अनियमिततेची चौकशी करावी : सुरेश पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जुलै-**

शहरातील मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव, निर्बीजीकरणातील कथित अनियमितता आणि संबंधित यंत्रणेच्या हलगर्जीपणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. मृत मुलाच्या कुटुंबाला मुख्यमंत्री सहायता निधी व महापालिकेच्या वतीने आर्थिक मदत देण्यासाठी सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे माजी नगरसेवक सुरेश पाटील यांनी केली.

मुलाच्या संपर्कातील कुटुंबीयांसह शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करुन आवश्यकतेनुसार रेबीज प्रतिबंधक लसीकरण करावे, शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात आणि निर्बीजीकरणाच्या कामातील हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, असेही त्यांनी सांगितले.




# उजनी धरण प्रचंड वेगाने भरतेय

- ७४ हजार क्युसेक्सचा वेग
- उपयुक्त पाणीसाठा ७४.२८ टक्क्यांवर
- एकूण साठा १०३.४५ टीएमसीवर पोहोचला

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२५ जुलै-**

भीमा नदीच्या कृष्णा खोऱ्यात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पुणे जिल्ह्यातून उजनी धरणाकडे येणाऱ्या पाण्याचा ओघ आणखी वाढला असून, शनिवारी (दि. २५ जुलै) सायंकाळी ६ वाजेच्या अहवालानुसार धरणात तब्बल ७४,०३० क्युसेक्स वेगाने पाणी दाखल होत आहे. या वाढत्या आवकेमुळे उजनी धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत असून, धरणाचा उपयुक्त पाणीसाठा ७४.२८ टक्क्यांवर पोहोचला आहे.

सध्या उजनी धरणाची पाणीपातळी ४९५.६०५ मीटर इतकी असून, धरणातील एकूण पाणीसाठा २९२९.७१ दशलक्ष घनमीटर (१०३.४५ टीएमसी) इतका झाला आहे. उपयुक्त पाणीसाठा ११२६.९० दशलक्ष घनमीटर (३९.७९ टीएमसी) इतका नोंदविण्यात आला. धरणाच्या जलसाठा क्षेत्राचा विस्तारही वाढून ३०१.९२ चौ. कि.मी. इतका झाला आहे.

दौंड नदी मापन केंद्रावर नदीची पाणीपातळी ५०१.७५० मीटर नोंदली गेली असून, तेथून मोठ्या प्रमाणात पाणी उजनी धरणाकडे येत आहे. त्यामुळे पुढील काही दिवसही धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, एवढी मोठी आवक सुरू असतानाही धरणाच्या सांडव्यावरून किंवा वीजगृहातून नदीपात्रात कोणताही विसर्ग करण्यात आलेला नाही. मात्र सिंचनासाठी मुख्य कालव्यातून २,००० क्युसेक्स, बोगद्यातून ९०० क्युसेक्स, सिना-माढा उपसा सिंचन योजनेसाठी २८० क्युसेक्स आणि दहीगाव उपसा सिंचन योजनेसाठी ९० क्युसेक्स पाणी सोडण्यात येत आहे.



### पावसाचा जोर कायम राहिल्यास...

भीमा खोऱ्यात पावसाचा जोर कायम राहिल्यास आणि वरच्या धरणांतून येणारी आवक अशीच सुरू राहिल्यास, उजनी धरणातील पाणीसाठ्यात आणखी वेगाने वाढ होण्याची शक्यता असून, प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. सध्या धरणातील वाढता जलसाठा शेतकरी, पाणीपुरवठा आणि सिंचनाच्या दृष्टीने दिलासादायक मानला जात आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

## रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचा तीन विविध पुरस्कारानी सन्मान



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २५ जुलै : रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचा रोटरी डिस्ट्रिक्टच्या वतीने तीन विविध पुरस्कारानी सन्मान करण्यात आला आहे.

सोलापूर येथे पद्मावती कन्व्हेंशन हॉलमध्ये आयोजित रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांच्या पदग्रहण सोहळ्यामध्ये डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो .जयेश पटेल आणि डिस्ट्रिक्ट डायरेक्टर रो .नितीन कुदळे यांच्या हस्ते सदरील पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलने रोटरी फाउंडेशनला वार्षिक फंडासाठी मोठे योगदान दिले आहे. उल्लेखनीय सदस्यवाढ करत ५ नवीन सदस्यांची नोंद केल्याबद्दल व नूतन अध्यक्ष ऍड. विक्रम संकाये यांना त्यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल रोटरी क्लब ३१३२ कडून तीन विविध प्रतिष्ठेचे पुरस्कार देऊन गौरव करण्यात आले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष ऍड. विक्रम संकाये,सचिव डॉ. सुधीर जाधव, निशांत धवलशंख, विशाल तोंडचिरकर, महानंदा सोनटक्के, प्रा. मंगला विश्र्वनाथे, सरस्वती चौधरी यांच्यासह क्लबचे सदस्य उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलला मिळालेल्या या सन्मानाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, भविष्यातही समाजोपयोगी उपक्रम आणि सदस्यवाढीवर भर देत क्लब कार्यरत राहणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला आनंदवाडीत गती



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २५ जुलै : आनंदवाडी ग्रामपंचायत कार्यालयात 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानांतर्गत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत गावाचे आरोग्य अधिक सक्षम व निरोगी ठेवण्यासाठी विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी गावातील नागरिकांची प्रलंबित आभा (-इक-) कार्डे पूर्ण करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच गावात लवकरच सर्वसमावेशक आरोग्य शिबिर आयोजित करण्याचेही निश्र्चित करण्यात आले. १४ वर्षे वयोगटातील मुलींना देण्यात येणाऱ्या लसीकरणाबाबत डॉ. भाग्यश्री पाटील यांनी पालकांना सविस्तर मार्गदर्शन करून लसीकरणाचे महत्त्व विशद केले.

बैठकीस सरपंच तथा आरोग्य समितीचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे तालुकाप्रमुख भागवत वंगे, उपसरपंच तथा समितीचे उपाध्यक्ष व्यंकट कल्ले, ग्रामपंचायत सदस्य तथा आरोग्य समिती सदस्य सारिका शिरूरे, ज्ञानोबा शेळके, ग्रामविकास अधिकारी संजय रोडेवाड, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. भाग्यश्री पाटील, महिला प्रतिनिधी अनुसया शिरूरे, माजी महिला प्रतिनिधी सुवर्णा दिवेकर, आशा कार्यकर्ती अनुसया साबदे, अंगणवाडी शिक्षिका अश्र्विनी मरे, मुख्याध्यापक बालाजी शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. गोविंद जाधव, आरोग्य सेवक योगेश खुळे, आरोग्य सेविका वर्षा सगर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## दिल्लीच्या जंतर-मंतर वरील विद्यार्थ्यांच्या मारहाणीचा निषेध



तभा वृत्तसेवा

जळकोट : सध्या दिल्ली येथे सुरू असलेल्या जंतर मंतर वरील आंदोलकांना विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केल्याच्या निषेधार्थ २३ रोजी वंचित बहुजन आघाडी भारतीय बौद्ध महासभा व भीम आर्मीच्या वतीने जळकोट शहर बंद करून सर्व कार्यकर्ते एकत्र येऊन मोर्चा काढला व तहसीलदार राजेश लांडगे यांना या तिन्ही पक्षाच्या व संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष तांबोळी . संतोष डुमणे . मिलिंद शिंदे आकाश वाघमारे स्वप्निल गायकवाड . संग्राम गायकवाड आदित्य . उमर लाटवाले सुरज नामवाड . वाघमारे अनिकेत कोंडीबा सोमवंशी स्वप्निल वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन देण्यात आले तर भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने प्राध्यापक सीएम कांबळे एडवोकेट शामसुंदर गवळे . उषाताई गवळे . जीवन गायकवाड .बाबुराव वाघमारे . व्यंकट गायकवाड .संभाजी गायकवाड . परमेश्र्वर सोनकांबळे . संतोष गडकर .अमर गवळे देविदास शिंदे मिलिंद सूर्यवंशी विठ्ठल खंकरे .राजकुमार भाले . इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत तर भीम आर्मी च्यावतीने तालुकाध्यक्ष डॉ . विकास वाघमारे व त्यांच्या अन्य पदाधिकाऱ्यांच्या निवेदनावर स्वाक्षरी आहे जळकोट शहर शांततेत बंद करण्यात आला विद्यार्थ्यांवर झालेल्या लाट मारायचा यावेळी निषेध करण्यात आला व संबंधितावर कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन र्चेकर्यांनी तहसील येथे जाऊन तहसीलदार राजेश लांडगे यांना हे निवेदन सादर केले .

# हत्तीबेटास पर्यटनाचा 'अ' दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार : आ. बनसोडे



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २५ जुलै : प्रभू श्रीराम चंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेली हत्तीबेट भूमी असून, या ठिकाणी हैदराबाद मुक्तीचा लढा झालेले ठिकाण आहे, शिवाय लेण्या, गुहाही मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या हत्तीबेटास जागतिक दर्जाचा पर्यटनाचा 'अ ' दर्जा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी दिली आहे.

उदगीर तालुक्यातील देवर्जन गावाच्या पंचक्रोशीत असलेल्या हत्तीबेटावरील श्री स्वामी समर्थ मंदिराच्या सभागृह बांधकामाचा लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते उद्धाटक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवर्जनचे सरपंच अभिजित साकोळकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जि. प. सदस्य तथा गटनेते प्रा. दिलीप मटके, पंचायत समिती सदस्य चंद्रकांत कांबळे, प्रकाश बिरादार, उपस्थित होते. व्यासपीठावर अहमदपुरच्या वन परिक्षेत्र अधिकारी वर्षा नागरगोजे, वन परिमंडळ अधिकारी दत्ता फरताडे, वनरक्षक नामदेव डिगोळे, अंबुलगेकर, जिल्हा परिषद सदस्य उमेश उमापुरे, उदगीर न. प. च्या उपाध्यक्षा शितल शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष बालाजी भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, पं. स. चे उपसभापती विक्की भोसले, सर्जेराव भांगे, संदिप बिरादार, नगरसेवक शिवकुमार कांबळे, इम्रान सय्यद, व्यंकट बोईनवाड, कमलाकर फुले, फय्याज शेख, बळी सुर्यवंशी, महेश बिरादार, शफी हाशमी, लक्ष्मण बतले, नगरसेविका वर्षा कांबळे, सिमा नेत्रगावकर, सुधाकर बिरादार, गजानन बिरादार, नामदेव डिगोळे, सुग्रीव सुर्यवंशी, बस्वराज उमाटे, गंगाधर गरीबे, गंगाधर दवणीपुरगे, शुभम भुमणे, संतोष रोडगे, अंतेश्र्वर रोडगे, राजकुमार तवंडे, महानंदा झुकले, राजु हुडगे, नारायण पाटील, रामस्वामी कुसळकर आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, हत्तीबेटास पर्यटनाचा ' ब ' दर्जा प्राप्त असून, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांची लागवड केल्यामुळे हत्तीबेट सध्या हिरवळीने नटले आहे. शाळांच्या सहलीमध्ये चार पटीने वाढ झालेली आहे.अध्यात्मिक, पौराणिक, ऐतिहासिक महत्व असलेले हत्तीबेट पर्यटन स्थळ असल्यामुळे या तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळास जागतिक पर्यटनाचा 'अ' दर्जा मिळवून देण्यासाठी आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविक हत्तीबेट पर्यटन विकास समितीचे अध्यक्ष व्ही. एस. कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी विद्यार्थ्यांना खेळणीची मोठ्या प्रमाणात गरज असल्यामुळे खेळणी व येथील लेण्या, गुह्यांचे जतन व्हावे यासाठी पण निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

आमदार बनसोडे यांनी हत्तीबेट पर्यटन विकासाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता डोईफोडे यांना केल्या. उपस्थितांचे आभार प्रदर्शन रोहिदास गंभीरे यांनी केले.

## उदगीर शहरातील लॉर्ड बसवेश्वरा प्री स्कूल शाळेत अवतरली पंढरी



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २५ जुलै : शहरातील लॉर्ड बसवेश्वरा प्रि स्कूल येथे मोठ्या जल्लोषात देवशयनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने बालदिंडी काढण्यात आली. शाळेतील चिमुकल्या मुलांनी भजनाच्या तालावर ठेका धरुन वारकऱ्यांचे पारंपारिक गायन व नृत्यही सादर केले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शाळा परिसरात पालखी, दिंडी व भजनाचे वातावरणच तयार केले. विठ्ठल विठ्ठल जयहरी विठ्ठल', 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' च्या जयघोषाने आणि टाळ-मृदुंगाच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या आवाजाने शाळेचा संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. हा सोहळा पाहून खरोखरच असे वाटत होते की आज साक्षात 'शाळेत पंढरी अवतरली' आहे. सोहळ्यात शाळेतील लहान मुले विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्र्वर, आणि संत तुकारामांच्या पारंपरिक पोशाखात सजली होती. कपाळी बुक्का आणि हाती पताका: मुलांच्या कपाळावर लावलेला बुक्का, चंदनाचा टिळा, हातात घेतलेल्या भगव्या पताका आणि तुळशी वृंदावन यामुळे वातावरण भक्तीमय झाले होते. टाळ-मृदुंगाचा गजरात मुलांनी हातामध्ये घेतलेले छोटे टाळ आणि मृदुंगाच्या तालावर धरलेला ठेका सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. मुख्य आकर्षण म्हणजे पालखी सोहळा होता. लहान मुलांनी स्वतः बनवलेली कागदी पुठ्ठयाची पालखी व विठ्ठलाच्या आणि संतांच्या चित्रांना सजवून संपूर्ण शाळेत आणि परिसरातून तिची भव्य दिंडी काढण्यात आली.दिंडी दरम्यान विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषेत एकत्र येऊन फुगड्या खेळल्या आणि फेर धरला. शाळा परिसरातील नागरिकांनी पुष्पवर्षाव करुन या बालदिंडीचे स्वागत केले. तर शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी विठ्ठलाची भजने आणि अभंग गायले, ज्यामुळे उपस्थितांचे डोळे भक्तीभावने भरून आले. उपक्रमाचे महत्त्व सांगतांना शाळेच्या संचालिका सौ. अनिता शिवानंद हैबतपूरे म्हणाल्या की शाळेत अशा प्रकारचे सण साजरे केल्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या समृद्ध मराठमोळी संस्कृतीची आणि संतांच्या विचारांची ओळख होते. या सोहळ्यातून मुलांना समता, बंधुभाव आणि एकत्र येऊन काम करण्याची शिकवण मिळते. आजच्या या भक्तीमय वातावरणामुळे शाळेचे मैदान हे केवळ एक क्रीडांगण न राहता साक्षात पंढरपूरचे विठ्ठल मंदिर बनले असल्याचे त्यांनी सांगितले.

हा बालदिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी लॉर्ड बसवेश्र्वरा प्रिस्कूल च्या उपक्रमशील शिक्षिका सौ.मोनिका सुनील बाळे,सौ.शिवानी फुलारी व साक्षी हिवरे प्रयत्न केले.

## मूल्य साखळी विकासासाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी जनसंपर्क वाढवावा : डॉ. केंद्रे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २५ जुलै : ग्रामीण भागात पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून कार्य करताना पशुपालकांशी विश्र्वासार्ह आणि प्रभावी जनसंपर्क निर्माण करणे ही काळाची गरज असून, त्यातूनच शासकीय योजना व आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू शकतो, असे प्रतिपादन डॉ. सिताराम केंद्रे, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, मुखेड, जि. नांदेड यांनी केले.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या स्मार्ट (ड्ड-ठ्ठ) प्रकल्पाअंतर्गत आयोजित पशुसंवर्धन मूल्य साखळी बळकटीसाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा क्षमता विकास या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सांगता समारोप प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर येथे बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजश्री गंदगे, उदगीर येथील डॉ. कृष्णा पांडे, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तसेच प्रशिक्षण समन्वयक डॉ. शरद आव्हाड उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनात डॉ. केंद्रे यांनी पशुसंवर्धन क्षेत्रात मूल्य साखळी विकासाची संकल्पना प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता अधोरेखित केली. प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष क्षेत्रात करून शासकीय योजनांचा लाभ पशुपालकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवावा, तसेच पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे त्यांनी सांगितले.

## जबाबदार नागरिक घडविण्याची पहिली पायरी म्हणजे प्राथमिक शिक्षण : डॉ. गायकवाड



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २५ जुलै : कोणत्याही विद्यार्थ्याच्या आयुष्याचा पाया मजबूत करायचा असेल तर त्याचे प्राथमिक/माध्यमिक शिक्षण महत्वाचे आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबरच मुलांच्या आवडीनिवडी, त्यांची आकलन क्षमता यानुसार विद्यार्थ्यांना ज्ञान दिले पाहिजे. सगळी मुलं काही सारखी नसतात हे लक्षात घेऊन वाढ आणि विकास ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे या दृष्टिकोनातून मुलांसाठी ज्ञानाची दरवाजे खुली करून द्यावीत. प्राथमिक शिक्षण हे जबाबदार नागरिक घडवण्याची पहिली पायरी आहे असे मत डॉ. भास्कर गायकवाड यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र अध्यापक विद्यालयातील प्रथम वर्षाच्या प्रवेशीत अध्यापकांच्या स्वागत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, लहान विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार झाले पाहिजेत ही महत्त्वाची बाब आहे. याची जबाबदारी जेवढी आई वडिलांची तेवढीच शिक्षकांची सुद्धा आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महाराष्ट्र शिक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून सुरुवात झाली. याप्रसंगी महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. पवार यांनी प्रथम वर्ष प्रवेशीत अध्यापकांना शुभेच्छा देऊन ज्ञानदानासारखे दुसरे पवित्र क्षेत्र नाही. यासाठी वेळ, अभ्यास, मेहनत, पेहराव, आचार विचार यांना महत्व द्यावे. अशी अपेक्षा व्यक्त केली, तर प्रा.सुर्यकांत वाघमारे यांनी बदलत चाललेल्या शिक्षकाच्या व्याख्येवर भाष्य करुन कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन, सुत्रसंचालन, विचारांची देवाणघेवाण याबद्दल अद्यापकांना सजग राहण्याबद्दल सूचित केले.

## आधी केले मग सांगितले –येरोळच्या ओमप्रकाश तांबोळकर या शेतकऱ्याने शेताच्या बांधावर केली वृक्ष लागवड



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २५ जुलै : पर्यावरणाचे रक्षण आणि शेतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे येरोळ गावचे प्रगतिशील शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार ओमप्रकाश तांबोळकर यांनी आपल्या शेताच्या बांधावर वृक्षलागवड करून आदर्श निर्माण केला आहे.बांधावरच केली वृक्षांची लागवड ओमप्रकाश तांबोळकर यांनी आपल्या शेताच्या संपूर्ण बांधावर कडुलिंब, चिंच, बाभूळ, वड, पिंपळ अशा उपयुक्त देशी वृक्षांची लागवड केली आहे. शेतात पिकासोबतच बांधावर वृक्ष ठेवल्याने मातीची धूप थांबते, पशु-पक्ष्यांना निवारा मिळतो आणि शेताच्या बांधाला बळकटी येते असा त्यांचा उद्देश आहे.

शेतकऱ्यांसाठी प्रेरणा पत्रकारितेच्या माध्यमातून नेहमी सामाजिक प्रश्र्न मांडणाऱ्या तांबोळकर यांनी यावेळी कृतीतून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. झाडे लावा, झाडे जगवा ही फक्त घोषणा न राहता प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतात किमान दरवर्षी पाच झाडे लावली पाहिजेत असे ते म्हणाले.

त्यांच्या या उपक्रमाचे गावातील तरुण, शेतकरी आणि ग्रामस्थांनी कौतुक केले आहे. अनेक शेतकरी त्यांच्या शेताला भेट देऊन मार्गदर्शन घेत आहेत.

हवामान बदलावर उपाय जागतिक तापमान वाढ आणि पावसाचा अनिश्र्चितपणा लक्षात घेता बांधावरील वृक्षलागवड ही काळाची गरज असल्याचे तांबोळकर यांनी सांगितले. यामुळे शेतीला फायदा होण्यासोबतच पुढच्या पिढीला स्वच्छ हवा आणि पाणी मिळेल.

### जाहीर प्रगटन
### तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

जा.कृ.२०२६एमएजी /कावी

**जन्म / मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. फकरोद्दीन दावल पटेल विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ज्याअर्थी नामे. फकरोद्दीन दावल पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ रोजी जि. लातूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. ०८/०६/०९५८ मौजे. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार फकरोद्दीन दावल पटेल रा. तुरुकवाडी यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या/स्वतः जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे फकरोद्दीन दावल पटेल रा. तुरुकवाडी ता.जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. ०८/०६/१९५८ रा. तुरुक्वाडी रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे फकरोद्दीन दावल पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी
शिरूर अनंतपाळ

### तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

जा. क्र.२०२६ एमएजी/कावि-

**जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. फकरोद्दीन दावल पटेल विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ज्याअर्थी नामे. नाजेमा फकरोद्दीन पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरुर अनंतपाळ जि. लातुर यांचा/यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि.०२/०४/१९८७ मौजे. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार फकरोद्दीन दावल पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरुर अनंतपाळ जि. लातुर यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे नाजेमा फकरोद्दीन पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरुर अनंतपाळ जि. लातुर हयाचा / हिचा जन्म दिनांक. ०२/०४/१९८७ रा. तुरुकवाडी रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे नाजेमा फकरोद्दीन पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी
शिरूर अनंतपाळ

### तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

जा. क्र.२०२६ एमएजी/कावि-

**जन्म / मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. फकरोद्दीन दावल पटेल विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ज्याअर्थी नामे. असमा बेगम फकरोद्दीन पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरुर अनंतपाळ जि. लातुर यांचा / यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि.१२/०८/१९८७ मौजे. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार फकरोद्दीन दावल पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातुर यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे असमा बेगम फकरोद्दीन पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरुर अनंतपाळ जि. लातुर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. १२/०८/१९८७ रा. तुरुकवाडी रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे असमा बेगम फकरोद्दीन पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी
शिरूर अनंतपाळ

CMYK

धाराशिव
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विद्यार्थ्यांवरील लाठीमाराचा विधीज्ञ संघाकडून तीव्र निषेध

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२५ जुलै -**

नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे नीट पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरप्रकाराविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जचा तुळजापूर येथिल विधीज्ञ संघटनांकडून तीव्र निषेध व्यक्त करून आंदोलना पाठिंबा दिला आहे. तुळजापूर विधीज्ञ संघाची दि.२४ जुलै रोजी ॲड. संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

या बैठकीत ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कानडे, ॲड. ढवळे यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनासंदर्भातील विषय मांडले. त्यास विधीज्ञ ॲड. अंगद पवार यांनी अनुमोदन दिले.

त्यानंतर उपस्थित विधीज्ञांनी सर्वानुमते ठराव मंजूर केला. ठरावाची प्रत धाराशिव जिल्हाधिकारी, तुळजापूर तहसीलदार तुळजापूर पोलीस निरीक्षक यांना देण्यात आली आहे.

# धावत्या लक्झरी ट्रॅव्हल्समध्ये प्रवाशांची चोरी

## ६३ हजारांचा ऐवज लंपास... वाशी फाटा-पारगाव टोलनाका दरम्यान घटना...




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

वाशी फाटा ते पारगाव टोलनाका दरम्यान धावत्या लक्झरी ट्रॅव्हल्समध्ये अज्ञात चोरट्याने प्रवाशांच्या बॅगमधील रोख रक्कम व कृत्रिम दागिने असा एकूण ६३ हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनुराग रणछोडलाल राठोड (वय ३४, रा. मेघनगर, ता. मेघनगर, जि. झाबुआ, मध्यप्रदेश) हे इतर प्रवाशांसह एमपी ०९ एएस ९४९९ क्रमांकाच्या लक्झरी ट्रॅव्हल्समधून प्रवास करीत होते. दि. २४ जुलै २०२६ रोजी पहाटे ४ ते ५ वाजण्याच्या दरम्यान वाशी फाटा ते पारगाव टोलनाका या मार्गावर अज्ञात व्यक्ती ट्रॅव्हल्समध्ये चढून प्रवाशांच्या बॅगमधील ऐवज चोरून पसार झाली.

चोरीमध्ये फिर्यादी अनुराग राठोड यांच्या तीन बॅगमधील १५ हजारांची रोकड व कृत्रिम दागिने, राहुल मांगीलाल राठोड यांच्या तीन बॅगमधील १८ हजारांची रोकड व कृत्रिम दागिने, अंकलेश कांतीलाल राठोड यांच्या बॅगेतील ५ हजारांची रोकड तसेच पवन दिलीप राठोड यांच्या बॅगेतील ५ हजारांची रोकड असा एकूण सुमारे ६३ हजारांचा ऐवज लंपास करण्यात आला.

याप्रकरणी अनुराग राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शासकीय महापूजेचा मान मिळालेल्या माने दांपत्याचा येरमाळ्यात जंगी सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२५ जुलै -**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या शासकीय महापूजेचा मान लाभलेल्या धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव येथील वारकरी दांपत्य बाबासाहेब माने व प्रभावती माने यांचा येरमाळा येथे ग्रामस्थ व विठ्ठल भक्तांच्या वतीने उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला.

यंदाच्या आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या समवेत माने दांपत्याने श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्याचा मान मिळविला.

महापूजेनंतर मुख्यमंत्री यांच्या हस्ते माने दांपत्याचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून त्यांना वर्षभरासाठी मोफत प्रवासाचा पासही प्रदान करण्यात आला.

महापूजा व विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन माने दांपत्य एस.टी.ने आपल्या मूळ गावी गौरगावकडे परतत असताना येरमाळा येथे अनेक वारकरी, विठ्ठल भक्त व ग्रामस्थांनी त्यांचे पुष्पहार, श्रीफळ देऊन तसेच शुभेच्छा व्यक्त करत स्वागत व सत्कार केला.

यावेळी उपस्थितांनी पांडुरंग... पांडुरंगच्या जयघोषात माने दांपत्याचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या सत्कारामुळे येरमाळा परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, शासकीय महापूजेचा मान कळंब तालुक्यातील दांपत्याला मिळाल्या बद्दल कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.

## तुळजापूर कारफोडीचा गुन्हा उघड; चोरीप्रकरणी संशयिताकडून मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

तुळजापूर येथील घाटशिळ पार्किंग परिसरात उभी असलेल्या कारची काच फोडून १ लाख ५० हजारांची रोकड व महत्त्वाची कागदपत्रे चोरणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले असून त्याच्याकडून चोरीतील काही मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत नागराज सदानंद मडीवाळ (वय २९, रा. चिंचवाडा गाव पाली, ता. बिचोली नॉर्थ, जि. नॉर्थ गोवा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १९ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० ते सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान तुळजापूर येथील घाटशिळ पार्किंग, स्मशानभूमी रोडवरील इदगाहजवळ उभी असलेल्या त्यांच्या स्कोडा स्लाविया (क्र. जीए ०४ ई ९१५६) या कारची डाव्या बाजूची काच फोडून पर्समधील १.५० लाखांची रोकड व कागदपत्रे अज्ञात चोरट्याने लंपास केली होती.

याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# तेरखेडा येथे सुबोध विद्या मंदिराची आषाढी दिंडी



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ जुलै -**

आषाढी एकादशीनिमित्त वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील सुबोध विद्या मंदिर विद्यालयाच्या वतीने संपूर्ण गावातून आकर्षक दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या नामघोषात गावातून फेरी काढत भक्तिमय वातावरण निर्माण केले.

पारंपरिक वारकरी वेशभूषा, संतांच्या वेशातील विद्यार्थी तसेच टाळ-मृदंगाच्या गजरामुळे गावातील वातावरण विठ्ठलमय झाले. दिंडीत मुख्याध्यापक डी. डी. शिंदे यांच्यासह सी.जी. कुर्वलकर, एस.आर. मुळे, एस.एस. पांढरे, एस.एस. काळे, कि.जी. उमरदंड, एस.ए. गुरव, एम.पी. उंबरजे, ए.ए. घोलप आणि वाय.ए. भापकर यांनी सहभाग घेतला. तसेच विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भक्तिमय दिंडीमुळे तेरखेडा गावात आषाढी एकादशीचा उत्साह द्विगुणित झाला.

## अल्पवयीन मुलीचा बालविवाह; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ जुलै -**

अल्पवयीन मुलीचा विवाह लावून देऊन तिच्याशी शारीरिक संबंध ठेवल्याप्रकरणी उमरगा पोलिस ठाण्यात संबंधित तरुण व मुलीच्या पालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गावातील पीडित मुलगी (नाव व गाव गोपनीय) १४ मे २०२५ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत अल्पवयीन असतानाही तिच्या आई-वडिलांनी तिचा विवाह एका तरुणासोबत लावून दिला.

त्यानंतर संबंधित तरुणाने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप असून, या संबंधातून पीडितेला एका मुलीचा जन्म झाला आहे.

पीडितेने २४ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## श्री क्षेत्र कानेगाव येथे आषाढी वारीनिमित्त लाखो भाविकांची गर्दी



### पालखी, रिंगण व कीर्तनाने भक्तिमय वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२५ जुलै -**

मराठवाड्याचे 'प्रति पंढरपूर' म्हणून ओळख असलेल्या लोहारा तालुक्यातील श्री क्षेत्र कानेगाव येथे आषाढी एकादशीनिमित्त श्री संत शिरोमणी सद्गुरू मारुती महाराज कानेगावकर यांच्या समाधी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. पहाटे काकड आरती, अभिषेक व पूजेनंतर सकाळी पालखी सोहळा, दुपारी गोलाई मंदिर परिसरात रिंगण सोहळा आणि रात्री हभप. रामकृष्ण महाराज शेंडगे यांच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता झाली. लातूर, सोलापूर, धाराशिव जिल्ह्यांसह पंचक्रोशीतील वारकरी, महिला भजनी मंडळे, विविध गावांतील दिंड्या आणि शाळकरी विद्यार्थी वारकरी वेशभूषेत टाळ-मृदंगाच्या गजरात सहभागी झाले. आमदार प्रवीण स्वामी यांनीही समाधीचे दर्शन घेऊन वारकऱ्यांसमवेत फुगडीचा आनंद लुटला.

माजी पोलीस निरीक्षक हरिश्चंद्र कदम यांच्या वतीने भाविकांना साबुदाणा खिचडी, तर कानेगाव ग्रामस्थांच्या वतीने केळीचे वाटप करण्यात आले. सोहळा यशस्वी करण्यासाठी कानेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र, लोहारा पोलीस, महावितरण, ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थ व वारकरी भाविकांनी परिश्रम घेतले.

## पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक दिंडी सोहळा उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपरिक पालखी व दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. भारतीय संस्कृती, वारकरी परंपरा आणि संतांच्या विचारांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत टाळ, मृदंग आणि भगव्या पताकांसह दिंडीत सहभाग घेत ज्ञानोबा-तुकाराम व *विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल*च्या जयघोषाने परिसर भक्तिमय केला. विद्यार्थ्यांनी अभंग, भारूड व भक्तिगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी शिक्षकांनी वारकरी संप्रदाय, आषाढी एकादशीचे महत्त्व आणि संतांच्या विचारांचा संदेश विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांनी संतांच्या विचारांचे आचरण जीवनात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इयत्ता नववीच्या वर्गशिक्षिका विजयमाला दराडे व कार्यक्रमाधिकारी सुप्रिया राहिगुडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

## श्री श्री रविशंकर विद्यामंदिरात २४ व्या वर्षीही आषाढी दिंडी भक्तिमय वातावरणात



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ जुलै -**

आषाढी एकादशीनिमित्त श्री श्री रविशंकर विद्यामंदिरात आयोजित दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. जय जय राम कृष्ण हरीच्या अखंड नाम घोषाने व टाळ-मृदंगाच्या गजराने शाळेचे प्रांगण दुमदुमून गेले.

गेल्या २४ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विठोबा, रुक्मिणी, वासुदेव आणि वारकरी अशा पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतला. शाळेच्या प्रांगणात पाऊल व रिंगण सोहळ्यानंतर हरिनामाच्या गजरात दिंडी उमरगा शहरातील महादेव मंदिरापर्यंत काढण्यात आली.

यावेळी डॉ. उदय मोरे, डॉ. सुरेश चव्हाण, डॉ. दत्तात्रय थिटे, अमृत मोरे, डॉ. रेणुका मोरे, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचा आनंद अनुभवत आषाढी एकादशीचा उत्सव उत्साहात साजरा केला.

# संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये बाल-दिंडी सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ जुलै -**

संत मीरा पब्लिक स्कूल, परंडा येथे आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेला बाल-दिंडी सोहळा उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. भगवान विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात टाळ-मृदंगाच्या गजरात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत भव्य दिंडी काढली.

विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेतील गोल रिंगण, भजन, गौळण, भारूड व भक्तिमय नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. हभप. सीमा महाराज पाटील यांनी वारकरी संप्रदाय, आषाढी वारी आणि संत साहित्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

कार्यक्रमाला प्रज्ञा काळे, सुवर्णा देशमुख, सुप्रिया देशमुख, मीराबाई भगत, बप्पाजी काळे, काकासाहेब गवारे, अतिश देशमुख, बळीराम कोळी, बालाजी कोकाटे, अशोक राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक संतोष भांडवलकर, बालाजी गोरे व सांस्कृतिक विभागाने केले. सूत्रसंचालन माधुरी नांगरे व शुभांगी गोडगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, संत परंपरा व नैतिक मूल्यांचे संस्कार रुजविणारा हा उपक्रम सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला.

# नळदुर्गात आषाढी एकादशीनिमित्त पालखी मिरवणूक; वारकरी भक्तिरसात रंगले



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ जुलै -**

आषाढी एकादशीनिमित्त ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडळ व शिवशाही तरुण मंडळाच्या वतीने नळदुर्ग शहरातून शनिवारी भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदंगाच्या गजरात, भजन-कीर्तन आणि ज्ञानोबा-तुकाराम च्या जयघोषात निघालेल्या मिरवणुकीत लहान मुलांनी संतांच्या वेशभूषेत सहभाग घेत आकर्षण ठरले.

मराठा गल्ली येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापासून सुरू झालेली मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करून पुन्हा मंदिरात दाखल झाली. मार्गावरील विविध चौकांमध्ये भाविकांनी माऊलीचे दर्शन घेतले, तर महिला-पुरुषांनी फुगडी खेळत भक्तिरसाचा आनंद लुटला. भवानी चौकात नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. रूपामाता मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह शाखेच्या वतीने वारकरी व भाविकांना केळी व पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.

मिरवणुकीनंतर विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. तसेच वारकरी व भाविकांसाठी चहा, केळी, चिक्की व राजगिरा लाडूंचे वाटप करण्यात आले. मिरवणुकीच्या यशस्वी आयोजनासाठी ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडळ, शिवशाही तरुण मंडळ आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

शांततेत मिरवणूक पार पडण्यासाठी पोलिस निरीक्षक राजेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डीबीटी पोर्टल तातडीने सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ जुलै -**

संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, दिव्यांग आदी योजनांचे बंद पडलेले डीबीटी पोर्टल तातडीने सुरू करून रखडलेले अनुदान संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे, तसेच कुटुंब अर्थसहाय्य योजना त्वरित सुरू करून पात्र लाभार्थ्यांना लाभ द्यावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या वतीने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, संजय गांधी निराधार, श्रावणबाळ व दिव्यांग यांसारख्या सामाजिक सुरक्षा योजनांचे डीबीटी पोर्टल सध्या बंद असल्यामुळे अनेक लाभार्थ्यांचे अनुदान रखडले आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल, निराधार, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांच्या उदरनिर्वाहावरही परिणाम होत आहे. याशिवाय, कुटुंब अर्थसहाय्य योजना तात्काळ सुरू करून पात्र लाभार्थ्यांना त्याचा लाभ उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांची त्वरित दखल न घेतल्यास वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर धम्मशील कदम, आनंद पंडागळे, बाबासाहेब मस्के, एस.के. गायकवाड, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### तुळजाभवानी मंदिर महाद्वारासमोर भाविकांना फराळीचे वाटप

**तुळजापूर, दि.२५ जुलै -**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून प्रतिवर्षाप्रमाणे भाविकांना उपवासाचे अल्प उपहार पानपुडे परिवाराच्या वतीने तुळजाभवानी मंदिराच्या महाद्वारासमोर वाटप करण्यात आले. या सेवाकार्यात नागेश नाईक, आनंद कंदले, गुलचंद व्यवहारे, धैर्यशील दरेकर, राम चोपदार, इंद्रजीत साळुंके, श्रीनाथ शिंदे, प्रशांत गायकवाड, धनंजय जाधव, बालाजी कावरे, रंगा कावरे, संग्राम नाईकवाडी प्रसाद पानपुडे, स्वराज पणपुडे उपस्थित होते.



### खुदावाडी जिल्हा परिषद शाळेची आषाढी दिंडी भक्तिमय संपन्न

**अणदूर, दि.२५ जुलै -**

अणदूरजवळील खुदावाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या आषाढी दिंडीला विद्यार्थी, महिला व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वारकरी वेशभूषेत विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठल विठ्ठल, हरी ओम विठ्ठलाच्या जयघोषात संपूर्ण गाव भक्तिमय केले. दिंडीचे पूजन केंद्रप्रमुख सीमा दूधगी यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांनी भक्तिगीते व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दिंडीनंतर सीमा दूधगी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास, शिस्त, संस्कार व मोठे ध्येय ठेवण्याचे मार्गदर्शन केले. यावेळी माजी केंद्रप्रमुख दगडू सालेगावे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनराज जवळगे, सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक विलास चव्हाण व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.



### तीर्थ बुद्रुक येथे बालदिंडी सोहळ्यात बालवारकऱ्यांना केळीचे वाटप

**तुळजापूर, दि.२५ जुलै -**

आषाढी वारीच्या निमित्ताने तीर्थ बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बालदिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. या प्रसंगी तालुका युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष धीरज धनंजय जाधव यांनी बालवारकऱ्यांना केळीचे वाटप करून दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भागवत मोरे, शाळेतील सर्व शिक्षक, तसेच गावातील युवक किरण मोरे, सुरज जाधव, दादा मोरे, बंडू क्षीरसागर, अनिकेत मोरे, श्रीहरी मोरे, बालवीर गुरव, वसंत सगट, बबलू पाटील, मनोज वाघमारे, किरण कांबळे, जावेद शेख, ज्येष्ठ नागरिक झुंबर कांबळे, धनंजय जाधव तसेच ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



### बालाजी नगर जि.प. शाळेची आषाढी दिंडी भक्तिमय वातावरणात संपन्न

**उमरगा, दि.२५ जुलै -**

उमरगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बालाजी नगर येथे आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांची भव्य पालखी सोहळा व दिंडी मोठ्या उत्साहात काढण्यात आली. 'ज्ञानबा-तुकाराम' आणि 'विठ्ठल-विठ्ठल'च्या अखंड जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. विठ्ठल-रखुमाईच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांसह वारकरी पोशाखातील बालचमू, डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी, टाळ-मृदुंगाच्या गजरात अभंग गात दिंडीत सहभागी झाले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत वरवटे व पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सहभागाचे व सांस्कृतिक सादरीकरणाचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका वंदना बिराजदार, बालवाडी शिक्षिका नेहा सौंदर्गे, स्वयंसेविका रणिता निंगदळे तसेच जी.बी. लोखंडे, व्ही.जी. चिट्टे आणि एस.डी. मुलगे यांनी विशेष परिश्रम घेतले. पालखी सोहळ्याची सांगता विठ्ठल-रखुमाईच्या आरतीने व प्रसाद वितरणाने झाली.

# धाराशिवच्या वारकरी दाम्पत्याला आषाढी महापूजेचा मान; जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

## गौरगावच्या बाबासाहेब व प्रभावती माने यांना श्री विठ्ठल-रुक्मिणी महापूजेचा बहुमान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मुख्यमंत्री यांच्या समवेत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या महापूजेचा मान यंदा धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव येथील ज्येष्ठ वारकरी दाम्पत्य बाबासाहेब माने आणि प्रभावती माने यांना मिळाला. अनेक दशकांपासून अखंडपणे विठ्ठल भक्ती, नामस्मरण आणि पायी वारीची परंपरा जपणाऱ्या या दाम्पत्यासाठी हा क्षण आयुष्यातील अविस्मरणीय ठरला.

आषाढी एकादशीच्या दिवशी मुख्यमंत्री यांच्या हस्ते संपन्न होणाऱ्या श्री विठ्ठल-रुक्मिणी महापूजेत सहभागी होण्याचा मान हा प्रत्येक वारकऱ्याचे स्वप्न असते.

यंदा हा बहुमान धाराशिव जिल्ह्यातील वारकरी दाम्पत्याला मिळाल्याने संपूर्ण जिल्ह्यासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

बाबासाहेब आणि प्रभावती माने यांनी गेली वीस वर्षे अखंडपणे पायी वारीची परंपरा जपली आहे. संत परंपरेचे संस्कार, विठ्ठल नामस्मरण आणि वारकरी संप्रदायाचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या निस्सीम भक्तीची दखल घेत यंदा त्यांची महापूजेसाठी निवड करण्यात आली. महापूजेनंतर आपल्या भावना व्यक्त करताना माने दाम्पत्य म्हणाले, हा मान आमच्यासाठी विठ्ठलाची कृपाच आहे.

आयुष्यभर केलेल्या वारीचे हे फळ असून, पांडुरंगाने आम्हाला आपल्या चरणी सेवा करण्याची संधी दिली. हा आनंद शब्दांत व्यक्त करता येणार नाही. आम्ही विठ्ठलाचे मनःपूर्वक ऋणी आहोत.

या सन्मानामुळे गौरगावसह संपूर्ण कळंब तालुका आणि धाराशिव जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून माने दाम्पत्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वारकरी संप्रदायातील निष्ठा, सातत्य आणि अखंड भक्तीभावाला मिळालेली ही पावती असल्याची भावना वारकरी बांधवांनी व्यक्त केली.



आषाढी एकादशीच्या दिवशी धाराशिव जिल्ह्यातील वारकरी दाम्पत्याला मिळालेला हा बहुमान संपूर्ण जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरला असून वारकरी परंपरेचा गौरव अधिक उंचावणारा ठरला आहे.

## कडकनाथवाडी साठवण तलावातील वाढत्या गळतीप्रकरणी ग्रामस्थांचा राज्यस्तरावर पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ जुलै -**

वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी येथील साठवण तलाव क्रमांक २ मधील वाढत्या गळतीप्रकरणी ग्रामस्थांनी आता राज्यस्तरावर पाठपुरावा सुरू केला असून, वरिष्ठ प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

यासंदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव (जलसंपदा), मुख्य अभियंता (कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग), विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता, तहसीलदार तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्याकडे तक्रारी व निवेदने सादर करण्यात आली आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अनेक वर्षांपासून तलावातून गळती सुरू असून त्यावर वेळोवेळी दुरुस्तीची कामे करण्यात आली. मात्र, या कामांनंतरही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही. उलट दिवसेंदिवस गळतीचे प्रमाण वाढत असल्याने मोठ्या प्रमाणावर पाण्याची नासाडी होत आहे. त्यामुळे यापूर्वी करण्यात आलेल्या दुरुस्तीच्या कामांच्या गुणवत्तेची आणि संबंधित प्रक्रियेची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित विभागाकडून अनेक वेळा तांत्रिक पाहणी करण्यात आल्याचे सांगितले जात असले, तरी त्या पाहणीचे अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे हे अहवाल तातडीने जाहीर करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

सध्या पावसाळ्यामुळे तलावातील पाणीसाठा वाढत असताना वाढत्या गळतीकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून गळती कायमस्वरूपी बंद करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## लोहाऱ्यात विनापरवाना तलवार बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.२५ जुलै -**

लोहारा शहरातील होळी तांडा चौक परिसरात सार्वजनिक रस्त्यावर विनापरवाना लोखंडी तलवार बाळगून फिरणाऱ्या एका तरुणाविरुद्ध लोहारा पोलिसांनी शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शैलेश सौदागर पवार (रा. रेबे चिंचोली, ता. लोहारा) हा २४ जुलै रोजी सायंकाळी होळी तांडा चौकात लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा प्रकारे विनापरवाना लोखंडी तलवार बाळगताना आढळला. पोलिसांनी तलवार जप्त केली असून, पोअं. प्रशांत साखरे यांच्या फिर्यादीवरून लोहारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पिंपळगाव डोळ्यात अंबाबाई मंदिरात चोरी; ३८ हजारांच्या ऐवजावर चोरट्याचा डल्ला

### सोन्याचे दागिने व कंबरपट्टा लंपास...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

कळंब तालुक्यातील पिंपळगाव डोळा येथील अंबाबाई मंदिरात चोरीची घटना घडली असून अज्ञात चोरट्याने मंदिरातील सुमारे ३८ हजार रूपये किमतीचे सोन्याचे दागिने व कंबरपट्टा चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२३ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने पिंपळगाव डोळा येथील अंबाबाई मंदिराच्या गाभाऱ्याचा दरवाजा उघडून मंदिरातील ३ ग्रॅम सोन्याचे दागिने व सात भरांचा कंबरपट्टा असा एकूण ३८ हजारांचा ऐवज चोरून नेला.

याबाबत मंदिराचे सेवेकरी संपत गोरोबा घोटकर (गोंधळी, वय ६४, रा. पिंपळगाव डोळा, ता. कळंब) यांनी दि. २४ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या चोरीप्रकरणी कळंब पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## उसतोडीच्या उचलीच्या वादातून अल्पवयीन मुलाचे कथित अपहरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

उसतोडीच्या उचलीच्या पैशांच्या वादातून १६ वर्षीय मुलाला मारहाण करून बळजबरीने घेऊन गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, याप्रकरणी चौघांविरुद्ध ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्नील पारेकर (मुकादम), दिलीप गोविंद काळे, मच्छिंद्र गोविंद काळे आणि अर्चनाबाई दिलीप काळे (सर्व रा. बोरी सावरगाव, ता. केज, जि. बीड) यांनी दि. ४ जुलै २०२६ रोजी पहाटे सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास पळसप येथून सचिन सुनिल काळे (वय १६ वर्षे ३ महिने) याला बळजबरीने नेल्याचा आरोप आहे.

फिर्यादी कौशल्या सुनिल काळे (वय ३५, रा. पळसप, ता. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी उसतोडीच्या उचलीचे पैसे परत दे, अन्यथा कामावर ये, अशी मागणी करत सचिन काळे याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व जबरदस्तीने सोबत घेऊन गेले. तसेच, उसतोडीच्या उचलीचे पैसे दे आणि मुलाला घेऊन जा, अन्यथा आम्ही मुलाला सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

याप्रकरणी कौशल्या काळे यांनी दि. २४ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## बलसुरमध्ये सिमेंट रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ जुलै -**

उमरगा तालुक्यातील बलसुर येथील भाऊसाहेब नगर व राम कृष्ण नगर येथे जिल्हा परिषदेच्या वसंतराव नाईक तांडा-वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेशदाजी बिराजदार यांच्या हस्ते गुरुवारी (दि.२४) संपन्न झाले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या सविता बिराजदार, सरपंच अश्विनी भोसले, उपसरपंच अयुब पटेल, साहेबराव पाटील, शमशोद्दीन जमादार, अभियंता आर सी. चव्हाण, अभियंता बन्सीलाल चव्हाण, ग्रामसेवक सुधीर कदम, अभियंता पाटील आदी उपस्थित होते.



वसंतराव नाईक तांडा-वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकासकामांना प्रारंभ

वसंतराव नाईक तांडा-वस्ती सुधार योजनेअंतर्गत भाऊसाहेब नगर तांड्यात भिल्लू राठोड यांच्या घरापासून राजेंद्र राठोड यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रिट रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच रामकृष्ण नगर तांड्यात सेवालाल मंदिर ते नारायण गोपा चव्हाण यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रिट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या रस्त्यांची मागणी ग्रामस्थांकडून अनेक वर्षांपासून केली जात होती. अखेर कामाला सुरुवात झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे आभार मानले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य पवन पाटील, दत्ता चव्हाण, किसन चव्हाण, वसंत साखरे, प्रदीप पाटील, सत्यनारायण जाधव, माधव नांगरे, गुरुलिंग वाकडे, राजू राठोड, चंद्रकांत भोसले, बळीराम नांगरे, वामन राठोड, अक्षय चव्हाण, शरद पवार, विष्णू चव्हाण, जुगल चव्हाण, बंटी चव्हाण, शित्रे, गोविंद चव्हाण, नारायण चव्हाण, किसन राठोड, नामदेव चव्हाण, भास्कर राठोड यांच्यासह गावातील व तांड्यातील पुरुष व महिला उपस्थित होत्या.

## नगरपालिका स्तरावरील तक्रारी तातडीने सोडविणार : नगराध्यक्ष धरणे

- जनता दरबाराला नागरिकांचा प्रतिसाद...
- प्रभाग क्र. २ मधून ३१ तक्रारी दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ जुलै -**

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग शहरातील प्रभागनिहाय सुरू असलेल्या जनता दरबार उपक्रमांतर्गत शनिवारी (दि.२५) प्रभाग क्रमांक २ मध्ये नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबार आयोजित करण्यात आला. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून विविध समस्यांबाबत एकूण ३१ तक्रारी दाखल करण्यात आल्या.



नागरिकांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने शहरातील प्रत्येक प्रभागात दर शनिवारी जनता दरबाराचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार प्रभाग क्र. २ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात हा जनता दरबार पार पडला.

यावेळी उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, बांधकाम समितीचे सभापती शशिकांत पुदाले, नगरसेविका सुमनकाकी ठाकुर, नगरसेवक निरंजन राठोड, नगरसेविका साक्षी बनसोडे, माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनता दरबारात नागरिकांनी पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, नागरी सुविधा आदी विविध विषयांशी संबंधित ३१ तक्रारी सादर केल्या. यावेळी बोलताना नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी नगरपालिका स्तरावरील तक्रारी तात्काळ निकाली काढल्या जातील, तर इतर विभागांशी संबंधित तक्रारी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करून लवकरात लवकर सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही दिली.

यावेळी शिवसेना (शिंदे गट)चे माजी उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, बलदेव ठाकुर, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, भाजपचे माजी शहराध्यक्ष धीमाजी घुगे, विशाल डुकरे, संदीप गायकवाड, अभिजित लाटे, सुदर्शन पुराणिक, ओमकार कदम, मारुती घोडके, पप्पू पाटील, सौदागर कांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच अजय मोटे, निलेश मुळे, श्रीकांत पाटील, निशा मुळे, बेबाबाई जाधव, अजहर शेख, रियाज शेख, महादेव सुरवसे, गणेश शेंडगे, समदानी शेख, दत्ता व्हटकर, देवानंद गायकवाड, दयानंद चौरे, चंद्रकांत कदम यांच्यासह प्रभागातील नागरिक, विशेषतः महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## ऑनलाइन फसवणुकीतील १९ लाख परत; सायबर पोलिसांची मोठी कामगिरी

### एनसीसीआर पोर्टलवरील तक्रारीनंतर कारवाई...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

धाराशिव सायबर पोलीस ठाण्याने ऑनलाइन आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणात तत्पर कारवाई करत दोन फिर्यादींना एकूण १९ लाखांची रक्कम परत मिळवून देण्यात यश मिळविले आहे.

वत्सलानगर, अणदूर (जि. धाराशिव) येथील मोहित सिद्धेश्वर भुजबळ व रोहित सिद्धेश्वर भुजबळ यांनी अनुक्रमे १४ लाख आणि ५ लाख, अशी एकूण १९ लाखांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार एनसीसीआर पोर्टलवर नोंदवली होती.

तक्रार प्राप्त होताच धाराशिव सायबर पोलिसांनी संबंधित बँकांशी तातडीने पत्रव्यवहार करून आरोपींच्या विविध बँक खात्यांमध्ये वर्ग झालेली रक्कम गोठविण्याची कारवाई केली. त्यानंतर संबंधित बँकांच्या नोडल अधिकाऱ्यांशी सातत्याने पाठपुरावा करून फिर्यादींची एकूण १९ लाखांची रक्कम परत मिळवून देण्यात सायबर पोलिसांना यश आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक कासुळे, पोलीस अंमलदार सूर्यवंशी, पोलीस हवालदार हालसे, पोलीस अंमलदार जाधवर, शेख, बिराजदार, गाडे आणि शिंदे यांच्या पथकाने केली.